भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें

त्रैमासिक

ऐतिहासिक संकीर्ण निबंध

खंड ११

वर्ष ५१ : अंक १–४

संपादकसमिती

१. प्रा. ग. ह. खरे
२. डॉ. अ. रा. कुलकर्णी (कार्यकारी संपादक)
३. डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी
४. श्री. दि. वि. काळे
५. श्री. वि. त्र्यं. शेटे

विनंति

हें मंडळ आजही मुख्यतः लोकाश्रयावर अवलंबून आहे. म्हणून आम्ही सर्व वाचकांस अत्यंत नम्र व कळकळीची विनंती करतों कीं, त्यांनीं

(१) आपल्याजवळ असलेल्या ताम्रपट, नाणीं, कागदपत्र, पोथ्या, हत्यारें इ. वस्तू मंडळास देऊन,

(२) या मंडळाचे अधिकांत अधिक वरच्या वर्गाचे सभासद होऊन,

(३) मंडळास हस्तें परहस्तें अधिकांत अधिक मोठी देणगी देऊन,

(४) उच्च कोटीचें लिखाण प्रकाशनासाठीं पाठवून,

(५) मंडळानें स्वतः प्रकाशिलेलीं अथवा इतरांनीं प्रकाशित केलेलीं भारतीय इतिहास व संस्कृति या विषयाचीं पुस्तकें विकत घेऊन,

मंडळाची समाधानकारक प्रगति होण्यास साह्य करावें.

चिटणीस–भा. इ. सं. मंडळ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ व ओतुरकर निधि–पुरस्कृत

भारत इतिहास संशोधक मंडळ, स्वीय माला १०५

काळाची झडप

कळविण्यास अत्यंत दुःख होतें कीं, आपल्या मंडळाचे गेलीं २० वर्षें सेवा करणारे एक ज्येष्ठ सेवक श्री. नारायण केशव उपाख्य नाना जोशी यांचें अगदीं थोडया दिवसांच्या कर्क रोगानें शुक्रवार दि. १९ फेब्रुवारी १९७२ रोजीं पहाटे २–३० वाजतां दुःखद निधन झालें. मंडळाची त्यांच्या मृत्यूनें फार मोठी हानी झाली आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. आपण सर्व त्यांच्या कुटुंबियांचे दुःखांत सहभागी आहोत.

शक १८९२ चा जोड अंक

प्रसिद्धिवर्ष : रा. श. २९८, शा. श. १८९४, इ. १९७२.

अनुक्रमणिका

संपादकीय निवेदन

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकानें अनेक अडीअडचणींना तोंड देऊन पन्नास वर्षें पुरीं केलीं. एकावन्नाव्या वर्षाचा हा जोड अंक सभासदांस देतांना आनद होत आहे. प्रस्तुत अंकांत एकूण चौदा ऐतिहासिक संकीर्ण निबंधांचा समावेश केला असून त्यांत मराठी वाङमय आणि इतिहास यांचा समन्वय साधला आहे. शिवाय इतिहासविषयक नवीन ग्रंथांचा परिचय तसेंच मुंबई येथें ५ ते ८ नोव्हेंबर १९७१ या दिवशीं मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित केलेल्या मराठ्यांचा इतिहास या तिसऱ्या चर्चासत्राचा वृत्तांतही थोडक्यांत दिला आहे.

मंडळाच्या संग्रहीं असलेल्या निबंधांपैकीं कै. ह. ना. नेने (पारमांडल्य आम्नायाचें अन्वयस्थळ), कै. चि. ग. कर्वे (सारिकाशतक : राजनीतिपर भाग) आणि कै. ना. य. मिरीकर (गोसावीदासांची शतश्लोकीं टीका) हे प्राचीन साहित्यासंबंधीचे लेख उपयुक्त असल्यामुळें आम्ही येथें मुद्दाम छापले आहेत. श्री. ना. ब. जोशी यांच्या लक्ष्मीपतीच्या संगीतरचनेसंबंधीचा लेख संगीतप्रेमी संशोधकांना मनोरंजक वाटेल. डॉ. पारखे (अष्टावक्रसूक्त), श्री. देशपांडे (एकादशीकथा) व प्रा. जोशी (केशवकृत संतमालिका) हे निबंधही वाचकांना उपयुक्त वाटतील.

मंडळसंग्रहांत इतिहासासंबंधीं जे निबंध होते त्यांपैकीं सात निबंधांची निवड करून ते येथें दिले आहेत. श्री. वि. ग. खोबरेकर यांचा प्रतापसिंहाच्या काळचें सातारा शहर, प्रा. देशपांडे यांचा पिलाजी गायकवाडाचा खून आणि प्रा. रा. वि. ओतुरकर यांचा सेनापती दाभाडे : एक अभ्यास, या निबंधांनीं बरीच ऐतिहासिक माहिती उजेडांत आणली आहे. प्रा. ओतुरकर यांनीं सेनापती दाभाड्यांवरील आपला निबंध कै. द. वि. आपटे यांच्या स्मृतिदिनीं वाचला होता. प्रा. ग. ह. खरे यांनीं भुतफरोशी आणि जकात यासंबंधीं संकलित केलेली माहिती संशोधकांना नवीन वाटेल. श्री. ना. सं. इनामदार यांनीं दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीतील एका सांकेतिक लिपीचा शोध घेतला आहे. डॉ. सासवडकर यांनीं डेक्कन कॉलेज-मधील साधनांच्या सहाय्यानें हैद्राबादच्या सरदार घराण्यांतील एक प्रकरण उजेडांत आणलें आहे. प्रा. जोशी यांनीं संभाजीवरील नवीन संशोधनाचा परामर्ष आपल्या लेखांत घेतला आहे.

मंडळाच्या पुढील त्रैमासिकाच्या जोड अंकाची सिद्धता झाली असून त्यामध्ये ऐतिहासिक साधनें संगृहीत करण्याचें योजिलें आहे. मराठ्यांच्या इतिहासास उपयुक्त अशा मराठी, कानडी, पोर्तुगीज, फार्सी, साधनांचा यांत समावेश केला आहे. हा अंक शक्यतों लवकर वाचकांच्या हातीं देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहों.

पुण्याच्या महानगरपालिकेनें मंडळास मराठ्यांच्या इतिहासाचें दालन सुरू करण्यासाठीं २५ हजार रुपयांचें अनुदान दिलें आहे. याबद्दल मंडळ पुणें महानगर पालिकेचें अत्यंत ऋणी आहे. महापालिकेचे सभासद आणि मंडळाचे हितचिंतक, श्री. द. रा. मेहेंदळे यांचें याबाबत आम्हांस खूप सहाय्य झालें. त्याबद्दल आम्ही त्यांचेही आभारी आहों. या अनुदानांतून मराठ्यांच्या इतिहासास उपयुक्त असे संदर्भ ग्रंथ व अभ्यासकांची बसण्याची सोय एका स्वतंत्र दालनांत करावयाची आहे. तसेंच मराठ्यांच्या इतिहासाच्या जडणघडणीस ज्या लहानसहान व्यक्तींनीं हातभार लावला होता त्यांचीं छोटीं छोटीं चरित्रें लिहून घ्यावयाचीं आहेत. यासाठीं स्वतंत्र योजना तयार केली असून अनेक संशोधकमित्रांनीं या ग्रंथासाठीं लेखन करण्याचें आश्वासन दिलें आहे. हा ग्रंथही आम्ही प्रसिद्ध करणार आहों.

मंडळाचा हीरक महोत्सव साजरा करण्यासंबंधीं एक योजना तयार केली आहे. मंडळाची आर्थिक परिस्थिती सुधारावी व मंडळाच्या कार्याला गति मिळावी म्हणून कांहीं निधी जमविणें आवश्यक आहे. मंडळाचे सभासद आणि हितचिंतक या कामीं आम्हांस सहकार्य देतील अशी अपेक्षा आहे. हीरक महोत्सवाच्या निमित्तानें कै. राजवाडे यांनीं स्थापन केलेल्या या मंडळाचा इतिहास तयार करणें, तसेंच मंडळाच्या त्रैमासिकांतून प्रसिद्ध झालेल्या लेखांची सूची तयार करणें हीं कामें मंडळानें हातीं घेतलीं आहेत.

शेवटीं सभासदांना आणि संशोधकांना अशी विनंति आहे कीं, त्यांनीं आपल्या संशोधनाचा लाभ लेखरूपानें मंडळास द्यावा. अस्सल साधनांवर आधारित निबंध, अस्सल साधनें, ग्रंथपरिचय या संबंधीचें आपलें लिखाण मंडळाकडे त्यांनीं पाठवावें. योग्य साहित्याच्या अभावीं मंडळाच्या त्रैमासिकाचें काम लांबणीवर पडतें हें येथें नमूद करावेसें वाटतें. त्रैमासिकाचा दर्जा वाढविणें व तें नियमितपणें प्रसिद्ध करणें यासाठीं संशोधकांच्या सहाय्याची नितांत गरज आहे. तरी त्यांनीं आपले संशोधकीय लिखाण संपादकाकडे पाठविण्याची कृपा करावी.

मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुका कांहीं कारणांमुळें लांबणीवर पडल्या आहेत. त्या आतां लौकरच पूर्ण होतील आणि मंडळाचें काम नव्या उमेदीनें लवकरच सुरू होईल अशी अपेक्षा आहे.

श. १८९३ माघ शुद्ध १५ (३०–१–१९७२) — **कार्यकारी संपादक**

भारत – इतिहास – संशोधक – मंडळ, पुणें

वर्ष ५१] त्रैमासिक [अंक १–४

१. श्रीपारमांडल्य आम्नायाचें एक अन्वयस्थळ

कै ह. ना. नेने

१. प्रस्तुत 'अन्वयस्थळ' एका जीर्ण पोथीच्या शेवटीं राहिलेल्या कोऱ्या पानावर मागून कोणीं तरी लिहिलेलें आहे; कारण हस्ताक्षरांत फरक दिसून येत आहे. परशराम बासांच्या वेळीं महानुभावपंथाचे जे तेरा 'आम्नाय' किंवा शाखाभेद झाले, त्यांपैकीं 'पारमांडल्यआम्नाय' 'लक्षणरत्नाकर' कर्ते आनेराज व्यास[1]. यांच्यापासून झाला. अन्वय म्हणजे वंश किंवा परंपरा; आणि 'स्थळ'[2] म्हणजे 'निरूपण अथवा वर्णन' ज्यांत आलें आहे असें प्रकरण. यावरून आनेराजापासून निघालेल्या शिष्यपरंपरेचा, त्यांनीं केलेल्या ग्रंथसमूहाचा व परंपरागत आलेल्या गोष्टींचा वृत्तांत, या प्रकरणांत आला आहे, हें उघड आहे.

२. प्रकरणाचा प्रारंभ पुढीलप्रमाणें आहे : 'श्री : अथ अन्वय स्थळ : सृष्टीमध्यें ईश्वरें अवतरौनि चहुंपदार्थांचें[3] : कार्य-कारण-स्वरूप-याचें ज्ञान केलें : तेंचि कैसें :' इत्यादि; अन्वयस्थळाचा शेवट पुढीलप्रमाणें आहे, "श्रुति : स्मृतिः वृद्धाचार : मार्गरूढी :। श्रुति देवाची[4] : स्मृति भटोबासाची[5] : वृद्धाचार तो कवीश्वरबासाचा[6] आणि आनोबासाचा[7]। आणि मार्गरूढी ते परशरामबासाची[8] : या चौमध्यें सामावें तें प्रमाण : अशेष मार्गासि । या वेगळें तें ग्राह्य नाहीं :। श्रीपारमांडल्य आम्नाय उक्तार्थ : एवं अन्वयस्थळ संपूर्ण ॥ यानंतर लेखकाचें नांव, किंवा शकनिर्देश वगैरे कांहींच दिलेलें नाहीं. त्यावरून हें अन्वयस्थळ कोणीं निर्मिलें असावें, हें समजण्यास मार्ग नाहीं. पण आलेल्या व्यक्तींच्या निर्देशावरून हें अन्वयस्थळ पंधराव्या शतकाच्या अगोदरचें नसावें, असें वाटतें. [वैद्य दत्तराज, मलेकोयाबास, खावणीकर नागोबास, पैठणकर कमळोबासाचे नरहरीबास इत्यादि व्यक्तींचे उल्लेख आढळतात.]

---

१ 'लक्षणरत्नाकर' पान १ लें (ह. ना. नेने यांनीं प्रकाशिलेलें); २ 'नागरीं बोलीं स्थळ वानिजे'– वत्सहरण ३. जीव–देवता–प्रपंच–ईश्वर हे चार पदार्थ; ४. श्रीचक्रधर; ५. नागदेवाचार्य; ६. शिशुपालवधकर्ते भानुभट्ट बोरीकर; ७. लक्षणरत्नाकरकर्ते ; ८. लीळाचरित्र संशोधनकार.

३. भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक, वर्ष १७, अंक २, यांत प्रकाशित झालेलें अन्वयस्थळ, गेल्या वर्षी वार्षिक दिनाच्या प्रसंगीं वाचलेला 'कृष्णमुनीच्या' अन्वयस्थळावरील निबंध, व आज वाचलें जाणारें 'अन्वयस्थळ' या तिन्ही अन्वयस्थळांत वर्णिलेला वृत्तांत सर्वसाधारणपणें सारखाच आहे. श्रीचक्रधरांनीं भटोबास अथवा नागदेवाचार्य यांना केलेला बोध, निरनिराळे आम्नाय, निरनिराळे टीकाकार, महानुभावीय पंथांतील महत्त्वाचे ग्रंथकार व प्रमाणग्रंथ, गुरुपरंपरेनें आलेल्या विशेष गोष्टी इत्यादिविषयक मजकूर सामान्यपणें या तीनही अन्वयस्थळांतून आलेला आहे; तेव्हां त्याविषयीं विशेष न लिहितां, प्रस्तुत अन्वयस्थळाचें महत्त्व कोणतें याचाच विचार येथें करण्याचें योजिलें आहे. निबंधाबरोबर मूळ पोथीचा उतारा करून पाठविला असल्यानें त्या त्या गोष्टी या उताऱ्यावरून स्पष्टपणें वाचकांना कळतील. मूळ पोथी सांकेतिक 'सकळ' लिपींतील असून, उताऱ्यामध्यें त्याचें बालबोधीकरण केलें आहे.

४. (अ) **माहिंभटांनीं लीळाचरित्र संकलन केव्हां केलें ?–** 'स्मृतिस्थळ' किंवा इतर अन्वयस्थळें यावरून माहिंभटांनीं लीळाचरित्राचें शोधन गोविंदप्रभु जिवंत असतांना केलें कीं नंतर केलें, याची नक्की माहिती मिळत नव्हती; पण प्रस्तुत पोथींतील उल्लेखावरून ही गोष्ट स्पष्ट होत आहे.

"गोसावी[1] बीजें केलेयां नंतरें : भट[2] : माहींभट : श्रीप्रभुचा[3] संनिधानीं असत : म्हाइभटीं लीळाशोधन केलें : जया अनुभवाची जे लीळा[3] : ते तयातें पुसपुसों लाविलिया: तयांत पूर्वार्ध उत्तरार्ध : ॥ : मग श्रीप्रभु[4] बीजें[4] केलेया उपरि : भटातें पुसपुसों केशोबासीं शास्त्रासि अन्वयो लाविला." वरील उताऱ्यावरून हें स्पष्ट होतें कीं, शके ११९४ ते १२०८ याच्या मध्यकालांत माहिंभटांचें लीळाशोधन झालें.

(आ) **केशोबासाचें 'रत्नमाळास्तोत्र' श्रीप्रभुगमनानंतर झालें :–** लीळाचरित्र संशोधन झाल्यावर मग मागून रत्नमाळास्तोत्र झालें व श्रीप्रभु निजधामास गेल्यावर या स्तोत्राची रचना झाली असावी, असें पुढील उल्लेखावरून ठरतें. "मग श्रीप्रभु बीजें केलेयां उपरि :...केशोबासि अन्वयो लाविला :।...ऐसा बाराही प्रकर्णा अन्वयो लाविला : आणि संबंधीं[5] नेलें : तेथ रत्नमाळास्तोत्र केलें." यावरून रत्नमालास्तोत्र शके १२०८ नंतर झालें, असें ठरतें. महानुभावीय ग्रंथांपैकीं अत्यंत महत्त्वाच्या अशा आरंभींच्या वरील ग्रंथाचा रचनाकाल अशा रीतीनें बराच स्पष्ट होत आहे. इतका स्पष्ट निर्देश आतांपर्यंत उपलब्ध झाला नव्हता.

(इ) **नरेंद्रवासांचें रुक्मिणीस्वयंवर भटोबासांच्या हयातींत झालें–** "भट विद्य-

१. श्रीचक्रधरांचें उत्तरापंथीप्रयाण शके ११९४; २. भटोबास; ३. गोविंदप्रभु –श्रीचक्रधरांचे गुरु; ४. श्रीप्रभु शके १२०८ मध्यें परलोकवासी झाले; ५. बायकोच्या घरीं त्यांना घेऊन गेले तेव्हां.

मानीं राजसभे सालकवि मालकविचेनि सळें नरेंद्रबास ' सैंवर ' बोलिलें. "

(ई) **परशुरामबासांनीं स्मृतींचा संबंध लावणें** – परशुरामबासांनीं केलेल्या कार्याचा वृत्तांत चालू असतां त्यांनीं ' स्मृतीचा संबंध ' लावल्याचा उल्लेख आला आहे. ' तत्समैं : म्हाइंभटाचें लीळाशोधन : आणि परशरामबासीं संबंधिलिया तिया स्मृती...... वाचामुंदर बोल्हाइसा जवळ ठेवून आपण अटना गेले. ' येथील परशुरामबासाचा स्मृतिकार म्हणून केलेला उल्लेख महत्त्वाचा आहे.

पारमांडल्य आम्नायापैकी कवि मालोबास यांचा स्मृतिकार म्हणून निर्देश :– ' नागनाथाचे शिष्य मालोबास तेही स्मृती आणि वृद्धाचारा संबंधु लाविला. ' परशुरामबास हे कवीश्वरआम्नायापैकीं आहेत, व नागनाथाचे शिष्य, कवि मालोबास, हे पारमांडल्य आम्नायाचे आहेत. नागनाथबासांनीं आपला **लीळाचरित्राचा पाठ** निराळा रचिला, त्याप्रमाणें कवि मालोबास यांचा **स्मृतीचा पाठ** निराळा रचला गेला आहे काय, असा संशय उपस्थित होऊन एक निराळाच प्रश्न उपस्थित होतो. नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या ' स्मृतिस्थळा ' वरून व त्यांतील प्रस्तावनेवरून, श्रीयुत वामनराव देशपांडे, यवतमाळ, यांच्या मतानुरूप ' स्मृतिस्थळ ' व ' नागदेवचरित ' हे ग्रंथ दोन निराळे नसून एकाचींच दोन स्वरूपें आहेत, असें दिसतें. पण वरील उल्लेख त्या अनुमानास बाधक आहेत, असें वाटतें. शिवाय ' स्मृतिस्थळ ' व ' नागदेवचरित ' यांतील लीळांच्या ' आदि ' (आरंभींचीं शीर्षकें) तुलना करून पाहिल्यास हे दोन्ही ग्रंथ निरनिराळे आहेत, असें वाटूं लागतें. यावरून वामनराव देशपांडे यांनीं प्रस्तावनेंत चर्चिलेल्या प्रश्नाला अजून निश्चयात्मक स्वरूप आलें, असें वाटत नाहीं. भाषा, व्यक्तींचे उल्लेख, व कांहीं घटनांचे निर्देश यांवरून, दोन्ही ग्रंथांचें, प्रतिपाद्य विषयाचे बाबतींत, एकस्वरूप असलें तरी ते दोन ग्रंथ निराळे असावेत, असें वाटण्याकडे प्रवृत्ति होते. म्हणून याविषयीं चर्चा पुनः करणें अवश्य आहे.

(उ) हें अन्वयस्थळ शिवबास व वैद्य दत्तराज यांच्यानंतर लवकरच झालें असावें, असें वाटतें. कारण वैद्य दत्तराज हे शिवबासानंतर गादीवर कसे बसले, बेदर मुक्कामीं त्यांच्याकडे सर्व मंडळी कशी जमली, निरनिराळ्या आम्नायांतर्फे कोण कोण तेथें आले, याचा वृत्तांत जरा विस्तृतपणें दिलेला असल्यानें, वरील अनुमान करावेंसें वाटतें, " आतां आमुचे बास तुम्ही (आतां तुम्ही आमचे स्वामी, गादीचे मालक)... । मग ऐसी वार्ता आइकौनिः मार्ग (पंथीय लोक) तयाचिये भेटी आला...... तयामध्यें तेरा जणा शिष्यत्वें अंगीकरिली : मार्गासि शास्त्राची पव्हे (पाणपोई, छत्र) जाली । "

(ऊ) **पंथीय लोकांना प्रमाणभूत व्यक्ति व त्यांतील अनुक्रम** – श्रीचक्रधरांचें वचन श्रुतितुल्य; भटोबास अथवा नागदेव यांच्या नजरेखालीं झालेल्या गोष्टी स्मृतिसम; कवीश्वर भानुभट बोरीकर व आनेराजव्यास यांचें म्हणणें वृद्धाचारा-

समान; व परशुरामबास यांची आज्ञा रूढीसारखी प्रमाण; याखेरीज इतर प्रमाणें पंथीयांना ग्राह्य नाहींत. अनेक मतमतांतरें पंथांत शिरल्यानें पंथीयांना खरें प्रमाण कोणतें व त्यांत तरतमपणा कोणता, याची मर्यादा वरीलप्रमाणें आंखून दिलेली दिसते. "श्रुति स्मृति वृद्धाचार मार्गरूढि :। श्रुति देवाची : स्मृति भटोबासाची : आणि वृद्धाचार तो कवीश्वराचा आणि आणोबासाचा आणि मार्गरूढी ते परशरामबासाची :। या चौमध्यें सामावें तें प्रमाण अशेषमार्गासि। या वेगळें तें ग्राह्य नाहीं :।"

५. अशा प्रकारें प्रस्तुत अन्वयस्थळांत कांहीं गोष्टींचे निर्देश विशेष स्पष्ट असल्यानें त्याचें वैशिष्टय कायम आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यावरून कांहीं गोष्टींचा अधिक उलगडा करण्यास कशी मदत होते, हें उघड आहे. परिच्छेद तीन मध्यें उल्लेखिलेल्या तीनही अन्वयस्थळांत अनेक ग्रंथांचे व त्यांच्या कर्त्यांचे निर्देश आलेले आहेत, त्यावरून हे ग्रंथ जरी एखाद्या वेळीं मिळणें दु:साध्य झालें, तरी हे ग्रंथ अगदीं अस्तित्वांतच नसावेत, असें अनुमान करणें धाडसाचें होईल.

● ● ●

२. सारिकाशतक : राजनीतिपर भाग

कै. चिं. ग. कर्वे

[पंचवीस वर्षांपूर्वी (शके १८५० पा. सभा ८ मध्यें) राजूरीचे शिक्षक श्री. काशीनाथ परशुराम साने यांनीं 'सारिकाशतक' या पेशवेकालीन नीतिकथांचा भा. इ. सं. मंडळास परिचय करून दिला होता व २२ कथा नकलूनहि पाठविल्या होत्या. तसेंच महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या अंकांतून (वर्ष २ अं. ४; वर्ष ३ अंक १–३) पहिल्या ३ कथा प्रसिद्ध केल्या होत्या.

तथापि यांत नीतिकथांखेरीज राजनीति सविस्तरपणें सांगणाऱ्या शेवटीं ९१–१०० या ज्या दहां कथा आहेत, त्या अमात्याच्या 'आज्ञापत्रां'त भर घालणाऱ्याच वाटतील. या दृष्टीनें हा राजनीतीचा नवीन भाग म्हणतां येईल.

मी हा राजनीतिपर भाग मूळ मोडीवरून नकलून घेतला आहे.

'सारिकाशतक'ची ही मूळ प्रत दिसत नाहीं. कारण यांत बरींच अशुद्धें तर आहेतच, पण कांहीं शब्द लेखकाला लागले नाहींत व कांहीं अक्षरें गळलीं आहेत.

कै. साने यांच्या मनांत हा ग्रंथ प्रसिद्ध करावयाचा होता. पण त्यांच्या अकाली निधनानें तो बेत तसाच राहिला. आतां त्यांच्या पत्नीकडून हा सबंध ग्रंथ (पूर्वार्ध ५० कथा व उत्तरार्ध ५०) मंडळांत ठेवण्यासाठीं राव. रा. शं. दीक्षित यांच्या-

मार्फत मजकडे आला. तेव्हां हा अज्ञात राजनीतिपर भाग मी दृष्टोत्पत्तीस आणीत आहें.

पूर्वार्ध समाप्ति–

" हें सारिकाशतक पूर्वार्ध विदुरादिनीतीच्या आधारें यथामति लिहिलें असे. शके १७१६ आनंदनामसंवत्सरे श्रावण मास.

हस्ताक्षर जनार्दन गोविंद साने पिंपळवंडीकर हल्लीं वस्ती कसबें ठाणें साष्टी शके १७३१ शुक्ल नाम संवत्सरे माहे वैशाख मास व।। १३ त्रयोदशी शुक्रवार संपूर्णमस्तु शुभं भवतु ।। ५० कथा ।। "

उत्तरार्ध शके १७३१ शुक्ल नामसंवत्सरे माहे ज्येष्ठ व।। ४ गुरुवार मु।। साष्टी येथें संपूर्ण झाल्याची नोंद आहे.

बापूजी गोविंद गोखले यानें सवाई माधवराव पेशवे यांच्या कृपेनें त्यांची सात वर्षें सेवा करून हा ग्रंथ नवीन योजला, असें ग्रंथाच्या शेवटीं लिहिलें आहे

राजा शिवदत्त याचा मुलगा गुणसागर हा मूर्ख होता. तेव्हां राजाला काळजी वाटून त्यानें चिंतामणीची आराधना केली. चिंतामणि प्रसन्न होऊन त्यानें चातुर्यलतिका नांवाची एक सारिका शिवदत्तास दिली व ती गुणसागराला चातुर्यकथा सांगून चांगला ज्ञानी करील, असें वरदान दिलें. ती सारिका रोज गुणसागराला एक एक नीतिकथा सांगते आहे. ९१ पर्यंतच्या कथा जुन्या व सामान्य आहेत, पण पुढें मात्र राजनीतिपर उपदेश आहे. तेव्हां त्या दहा कथा पुढें नकलून घेतल्या आहेत.]

कथा ९१

चातुर्यलतिका गुणसागरास म्हणूं लागली, तुजला आजपर्यंत प्राचीन कथा सांगितल्या. हें कांहीं श्रवण करून संतोष जाहाला कीं नाहीं तें सांगावें. नंतर राजपुत्र गुणसागर म्हणाला, जें तुझे प्रसादेंकरून सर्व वृत्तांत श्रवण करून शत्रु पादाक्रांत करावे, आपले वडिलांनीं प्रजापालन इत्यादि केलें त्यापेक्षां आपण उत्कृष्ट करावें त्यास तुझे मुखें करून सकल वृत्तांत ऐकून आतां कथाभाग न सांगतां केवळ राजनीति सांगावी म्हणजे राज्याधिकार मजला प्राप्त झाल्यानंतर मी तशीच वर्तणूक करीन. असें सप्रेम गुणसागराचें वचन ऐकून चातुर्यलतिका म्हणाली कीं, तुजला राज्यनीति सांगोन राज्य करावयायोग्य करावें या अर्थीं मी प्रयत्न आरंभिला परंतु प्रथम आस्थापूर्वक आइकणार तर सांगत्यें– राज्यनीति ही दृढ चित्तांत ठेवावी ऐसें बोलून राजनीति सांगावयास आरंभ करिती जाहाली :

राज्यास धाक बहुत पाहिजे. मनुष्य जसें असेल त्यास तसेंच कार्य योजून सेवेस ठेवावें. त्यास त्यांतहि कुलीन, शरीर बलवंत, धैर्यशीळ, क्षमी, प्रवासाला सोसणार, उत्साहयुक्त, मधुरभाषी, हितोपदेशी, कर्ते, स्वामिभक्त, प्रभूस येश यावें हेंच इच्छितात, ऐसे पुरुष चांगले कार्यास योजावे. केवळ गुणहीन असतील त्यांस तसेंच काम पाहून ठेवावें. कारण कीं, राज्य थोर, त्यांत मनुष्याचा उपयोग नाहीं. ऐसा राजा

विवेकी असतां होणार नाहीं. उत्तम, मध्यम, कनिष्ठ कार्य पाहून मनुष्य ठेवावे. कुलशीलसंपन्न, धनुर्वेदवेत्ता, हस्ति अश्वाचा विचार जाणता, कुशल, मंजुभाषी, शकुन चिकित्सा समजतो, कृतकर्मा, दुसरियानें चाकरी केली त्याचें वर्म जाणतो व सरळ, शूर, क्लेशसाही, ऐसा सेनापति असावा, उंच, सुरूप, दक्ष, थोडें, परंतु गोड भाषण करितो असा चोपदार असावा. अनेक देशींच्या भाषा जाणतो, श्रमसाही, वक्ता व कोणे देशीं व कोणे समई काय करावें त्याचें तत्त्व जाणणार हा दूत ठेवावा. शरीरेकरून थोर, दृढ, येकनिष्ठ, विश्वासू, ज्यास प्रपंचाचा बोढा नाहीं, ऐसें करून आपणास रक्षणार ठेवावा. कोणास वश्य व्हावयाचा नाहीं, घातकी नव्हे, **प्रभूंचे** ठाईं दृढ निष्ठा त्याजकडे तांबूलाचें काम सांगावें. प्रभुशक्ति, मंत्रशक्ति, उत्साहशक्ति, द्रव्यसंपत्ति, सेनाबळ, काल इत्यादिकांचें संधान पाहून परराज्यांत स्नेह अथवा वैर करावयाचें सामर्थ्य, देशभाषा बहुत जाणणार ऐसा वकिलीस योजावा. कोणाचें कल्याण होणार व कोणते भूमीवर पीक कसें होईल आणि सेवा कोण कशी करितो हें जाणता पाहून देशाधिकार करावा. सुरूप, तरुण, कुलीन, शूर, श्रमसाही पाहून त्यास खड्गधारी करावें. शूर, बलवान, प्रवीण, गजाश्व(र)थाचे ठायीं चतुर; तो धनुर्धारी असावा. नियमित शकुन जाणून अश्वशिक्षा जाणतो व शालिहोत्र पाहिलेला, कोणती भूमि घोड्यास मानत्ये हें ज्यास समजतें, आपले प्रभूंचें बल किती असतें हें जाणता शूर असावा. सारथी व अश्वाधिकारी असावे म्हणोन चातुर्यलतिका गुणसागरास सांगती जाहाली ॥ ९१ ॥

कथा ९२

चातुर्यलतिका गुणसागरास सांगत आहे. परकीयानें द्रव्यही दिल्हें असतां वश्य न होय व पवित्र ' दक्ष ' पदार्थांचे दोष जाणता पाकशास्त्रज्ञ असा पाकशाळेचा अधिकारी असावा. याप्रो गुण ज्यास व दाढी, मिशी व नखें वरचेवर काढीत, असे पाकशाळेंत सारे पुरुष असावे. शत्रुमित्र समान व शास्त्र जाणता, कुलीन पवित्र ब्राह्मणास धर्माधिकार सांगावयासारखेच सारे पुरुष ब्राह्मण सभासद धर्माधिकारास योजावे. सर्व देशींचीं आक्षरें लिहितो, सर्व शास्त्र प्रमेय जाणतो, आक्षर चांगलें लिहिण्याची युक्तिचे मनसबा जाणता, गोष्ट थोडे आक्षरांत असा चिटणीस असावा. दुसरियां हृदय जाणणारे दूत असावे. सोनें, रुपें इत्यादिक धातूंचा परीक्षक व रत्नपरीक्षक थोर लहान जाणतो पवित्र, निपुण, आळसी नव्हे, निःस्पृह ऐसा धनाध्यक्ष असावा, त्याजसारखेच जमेकडे व खर्चाकडे पुरुष असावे. परंपरागत शरीरप्रकृति जाणता, आष्टरोगाची चिकित्सा करतो, धर्मात्मा, कुलीन, दुसरियास वश्य नव्हे, परमविश्वासी, शास्त्रसंपन्न, पवित्र वैद्य असावा. त्याचे स्वाधीन आपलें शरीर याजकरितां त्याचा शोध चांगला करीत असावें. गजशिक्षा जाणता व आसन चांगलें हा गजाधिकारी करावा. सुबुद्धी, कुलीन, भेद व्हावया योग्य नव्हे, सावध असा किलेदार असावा. वास्तुशास्त्र जाणता, चपळहस्त, श्रमसाही, दीर्घदेशी सुतार असावा. परम

नम्र, येकपत्नीवृत, ज्यास पवित्र पापभीरू, कुलीन असा अंतःपुराचा अधिकारी ठेवावा. राज्यगृहीं आधिकार बहुत आहेत यास्तव जसा जो पुरुष तसा त्यास आधिकार सांगून ठेवावा. उत्तम आधिका(रा)चे ठाईं आधम ठेविलियानें नाश आहे. याजकरितां कुलसीळ पाहून त्यास चाकरी सांगावी. जे प्रधान आसतील त्याज-बराबर वेगलाले विच्यार घेऊन मग मुख्य सचीव याचे विचारें मंत्रनिश्चय करावा. कोणाचा विश्वास नसावा. मुख्य सचीव याचे ठाईं राज्यभार यास्तव त्याचे ठाईं विश्वास आसावा. वृद्ध पवित्र वेदशास्त्रज्ञ ब्राह्मण याजपासून नम्रतेनें नीति शिकाव्या त्याची शवा (सेवा) करावी म्हणजे संपूर्ण पृथिवी वश्य होते. इद्रियांचा जय करावा. तेणेकरून प्रजा आपलाल्या धर्मी वर्तवाव्या. यज्ञ बहुत करावे. धर्मार्थ ब्राह्मण यांस द्रव्यें व भूमि द्याव्या. राष्ट्रांतून वार्षिक कर घेत जावा. प्रजेचें पित्यासारखें पालन करावें. गुरुगृहीं राहून विद्याभ्यास करून जे माघारे येतील त्यांचा सन्मान विशेष करावा. ब्राह्मणाचे ठाईं विश्वास ठेवावा. युद्धांत धैर्य असावें. ब्राह्मण शुश्रुषा निरंतर करावी. तेणेकरून कल्याण होईल. म्हणोन चातुर्यलतिका गुणसागरास सांगती जाली ॥ ९२ ॥

कथा ९३

चातुर्यलतिका गुणसागरास सांगत आहे —परमवृद्ध आपंग स्त्रिया यांचा योग-क्षेम प्रभूनें चालवावा. स्वधर्मापासून भ्रष्ट होऊन परधर्म करितील त्यांस स्वधर्मी वर्तवावें. ज्या आश्रमीं अन्नवस्त्र पात्र नसेल तें राज्यानें घ्यावें. जसे ज्यास योग्य त्याचा अपमान न करावा. कोणी तपस्वी साधु वृद्ध सिद्ध पाहून सकल राज्य त्यास निवेदन करून आपण सेवकपणें त्याजवळ वर्तावें. राज्य आपल्ये म्हणोन भार घालावा म्हणजे राज्यसंरक्षण त्याचे आसीरवादानें होईल. प्रभूस सरळ बुद्धी असावी. आपला दोष दुसरियास न समजावा. दुसरियाचे दोष प्रतिपदी बातमीनें जाणत आसावे. आपण कोणास विश्वासू नये दुसरियास आपला विश्वास दाखवावा. तसेंच वर्तावें. सिंव्हासमान पराक्रम असावा. मधुरभाषी असावें आपणाकडे ईश्वरें प्रभुत्व दिधलें त्याअर्थी प्रजा म्हणजे गरीब यास जसे ठेवील तसेच राहतील. म्हणोन कठोर बोलून दुख देऊं नये. काकासमान प्रतिपदी अंशका (आशंका) धरावी. येकास्थलीं नियमेंकरून बसणें व भोजन व निद्रा नसावी. बहुत उदकांत जाऊं नये. आपले विश्वासू याणे परीक्षा केल्यावाचून हस्ती व घोडा याजवर बसूं नये. यात्रेंत बहुत दिवस न राहावें. धर्मकार्यांत धर्मीष्ट योजावे. शूरपुरुष शजेत (सेवेंत ?) ठेवावे. चतुरादि यास द्रव्यादि व्यवहार सांगावे. स्त्रियां-कडे नपुंसक ठेवावे. उग्रास घातक कर्मी योजावे. धर्मार्थ काम न्याय येथें यथायुक्त पुरुष योजावे. ज्या अधिकारास जो ठेवावा त्याचे बातमीस दुसरे आसावे. कांहीं गप्त व कांही प्रसिध्ध ठेवावे म्हणजे कार्यांत काही विघ्न आधिक होणार नाहीं. त्यास प्रपंच पाहून वेतनें करावीं. ज्या कालीं जें देण्याचें तें त्याकालीं द्यावें व त्यांत ओढ पडल्यास

सेवकास दुर्बुद्धी सुचतील. तेव्हां राज्यद्रव्याचा आभिलाष घडेल. अति उग्रता व अतिक्षमा नसावी. पापकर्म करून लाभ घडत आसल्यास त्यांत चित्त नसावें. परंपरागत सेवक त्यास कोणतेंहि कार्य सांगितल्यास चिंता नाहीं. परराज्यांतून सेवक राहावयास येतील त्यांस आपण न ठेवावे. कदाचित् देसी दुर्गादिक नसेल तेथें ठेविल्यास चिंता नाही. देशांतरीहून गुणी आल्यास त्याची पूजा द्रव्यादिकें करून विशेष करावी म्हणज सर्वदेशी सत्कीर्ति होईल. भूमंडळीं सत्कीर्ति तोपर्यंत स्वर्गवास असें आहे. यास्तव सत्कीर्ति संपादन करावी. या भूमीस किती येकांनी माझी माझी म्हटली परंतु भूमी कोणाची नव्हे. आपल्यास जो ईश्वरें दिल्ही तो लोकांत बरें म्हणवावें त्यास दृष्टांत पूर्वीं वेन व कंस इत्यादिक जाहले त्याची निंदा अद्यापि होत आहे व युधिष्ठिर व नळ इंद्रद्युम्न इत्यादिकांची कीर्ति अद्याप आहे. पुढेंहि ऐसीच राहील. याजकरितां सत्कीर्ति होईल ते करीत जावे व स्थावर, देवालय, तळी इत्यादिक शाश्वत करावी. सेवकांची मर्जी आपण केवल सदोदित न सांभाळावी. आपलें हृदय त्यास समजूं दिल्ह्यानें ते आपल्यास वश्य करितील. सेवकास विभाग दिल्ह्यावांचून आपणच उपभोग करूं नये. द्यावयाचे विषय असतील तेच द्यावे. कारण कीं सर्प, अग्नी, विष, शस्त्र, तरवार एकीकडे आणि दुखवला सेवक येकीकडे घालून पाहिले असतां तो भारी. निरंतर सानीध यास्तव त्यास अनिष्ट करावयास विलंब काय म्हणोन. त्याचे मर्यादेनें संरक्षण करावें. त्याचें शोध पदोपदी असावे म्हणजे ते आपल्याला वश्य राहातील. ही कथा चातुर्यलतिका गुणसागरास सांगती जाहली. ॥ ९३ ॥

कथा ९४

चातुर्यलतिका गुणसागरास सांगत आहे, सेवकाचा गुप्तरूपेंकरून शोध असावा. गुणी असतील त्यांचा सत्कार करावा. इतरांस शासन करावें. चार चक्षु प्रभुत्वार्थी बातमी वाचून राहिल्यानें कोठें काय होतें तें विदित होणार नाहीं यास्तव सावधानता विशेष असावी. ज्ञानी, विचक्षण अवश्यभूत दूत स्वदेसी परदेसी ठेविले ते जनास या विदित असावे. वाणी, मांत्रिक, ज्योतिषी, वैद्य, गोसावी, खेपेकरी हे दूत असावे. येकानें सांगितलें तें प्रा नसावें. दोघांचे परस्पर अज्ञात असोन बातमी केल्यास सत्य मानावें. त्याचा विचार तात्काळ योजावा. हेच राज्यास मुळकी च्यार पाठवून वर्तमान मनास आणावे, सेवकांची प्रीति व अप्रीति जनाचे गुणदोष पाहून कोणते आचरणानें सर्वांस दुःख कोणतें हें पाहून सुखप्रद कर्म आपण आचरावें. आपण धर्म करून वर्तोन प्रज्यास स्वधर्मी ठेवावें म्हणजे त्यास संतोष करून आपलें कल्याण. जनाचे प्रीतीनें लक्ष्मीची प्रीति होत्ये यास्तव प्रयत्न करून व धर्म करून रक्षावी हे सांगोन सारिका म्हणाली कीं हे राजधर्म. आतां सेवकधर्मही कार्याकारण सांगत्यें. श्रवण कर. सेवकांनीं प्रभूचे वचनाचा अक्षेप करून बोलावें. सभेमध्यें त्यास अनकूल प्रिय ऐसें बोलावें. मग, एकांतीं अप्रिय परंतु हित असेल तें निवेदन करावें हा सेवक-

धर्म प्रभूनें हित असतां न आइकिला तर सेवकाकडे अपराध नाहीं. दुसरियांची रदबदली आपण करावी. स्वतां बोलल्यास सर्व समय सारिखे नाहींत. सर्वांनीं यक विचार करून प्रभूनें कोणतेंहि कार्य आरंभिल्यास सिद्धि ऐसी मेहनत करावी. प्रभूपासून सन्मान अपेक्षा न करावी. केल्यास दंभ दिशेल. प्रभु सर्वज्ञ त्याअर्थी आपल्यामध्ये गुण आसल्यास सहज कृपा करील. प्रभूचे दोष बाहेर न बोलावे. राजलीला व प्रभु सन्मान वेष आलंकार भूषणादिक आपण न करावा. द्यूत म्हणजे बुदवळें, गंजीफा इत्यादिकांचे ठाईं आपण कौशल्य आसल्यास दाखवावें. परंतु बाजू प्रभूची आधिक होऊन आपली न्यून्य होईल ते करावे. आंतःपुराधिकारी व धनाधिकारी तेस प्रभूने घालविले व प्रभूचे शत्रू या चौघांचा आपण स्नेह न करावा. आपल्यास कठोर एखादे दिवसीं बोलिल्या गुप्त रूपें ठेवावें. राजगुप्तहि कोणतें प्रगट न करावें. व प्रभूनें जें गुह्य म्हणोन आपलेजवळ सांगितलें असेल तें सर्व चित्तांतच ठेवावें. बाहेर प्रकाशित न करावें. कांहीं कार्य नीच मध्यम, उत्तम प्रभु आज्ञा करितां आपण त्वरेनें उठोन आज्ञा मागून करावे म्हणजे प्रभूची प्रीति होत्ये. प्रभूस प्रिय गोष्ट असेल ती बोलावी. सदैव हासून न बोलावें. भ्रुकुटी वांकडी करून बोलूं नये. अति भाषण व केवल मौन्य नसावें. मत्सर कोणाचा नसावा. प्रभु म्हणजे प्रज्याचा मायवाप त्याणें कोणावर कृपा अधिक केली त्याचा आपण संतोष न मानावा. कारण कीं, प्रभूस विदित जाहाल्यास आपली शोभा राहाणार नाहीं. वस्त्र, शास्त्र, भूषणें इत्यादिक नित्य द्यावयाचे नियम करून घ्यावे म्हणजे लौकिक विशेष होईल. प्रभुदत्त वस्तु आसेल ती आपण औदार्य करून दुसरियास न द्यावी. तरच आपणास संपत्ति प्राप्त होत्ये. अति भोजन न करावें. दिवसास निद्रा नसावी. ज्या दारीं मनाई तिकडून निर्गम नसावा. कौतुक करून एखादी चेष्टा प्रभूची पाहून हासूं नये. चेष्टा म्हणजे व्यवहार. प्रभूचे वामदक्षणभागो बसावें. समोर बसूं नये. पृष्ठभागीं शस्त्रपाणी यांचा तेथें न बसावें. आज्ञा जाहाल्यास विधिनिशध नाहींत. म्हणोन चातुर्यलतिका गुणसागरास सांगती जाहली ॥ ९४॥

कथा ९५

चातुर्यलतिका गुणसागरास सांगत आहे. प्रभूसमीप सेवकानें जांभई व थुंकी व खोकला व क्रोध न करावा. पलंगास टेकून न बसावें. ढेकरू न द्यावी. आणखी हे विरुद्ध दिसेल तें न करावें. शठता, क्षुद्रबुद्धि, चपलता शेवकास नसावी. प्रभूचे पुत्र व प्रिय मंत्री यांस नमस्कार करीत असावें. प्रभूनें विचारिल्यावांचून न बोलावें. बोलणें तरी हितप्रद प्रिय दिसेल तें बोलावें. प्रभु कोणते विचारें आपल्यावर कृपा करील तें पाहात असावें. आशा वर्धमान करून फलप्रद होत नाही व बाहेर क्रोध दाखवीत नाहीं, परतु आंत सक्रोधें आपण वचन बोलिल्यास मध्यें दुसरे बोलून आपली गोष्ट ऐकत नाहीं व आपल्यास पाहून विमुख पाहातो आथवा भ्रुकुटी वक्र करितो. आपण सेवा करीत असतां संतोष पावत नाहीं इत्यादिक प्रभूचीं अप्रिय

झाल्याचीं लक्षणें पाहावीं व आपल्यास पाहून प्रसन्न दृष्टीने आवलोकितो कुशल प्रस्न विचारितो. येकांतीं आपणास पाहून आशंका धरीत नाहीं. आपण संन्नीध नसतां मागे गुण घेतो इत्यादिक चिन्हें करून प्रभुप्रमाणे आहे हें समजावें व सेवकानें बहुत सावधतेनें वर्तणूक करावी. राजा मजवर कृपा करितो म्हणोन प्रमाद न करावा. प्रभु कोणाचाहि नव्हे. जो येकनिष्ठपणें सेवा करितो त्याजवर कृपा करील हे सेवकाचे गुण सांगोन म्हणाली कीं, प्रभूस कोणी एखाद्यानें एखाद्याचा दोष समजाविला तर त्याचा शोध परस्पर करावा. पकेपणे दोष आसल्यास काय शासन करणें तें करावें. नाहीतर येकाचे वचनावर विश्वास ठेऊन घात न करावा. प्रभूस बल मुख्य दुर्गाचें. याजकरितां राज्यसंरक्षणार्थ दुर्ग चांगले असावे. जळदुर्ग, स्थळदुर्ग, आरण्यदुर्ग, मनुष्यदुर्ग व गिरिदुर्ग यांत गिरिदुर्ग म्हणजे पाहाडी किल्ला प्रशस्त यास्तव मध्यदेशीं जेथें तृण काष्ठपर्ण बहुत व ब्राह्मण, स्वत्र्य, वैद्य, शूर (ब्राह्मण–क्षत्रिय–वैश्य–शूद्र) जन बहुत राहातात असा पर्वत पाहून तेथें दुर्ग करावा. तोजवर शतावधी तोफा ठेवावया छ(प)र उंच करावे कीं अंबारीसुद्धा हस्ती ज्यामार्गे जाईल. त्यांत च्यार रस्ते करावे. येक रस्त्यात देवालय दुसरे स्थलीं राजगृह, तिसरे ठिकाणीं धर्माधिकार, चवथे रस्त्यांत दरवाजा गोपूर असावें. नगर वर्तुळ आथवा चौकोनी, त्रिकोनी मध्यें सूक्ष्म करावें. अर्धचंद्राकार नदीतीरीं वसवावें. अन्यत्र न करावें. राजगृहाचे दक्षिणेस गजशाळा पूर्वाभीमुख किंवा उत्तराभीमुख करावी. राजगृहाचे आग्नेय दिसेस शस्त्रे ठेवावी. राजगृहास वामभागी पुरोहिताचें घर असावें. मांत्रिक व वेदशास्त्रज्ञ वैद्य यास वामभागीं घरें करून द्यावीं. धान्यानोर, गोशाळा, आश्वशाळा उत्तराभीमुख करावी. दक्षणाभीमुख न करावो. तेथें च्यार प्रहर रात्र दीप ठेवावे. वानर, कोमडी, मेंढे किंवा सवत्स धेनू, शेळ्या आश्वशाळेंत नेहमी ठेवाव्या. गोशाळा, गजशाळा, आश्वशाळा यांतील मलमूत्र सूर्यास्तमानानंतर न काढावें. योद्धे, सुतार यास यथायोग्य जागा नेमून द्यावी. गो-वैद्य, आश्व-गजवैद्य, मांत्रिकादिक आगत्य संग्रही करावे. त्यास उपयोगी औषधें बाळगावीं, म्हणोन ताकीद असावी. ही कथा चातुर्यलतिका गुणसागरास सांगतो जाहाली ॥९५॥

कथा ९६

चातुर्यलतिका गुणसागरास सांगत आहे. प्रभूने पुत्रास विद्याभ्यास करवावे. आच्यार्य चांगले ठेवावे. तसे रक्षक न(नि)त्य संनीध राहाणार ते चांगले पाहून योजावे. धर्मशास्त्र अधिक पढवावें. धनुर्वेद शिकवावा. घोड्यावर व हस्तीवर बसावयाचा नित्य अभ्यास करून व्यायाम करवावा. चातुर्यकला संपूर्ण आसाव्या. आप्त पुरुष मान्य समीप ठेवावे. त्यांणी मिथ्या भाषण न करावें. हितपथ्य आसेल तें बोलत असावें. रक्षणार्थ मनुष्यें ठेविलीं म्हणजे राजपुत्रास विषाद होईल कीं चौकी मजला किमर्थ पाहिजे ? तेणेंकरून अमार्ग घडेल. यास्तव त्याचें संरक्षण करावयाचे निमत्यें करून मनुष्यें ठेवावीं. अति क्रोधी व अति लोभी अपमान्य पुरुष याचा संग

नसावा. यौवनांत येणार त्यासमई बहुत सावधानता ठेवावी. केवल इंद्रियांस वश्य जाल्यास राज्योपयोगी पडणार नाहीं जो सांगितल्यानें ऐकेना आणि इतर दुर्गुण करूं लागला तर प्रयत्नपूर्वक मार्गांत आणावा. ज्या कुळांत पुत्र कुमार्गांत वर्ततो तें कुळ व तेथें लक्ष्मी चिरकाल राहात नाहीं. याजकरितां पुत्रसंरक्षण आवश्य करावें. सिकार व मद्यपान व फाशे व दुर्व्यसनें सारीं न लागतां ते सत्पुरुष समागमें ठेवावे. दुर्गु(णा)चे सेवें करून पूर्वीं बहुत राजे भ्रष्ट पावले व सद्गुण सेवेकरून अरण्यांत राजे भ्रष्ट होऊन गेले ते पुन: राज्यारुढ जाहाले. राजपुत्रास दिवानिद्रा नसावी. कठोर भाषण न करावें. उग्रशासन त्यास दाखवावें. राजपुत्र म्हणोन चित्तास येईल त्यास उपद्रव करील तो पित्यानें निवारण करून पुत्रास सीक्षा करावी. कामक्रोध व मान व लोभ व दर्प नसावे. प्रथम या दुर्गुणास जिकावें. म्हणजे आज्ञेंत राहिल्याप्रमाणें वश्य करून मग राजयानें सेवक जिंका म्हणजे आपली मर्जी त्यांणी सांभालित असावी. मग आपले देश स्वाधीन करुन घ्यावे. कोठे काय खर्च व कोठे काय जमा याचा शोध असावा. गांवाचा जमाखर्च बाकी पाहून माहाल म्हणजे शंभर गाव तेथील व्यय पाहावे. नंतर सर्व राज्यांत आय पाहून व्यय किती आहे व राज्यांत प्रतिवर्षी शेष किती राहाते ते पाहावें, हें आपण सर्व स्वाधीन करून घेतल्यानंतर बाहेर शत्रू जिकावे. आपलें राज्य म्हणजे घर तें ज्याचें आज्ञेंत नाहीं त्यास शत्रु वश्य पादाक्रांत होणार नाहीं. याजकरितां क्रमेंकरून जय करावा. मित्र साधावे. त्यांत पिता, पितामहपासून येक मित्र असेल त्याची मैत्री करावी. तो उपयोगी पडेल. तिसरा संकटीं ज्यावर उपकार करून त्याचे प्राण वाचविलें तोही. तीन मैत्र राज्यास असावे. स्वामी आपण प्रधान व देश व दुर्ग आणि दंड व द्रव्य-संग्रह व मित्र येकूण राज्याचीं सात आंगें. त्यांत आपण खेरीज करून सहा आंगांचें मूळ आपण याजकरितां प्रथम आपलें संरक्षण करावें नंतर साहा आंगांचें रक्षण योजावें. या आंगांत ज्याचा विरोध आढळेल त्यांचे शासन करून येक विचारें वर्तवावें. प्रभूस आती मृदुता नसावी. आती क्रोध तो वर्ज्यच आहे. दारुन दंड प्रज्यास न करावा. केल्यास त्यास दु:ख होईल. तें राज्यास श्रेयस्कर नव्हे, सेवकाबरोबर परिहास न करावा.सर्व व्यसनें प्रभूनें वर्ज्य करावीं. लोकोपयोगी संग आसतील ते बाह्यमात्र बाळगावे. परंतु आसक्त नसावें. सदैव उन्मत्त व विषयाशक्त राजास पाहून प्रजेची आस्था राहात नाहीं. तेव्हां जमाबंदी न्यून होत्ये व्यय वृद्धीस पावतो. त्यांत आनर्थ आहेत. यास्तव सावध आसावें म्हणोन चातुर्यलतिका मैना गुण सांगती जाहाली ॥ ९६ ॥

कथा ९७

चातुर्यलतिका गुणसागरास सांगत आहे. सर्वांबरोबर प्रभूनें हास्यपूर्वक मधुर भाषण करावें. आपण मधुर बोलल्यानें ज्यास संतोष होईल ते दिगांतरी कीर्ति नेतील कीं, प्रभु चांगला आहे. आपलें काही यांत न्यून होणार नाहीं. ज्यास देहांत

प्रायश्चित द्यावयाचे त्याजकडे देखील वाकड भ्रुकुटीनें पाहूं नये मग वरकडाकडे तर पाहूंच नये. सरळ दृष्टीनें आवलोकन करावें. क्षुद्र लक्षण सांडावें. मोठें लक्ष धरावें. क्रोध येऊं नये. आल्यास शत्रु जिकावा. सेवक आथवा प्रजा याचे शासनास क्रोध नसतांहि कार्य होतें. सर्व कर्माचे ठाई दीर्घसूत्रता नसावी. परंतु द्वेषकर्म व व्यापकर्म आणि कोणाचें वाईट करावें तेथें दीर्घसूत्रता आसावी म्हणजे जें घडलें तें यथास्थित घडेल प्रमाद होणार नाहीं. राजकीय विचार केला तो गुप्तच असावा. मंत्र म्हणजे राज्याचें मूळ. याजकरितां सुरक्षित असावें परिस्फुट न व्हावा. लोक व शत्रूकडील बातमीदार माहा धूर्त असतात ते प्रभूचे नेत्रसंकेतानें व भाषण करून आकारें करून हृदयांतील तात्पर्य जाणतात. म्हणोन मंत्र सावधपणें रक्षावा. येणेंकरून राज्यवृद्धि पावेल. येकाकी मंत्रांचा निश्चय न करावा. बहुतहि नसावे. फार मिळोन केला तर उत्पन्न राहाणार नाहीं. वाकडे नौकेवर न बसावें. नावाडियाची परीक्षा करावी. जे आपले शत्रू आसतील ते सामदामभेद दंडेंकरून वश्य करावे. प्रभूनें सर्वदा न पाहिल्यास प्रजा कृश होतील म्हणजे बलवान आसेल तो निर्बळापासून द्रव्य घेईल म्हणजे प्रजा क्षीण होतील. त्या क्षीण जाल्यानें राज्य क्षीण होतें. यास्तव राज्यवृद्धि होय तें करावें. त्याचें मूळ हेंच कीं सदोदित आधिकारी ठेविले असतील त्याचा शोध बारीकपणें करावा. राष्ट्रापासून आपल्यास आन्नवस्त्र प्राप्त होतें. याजकरिता त्या राष्ट्राचें वर्तमान वरचेवर मनास आणीत जावें हें आयकून गुणसागरास चितात सवशय आला कीं दैव्य करून वृद्धि व क्षय होतो त्या अर्थी हा प्रयत्न आपण किमर्थ करावा ? असा संशय होऊन चातुर्यलतिकेस गुणसागराने विचारिलें कीं पुरुषास भाग्योदयास दैव कारण कीं प्रयत्न कारण हें सांगावे तेव्हां मैना म्हणाली कीं श्रवण कर. दैव म्हणजे जन्मांतरीं जें केलें कर्म त्याचें फल तें प्रालब्ध मात्र आणि प्रयत्न तर आपूर्वकर्में करून भाग्योदय करील. प्रतिकूलहि दैव आसतां प्रयत्नानें कार्यें होतात. ब्रह्मदेव प्रयत्न करून सृस्टि करितो तसेच दश आवतार घेणे हा प्रयत्न येणेंकरून विष्णु प्रजापालन करितो. तसाच सदाशिव प्रयत्नें करून त्रिशूळ धरून प्रज्या संहार करितो. या तिघांसहि प्रयत्नाची आपेक्षा आहे. मग इतरास हे प्रयत्नच आधिक हें काय सांगावें. ज्यास पराक्रम नाहीं व जे वैराग्यपूर्वक आत्मसाधन करणार ते मात्र दैवप्राधान्य व प्रयत्न व्यर्थ असें म्हणतात. परंतु दैव गुप्ताचे. पराक्रमें करून फळ घ्यावें. दैववादी याचा समागम प्रभूस नसावा त्याचे समागमें करून शरीरीं आळस येऊन प्रयत्न राहील हे अपकर्षाचें कारण यास्तव जे प्रयत्नवादी आसतील त्यांचा समागम असावा. जेणेंकरून शत्रू पराजयाचा उत्साह वर्धमान होईल. भूमीवर पर्जन्य पडून पीक होईल. परंतु आंग धरावयास प्रयत्न पाहिजे. त्याजवाचून सर्वथा धान्यवृद्धि होणार नाहीं. तस्मात प्रयत्न करून शत्रू जिंकावे. ईश्वर साध्य करावा. शरीर दृढ असावें. त्याचा उपाय इंद्रयनिग्रह करावा. हें सारें प्रयत्नाचें हातीं म्हणोन प्रयत्नच मुख्य. केवळ दैव भाग्योदयास मुख्य नव्हे

म्हणोन चातुर्यलतिका मैना गुणसागरास हें कथानक सांगती जाहाली ॥ ९७ ॥

कथा ९८

च्यातुर्यलतिकेस गुणसागरानें विचारिलें कीं सामदाम इत्यादिक उपायेंकरून शत्रु जिकावे म्हणोन सांगितलेस त्यास हे उपाय करावयाचे समय व कोणत्या शत्रु सांग. त्याजवरून चातुर्यलतिका सांगत आहे. साम दाम भेद दंड उपेक्षा माया इंद्रज्याल हे सात उपाय. त्यांत साधु माहाकुलीण सरळ व धर्मष्ट व जितेंद्रिय असा शत्रु सामेकरून वश्य करावा. त्याचे कुळसीळ वकील याचे मुखें वर्णऊन उभयतांनीं समान असतां युद्धांत पैशोपद्रव व शेनेचा नाश जाहाल्यास लाभ काय इत्यादिक भाषण सत्य करून बोलावें. तें तसेंच पार पाडावें म्हणजे ते वश्य होतील. जे माहामानी निरंतर आत्मस्तुति करणार व सर्व गुण आपले ठाईं असें जे मानितात त्यांस त्याचे गुणवर्णन करून सामेकरूनच वश्य करावे. आतां भेदाचे प्रकार. जेथें दोघांचा परस्पर कलह उत्पन्न जाहाला त्यांत येक पक्ष भेदास योग्य पाहून भेदावा. उभय विरोधांत जो आपल्यास साक्षी(?) यास बोलावितो त्यास त्याचें शत्रूचें भय दाखऊन आपण सर्वथा कृत्तोपकार करतो या (भा)षणे करून भेऊन आपले हस्तगत करावा. बहुत शत्रु येकवटले तर तेथे भेदच केल्याने जय होईल. त्यांत स्वमुखें भेद न करावा. साधारण आपला मित्र आसेल त्याजकडून करवावा. ज्याचे राज्यांतील मांडलीक असंतुष्ट होऊन आपल्याकडे सूत्र करितात हा बाह्यभेद, ज्या शत्रूचे अंतःपुरांत कांहीं आपमानें करून क्रोध वैमनस्य उत्पन्न होईल तसाच सेनापति अमात्य मंत्री राजपुत्र विरोधी जाल्यास त्याद्वारें भेद करावा. हा अंतःकोप. त्यांत बाह्यकोप उत्पन्न जाहला आहे आणि घर शुद्ध आहे तो शत्रु हस्तगत होणे कठिण. ज्याचे घरांत विरोध जाला आथवा उपायेंकरून आपण केलें तो तात्काल हस्तगत होईल. आपले शत्रूचा शत्रु आसेल त्यास आपलें बल दाखवून कलह करवावा. आपण साहित्यास जाऊन येक स्नेहानें दुसरा युद्धाने ऐसे दोघेहि जिकावे ज्याचें राज्यांत ज्ञातीचा कलह जाल्यास त्यास राज्याचा उपसर्ग लागला तर तेहि भेदकरून हस्तगत होतील. या कारणास्तव आपली ज्ञाती सुखी ठेवावी. ज्ञातिभेद माहा कठिण आहे. राज्यांत कोणाचें लक्ष काय आहे तें या कारणास्तव शोधावें लागतें. तेव्हां दूतसंग्रह करून बातमी असावी. यानंतर दानाचा विचार. सर्व उपायांत दान श्रेष्ठ. असा कोणी पुरुष नाहीं कीं, जी दानेंकरून वश्य न होय. दानकर्ता सर्व लोकांस प्रिय होतो. दानेंकरून सर्व येकवटले असतां सर्व आपले हस्तगत होते. जे लोभ नव्हेत गंभीर समुद्रतुल्य त्यांणी पक्षपात केला असतां ते द्रव्य जरी न घेत तथापि याची स्नेह करितील. दानेंकरून देव देखील वश्य होतो मग मनुष्य वश्य होतील याचें आश्चर्य काय. जे तिही उपायांनीं वश्य न होत त्यांस दंडेंकरून वश्य करावें. आपलें व शत्रूचें बळ पाहून आपण अधिक आसलियास वैर करावें. नंतर आपलें व परकीयांचे राज्यांत सिद्ध पुरुष कोणी तपश्वी निस्पृह निःसंग असे असतील त्याची

आज्ञा घेऊन राज्यभार त्याजकडे ठेऊन युद्ध करावें. जय होईल. सर्व बळापेक्षा हें बळ उत्कृष्ट. ज्याचे वचनमात्रेंकरून सकल मनोरथ पूर्ण होतात याजकरितां त्याचे आनुमतेंकरून जें करणें तें करावें. बळवान शत्रु आहे त्याचे सेवकांनीं न समजून आज्ञा नसतां आपला स्वल्प अपराध केला म्हणोन वैर उत्पन्न करावें. हें उपेक्षेचें स्थल. केवल आणि लघु कपटरासी असे शत्रु माईक ममतेनेच भाषण करून वश्य करावे. जे केवल विषयासक्ती नित्य पाहणार त्यास इंद्रज्याळीक म्हणजे बंगाली विद्या देणें करून आश्चर्याची वस्तु पाठवून हस्तगत करावें. या स्थलीं बंगाली मनुष्याचा देखील उपयोग आहे. मग चांगली मनुष्यें असतील त्यांचा संग्रह कसा नसावा. आवश्य आसावा. राज्य थोर हें बहुत भाग्येंकरून व प्रयत्नें करून चिरंजीव होतें याप्रमाणें सात उपाय चातुर्यलतिका गुणसागरास सांगती जाहाली ॥ ९८ ॥

कथा ९९

चातुर्य लतिकेस गुणसागरानें विचारिलें की पृथ्वीपती याणी युध्धार्थ जावें याचा विचार व समय सांगावा. त्याजवरून चातुर्यलतिका गुणसागरास सांगत आहे. ज्या समई आपले सैनिक सुखी द्रव्य त्यास पावले आतां मी पराक्रम करीन ऐसें प्रभूचे चित्तांत येईल तेव्हां यात्रा म्हणजे स्वारी करावी. बरोबर सैन्य घ्यावें. त्याहून बहुत मूळ संरक्षणार्थ ठेवावे. बुणगे फार जतन करावे. सेनेची उपजीविका बुणग्यांत त्या अर्थी त्याचें रक्षण सावधानपणें करावें मग यात्रेस जावें हा येक समय. आपला शत्रु आहे त्यास माहासंकट प्राप्त जाहालें ऐसी संधी पाहिल्यास त्या वेलेस निघोन जावें. हा दुसरा समय. दुर्लभ ज्याचे राज्यात भूकंप होतात. विजा पडतात, ग्रहयुध्धे होतात सकट दुर्भिक्षेही आहे आभ्यंतर कोप म्हणजे घरांत कलह लागला आहे त्याजवर त्या समईंच जावें हा तिसरा. जो नास्तिक मर्यादा टाकून वर्तती, आमंगळ भाषण करितो सेवेंत येक विचार नाही, निःसार व्यसनां त्याजवर तेव्हांच स्वारी करावी, हा चौथा समय. सैनिकास ज्याचे राज्यांत उत्साही नाहीं, अंगस्फुरण व स्वप्न विपरीत होतात व त्याचा आपकर्ष समय व आपला उत्कर्ष तेव्हां स्वारी करून सहजांत शत्रू जिकावा, याप्रो संधी पाहावी. पायदळ व हस्तीहि ही शेना बहुत असलियास वर्षाकालीं स्वारी करावी. रथ घोड्याची सेना विपुल असल्यास हेमंत व शिशीर ऋतूंत स्वारीस जावें. खेचर व उंट सांडणी याची सेना प्रबल असतां ग्रीष्मकालीं स्वारी करावी. हस्ती, घोडे, रथ, पायदळ चतुरंग सेना घेऊन जाणे तर वसत ऋतु आथवा शरत्काल या समईं स्वारी करावी. जर पायदलाची मात्र आपली सेना आहे तर दूरदेसीं न जावें. आपले समीप शत्रु आल्यास युध्ध करावें. झाडींत शत्रु भोवता कांहीं चिखल अशा स्थलीं हस्ती घेऊन जावें. रथ व घोडे बहुत असतां समान भूमीस जाऊन युध्द करावें. शत्रु भुईकोटाचे आश्रयें राहिला असतां अश्वसेना सेना घेऊ(न) जावें. शत्रु पर्जन्यामुळें बाहेर निघत नाहीं अशा संधींत खेचरें उंट यांची सेना पाठवावी. जेथें बर्फ पडते त्या शत्रूवर ग्रीष्मऋतूंत

स्वारी करावी. शरत्काल व वसंतऋतू हे साधारण समय यांत आपलें बळ पाहून यात्रा करावी. दैवज्ञ मांत्रिक ब्राह्मण समागमें असावे. जय भूमिका अनुकूल वायु व राहु योगिणी इत्यादिक विचार यांणीं सांगावे म्हणजे आपला जय होईल. अंगस्फुरण व स्वप्नचिन्हें मंगलदायक पाहावीं. बाहेर निघतेसमई शकून व्हावे. श्वेतपुष्प, पूर्ण कुंभ व धेनु, अश्व, हस्ती वेश्या पालखी सोन्यें रुपें रत्नें घृत दधी दूध इत्यादिक मंगल शकून जाल्यास स्वल्पहि सेना असतां शत्रु पराजय होईल. देव ब्राह्मण तपस्वी यांचे आसीरवादेंकरून आपला जयच यांत संशय नाहीं. याजकरितां प्रभूने राजनीती पाहून तदनुकूल वर्तावें. तेणेंकरून राज्यलक्ष्मी चिरकाल वंशपरंपरेनें व धर्मानें राहील. सकळ प्रज्या सुख पाहून आसीरवाद देतील. सर्वोत्कर्ष प्रभूचा होईल. याप्रमाणे राजनीतीच्या कथा व केवळ नीतिकृपा करून गुणसागरास च्यातुर्यलतिका सांगती जाहाली. गुणसागरहि कृतकृत्य जाला. ॥ ९९ ॥

कथा १००

या आपूर्व कथा गुणसागरानें आईकून चातुर्यलतिकेस साष्टांग नमस्कार केला. नंतर चातुर्यलतिका म्हणाली कीं, राजा सीवदत तुझा पिता बोलाऊन आणावा. त्याजवरून गुणसागरानें सिवदतास सारिकेजवल आणिले. उपरांत मैना राज्यास म्हणाली, जे तुझा पुत्र राज्य करावयाचे उपयोगी जाहाला. आतां मी स्वस्थानास जाईन. मजला बाहेर काढणें. तेव्हां सिवदताने सारिकेस पिंजरियाबाहेर काढून रत्नाची चौकी आणून त्याजवर बसविली. ती साक्षात चिंतामणीनें दिधली म्हणोन पूजा केली. ते समईं पितापुत्र यांचा भाव शुध्ध पाहून आपले सरस्वतीरूप प्रत्यक्ष दाखविलें आणि सांगितलें कीं, तुम्हा उभयतांस मी प्रसन्न जाहाले आहे. त्यांस तूं आजपर्यंत राज्य केलें आतां पुत्रास राज्याभिषेक करून तूं ईश्वरभजनीं लागावें हेंच मी आल्याचें सार्थक. माझे आसीरवादेंकरून तुझें राज्य परंपरेनें आक्षय राहील. तुझा पुत्र गुणसागर सकल शत्रु पादाक्रांत करून येकछत्र राज्य करील. ऐसें वरदान देऊन गुणसागरास म्हणाली कीं, तुजकरितां राजा सिवदत याणें मजला माहाप्रयत्नेंकरून आणिलें. मी तुजला दिव्यकथा व राजनीति सांगितल्या. त्यास तुझी बुद्धि विषयासक्त असतां सर्व व्यसनें सोडून राज्य करावया योग्य जाहाली कीं ही कीर्ति सिवदत व तूं व मी या त्रिवर्गांची. पुढें कलियुगांत शालिवाहन शकांत यवन संव्हार करावयास श्रीविष्णु साक्षांत पुण्यनगरी पूर्णावतार घेईल त्या समईं त्या विष्णूची निजभक्ती करून ग्रंथ करून कीर्ति विस्तार करील, ऐसा वर देऊन सरस्वती उभयेतां पितापुत्रांस विचारून आदृश्य जाली. राजा सिवदत याणें सुमुहूर्त पाहून समस्त ब्राह्मण व प्रज्या आणून गुणसागरास राज्याभिषेक केला. उपरांत आपले सचीव व सिष्ट ब्राह्मण व प्रज्या यांचे हातीं पुत्र देऊन आपण आत्मसाधन करावयास निघोन गेला. गुणसागर याणे सिवदत्तापेक्षा प्रज्यारंजन आधिक केलें. सर्वोत्क्रुष्ट राजा सार्वभौम जाहाला ॥ ते हे सारिका शतक कथान(क) चातुर्यलतिका

सरस्वतीचे प्रसादेंकरून सिध्ध केलें आणि साक्षांत श्रीविष्णूचा पूर्णावतार सकल सामंत चक्रवर्ती दुष्ट संहारार्थ भूमंडळीं अवतार घेऊन स्वतेजेंकरून पूर्व पश्चम दक्षण उतर च्यारी दिशांचा जय करून शत्रु पादाक्रांत केले होते. हा पुण्यनगरी विराजमान प्रत्यक्ष विष्णु हें सत्य मानून श्रीमंत राज्याधिराज माधवरावसाहेब प्रभुचरणोपासक गोखलोपनामक बापूजी गोविंद याणें इतर देवदेवतेची उपासना सोडून येकनिष्ठपणें प्रभुचरणोपासना सात वर्षे केली, त्यांत हा ग्रंथ नवीन योजून दयानिधीस सत्यभावें अर्पिला. येणेंकरून जसी गुणसागराची कीर्ति हाली विस्तारास पावली याप्रमाणें श्रीमाहाविष्णु रावसा×× धन त्याचे कृपादृष्टीने हा ग्रंथ दिगांतरीं विख्यात होईल. जो हा ग्रंथ वाचील त्याजवर प्रभूची कृपा होईल. प्रभूनें पाहिल्यानंतर सकल शत्रू हस्तगत होतील हे साक्षांत विष्णु सवाई माधवरावसाहेब कृपाळू यांचे कृपेनें हृदयस्थ सरस्वतीचे प्रेरणेनें लिहिलें. या ग्रंथ प्रयुक्त जे श्रम जाहाले आहेत त्याचें रूप श्रीविष्णु स्वरूप करील. आद्भुत कल्पना नीतीचा आधार न सोडितां सिद्ध केली यास्तव कोणी दुसरीं मननें आपलें कवन घालावें. हे माहाआख्यान प्रभुप्रीत्यर्थ करून समर्पण केलें असे. म्हणोन वारंवार सेवकाची विज्ञापना स्वामीचरणारविंदी सत्य त्रिसत्य विदित असावी विदनराज प्रसन्न ॥ १०० ॥

सके १७३१ शुक्ल नाम संवछरे माहे जेष्ठ व॥ ४ चतोर्थी गुरुवार मु॥ साष्टी हस्ताक्षर जनार्दन गोविंद कारकून वि॥ सरकार

॥ श्री जगदंब प्रसन वरदोभव ॥

॥ श्री रामचंद्र प्रसन वरदोभव ॥

● ● ●

३. गोसावीदासांची शतश्लोकी टीका

कै. ना. य. मिरीकर

हा ग्रंथ माझा मित्र रा. दत्तोपंत मोने यांच्या सग्रहीं मिळाला. ग्रंथ मोठ्या व रुंद पानांवर लिहिला असून एकंदर पृष्ठें ७८ आहेत. प्रत शके १७९१ मध्यें केलेली आहे. या ग्रंथांत गोसावीदासांनीं श्रीशंकराचार्यांच्या ‘ वेदान्तकेसरी ’ उर्फ ‘ शतश्लोकी ’ या नांवाच्या शंभर श्लोकांवर ओवीबद्ध टीका केली आहे. ग्रंथप्रारंभीं श्रीशंकराचार्यांस नमन करुन नंतर आचार्यांचें त्रोटक चरित्र दिलें आहे व नंतर टीकेस आरंभ केला आहे. अखेरीस गोसावीदासांनीं आपली गुरुपरंपरा देऊन समाप्ति केली आहे.

प्रारंभ :–

जयजय श्री आचार्या ॥ सर्व ज्ञानियांमाझी वर्या ॥ बुद्धिप्रकाशका सूर्या ॥ ज्ञान-
दात्रे जगद्‍गुरो ॥ १ ॥ तुम्हीची अवतार भेदानें ॥ युगायुगामाजि संभावणें ॥
अधर्म उछेदुनि धर्म स्थापणे ॥ स्वभावकर्णे तुझें पै ॥२॥ श्री गणपतीरूपें करोन ॥
विघ्नहर्ता तूं गजानन ॥ चारी पुरुषार्थ हेचि पूर्ण ॥ चार भुजा शोभति ॥ ३॥
नमो आतां वागेश्वरी ॥ ब्रह्मविद्येनें मानस भरी ॥ नवरशीं वक्तृत्वा गोड करी ॥
परि सर्व ज्ञानियां संमत ॥ ४ ॥ आतां नमो स्वामी गुरू ॥ जो ज्ञानप्रकाश भास्करू ॥
जाचे कृपें भवसागरू ॥ मृगजळवत होतसे ॥ ५ ॥ पूर्वि बौधमत मातलें ॥ वेदमार्गातें
भ्रष्ट केलें ॥ कर्म उपास्ती ज्ञान खंडिलें ॥ हें पाहिलें साधुजनीं ॥ ६ ॥ ब्रह्मविद्या
पुढें करून ॥ गेले कैलाशी शरण ॥ वेदस्तुती स्तोत्रें करून ॥ उमारमणा प्रार्थिती ॥ ७ ॥
स्तवन ऐकोनि अद्‍भुत ॥ प्रसन्न जाहाला उमाकांत ॥ म्हणें पूर्विच तुमचा वृत्तांत ॥
श्रृत मज सर्व असे ॥ ८ ॥ आतां स्वस्थ असावें अंतरीं ॥ तुम्ही जावें आपुले घरीं ॥
आम्ही एतसों पृथ्वीवरी ॥ वेदोद्धार करावया ॥ ९ ॥ मग देवांतें अज्ञापित ॥
आ(प)ले अंशत्वें त्वरित ॥ अवतार घरोनि समस्त ॥ आध्यायनें संपादावीं ॥ १० ॥
आम्ही एतसों निगुती ॥ वादमिषें तुम्हाप्रती ॥ जिंकोनि दुष्टाचि शांति ॥ करणें
अवश्य हे आत्मा (म्हा ?) ॥ ११ ॥ ऐकोनि देव संतोषले ॥ अवतार सर्वांनीं
धरिले ॥ मुख्य विष्णु होते जाले ॥ पद्मपाद या नांवें ॥ १२ ॥ इंद्र राजा सुधन्वावीर ॥
स्कंद तो भट्ट प्रभाकर ॥ ब्रह्मदेव तो मंडणमिश्र ॥ सरस्वती भार्या जयाची ॥१३॥
बृहस्पतीचा अवतार ॥ आनंदगिरी चतुर ॥ वायूचे अंश धरेधर ॥ हस्तामल
त्रोटकी ॥ १४ ॥ यावरी स्वयें त्रिपुरारी ॥ केरळ देशा माझारी ॥ मायामिषें दिव्य
शरीरीं ॥ प्रगट होत स्वैछा ॥ १५ ॥ शिवगुरु नामें ब्राह्मण ॥ सकळ वेदशास्त्र-
प्रवीण ॥ सती पत्नी परम निपुण ॥ भर्तृसेवनीं तत्पर ॥ १७ ॥ धनधान्यें समृद्धि-
मंत ॥ परी संततीवीण संतप्त ॥ मग पुत्रकामें गौरीकांत ॥ दिव्य तपें आराधिती ॥१७॥
सात्त्विक तप सुंदर ॥ देखोनि संतोषला खट्वांगधर ॥ पुत्रविषयक देवोनि वर ॥
अंतर्धान पावला ॥ १८ ॥ नवमास होतां सती ॥ पुत्र प्रसवली दिव्य कांति ॥ स्वरूप
देखोनि दंपति ॥ ब्रह्मानंदीं डुल्लत ॥ १९ ॥ पुष्पें वर्षोनि सुरवर ॥ स्तुति करी [illegible]र ॥
बारावें दिनीं श्रीशंकर ॥ नाम ठेविलें कौतुकें ॥ २० ॥ पंचम वर्षी मौजीबंधन ॥
होतां संपादिलें विद्याधन ॥ वेदशास्त्रादि अध्यायन ॥ सांगोपांग सिद्ध जैसें ॥ २१ ॥
साधनचतुष्टयसंपत्ति ॥ साधोनियां शास्त्ररीतिं ॥ अमानित्वादि गुणसंपत्ति ॥ सेवा-
वया योग्य जे ॥ २२ ॥ अष्टम वर्ष संपतां ॥ जाहाला आश्रम संपादिता ॥ दिग्वि-
जयाची उछुकता ॥ धरिते जाहले मानशीं ॥ २३ ॥ मंडनमिश्रातें जिंकिलें ॥ सकळ
वाद विभांडिले ॥ सरस्वतीचाहि हरिले ॥ गर्वाप्रती ते काळीं ॥ २४ ॥ वाद करितां
मडण ॥ कुंठित होतां आला शरण ॥ तयातें संन्यास देवोनि ॥ शिष्य केला आवडी
॥ २५ ॥ देशोदेशीं जिंकित ॥ सकळ कुतर्क खंडित ॥ जबुक संग विभाडित ॥ सिंह

तैता प्रतापी ॥ २६ ॥ ऐसा दिग्विजय केला ॥ वेदमार्ग स्थापिला ॥ ज्ञानमार्ग उपासिला ॥ अधिकार भेदें करोनि ॥ २७ ॥ तो शंकराचार्य मुकुटमणि ॥ भक्त कल्पद्रुम कैवल्यदानी ॥ सूत्रभाष्यादि ग्रंथ निर्मुनि ॥ मोक्षमार्ग रक्षिला ॥ २८ ॥ त्यांत शतश्लोकी ग्रंथ ॥ त्याची टीका करावया प्राकृत ॥ विनय आज्ञा असे मागत ॥ श्री गुरुराय जवळिके ॥ २९ ॥ ग्रंथ संस्कृत असे दुर्बोध ॥ पदें समास क्रिया असे अगाध ॥ शास्त्रार्थ विविध प्रसिद्ध ॥ ठायीं ठायीं दिसताती ॥ ३० ॥ म्हणोनियां श्रीगुरुराया ॥ विनवीतसे तव पायां ॥ सर्व अर्थ उकलावया ॥ बुद्धिप्रदाता तूंचि पैं ॥ ३१ ॥

यानंतर टीकेस सुरवात झाली आहे. श्रीशंकराचार्यांचें ओवीबद्ध चरित्र, त्रोटकपणें का होईना, परंतु एका सत्पुरुषानें केलें आहे, तें आदरणीय वाटल्यावरून वरील उतारा विस्तारानें दिला आहे. ग्रंथाच्या शेवटीं गोसावीदासांनीं आपली गुरुपरंपरा दिली आहे, ती अशी :–

आतां श्रीगुरूची परंपरा ॥ मूळापासोनि अवधारा ॥ आदि गुरु सर्वेश्वरा ॥ नारायणातें जाणिजे ॥ ५५ ॥ तयापासोनि ब्रह्मा चतुर ॥ तयाचा पुत्र अग्नि प्रखर ॥ श्री दत्तात्रय त्यांचा कुमर ॥ जगद्गुरु दयाळु ॥ ५६ ॥ त्याचा शिष्य जनार्दनपंत ॥ तयांचा शिष्य येकनाथ ॥ ज्यांचा महिमा अद्‌भुत ॥ सर्व लोक जाणती ॥ ५७ ॥ गोदातीरीं पैठण क्षेत्र ॥ समाधिस्थान तेथें पवित्र ॥ षष्टी महोछाह विचित्र ॥ लोकप्रसिद्ध अद्यापि ॥ ५८ ॥ तो स्वामी एकनाथ ॥ ठाकुरदासाचा गुरु निश्चित ॥ पंढरपुरीं मंडपांत ॥ प्रगटोनि बोध उपदेशिला ॥ ५९ ॥ तो ठाकुरदास गुरु ॥ ज्ञानप्रकाशा भास्करु ॥ गोसावीदासाचा संसारू ॥ मोक्षरूप त्यांचे नि ॥ ६० ॥

यावरून गोसावीदासाची गुरुपरंपरा श्रीसर्वेश्वर नारायण–ब्रह्मदेवअत्रि–श्रीदत्तात्रय–जनार्दन–एकनाथ–ठाकुरदास–अशी येते. एकनाथांचे शिष्य–ठाकुरदास. त्यांनींच संतकाव्यसूचीमध्यें नमूद केलेली 'एकनाथाची आरती' केली असावी. यांना पंढरपूरच्या मंडपांत श्रीएकनाथांनीं गुरूपदेश केला, ही माहिती आज नवीनच मिळत आहे. 'सहजबोधा' चे कर्ते ठाकुरदासबाबा हेच असणें संभवनीय आहे. यावरून ठाकुरदासांचा काल एकनाथानंतर ४० वर्षांपर्यंत म्हणजे शके १५५० चा सुमार हा मानण्यास हरकत नाहीं.

गोसावीदास हे ठाकुरदासांचे शिष्य, अर्थात् त्यांचा काल म्हणजे एकनाथांपासून शंभर वर्षांच्या आंतच असावयास पाहिजे. प्रस्तुत ग्रंथाच्या शेवटीं पुढील रचनाकाल दिलेला आहे–

शके सत्राश अष्टषष्टी ॥ पींगल नाम संवत्सरी ॥ पौष कृष्ण ३ पुण्यदिनीं ॥ श्री वाराणशी भूकैलास प्रत्यक्ष ॥ तेथें मठी करोनि रहिवास ॥ लिहुन टीका समाप्तिस ॥ श्रीराम सद्गुरुचरणीं समर्पिले ॥ श्री विश्वेश्वरार्पणमस्तु ॥ ॥ शके १७९१ शुक्ल नाम संवत्सरे मार्गशिर्ष वद्य १२ गुरुवासरे पुस्तक लेखन समाप्त ॥ श्रीगुरु ॥

यांतील शके १७९१ मध्ये प्रस्तुतची प्रत तयार झाली, हें उघड आहे. परंतु ग्रंथाचा रचनाशक १७६८ दिला आहे. हें जरा चमत्कारिक आहे. कारण हा काल एकनाथांनंतर सुमारें अडीच वर्षांचा आहे. गोसावीदासांचा हा काल येणें संभवनीय नाहीं. हा प्रमाण धरल्यास गोसावीदास अगदीच आधुनिक संत होते, हें म्हणणें प्राप्त होतें. त्या अर्थी रचनाकाल शके १७६८ असणें शक्य नाहीं. शिवाय त्या शकांत पिंगल संवत्सर येत नाहीं. वरील उताऱ्यांतील काल अर्थात् चुकीचा आहे. नकल करणारानें नीट न पाहातां कांहीं तरी काल लिहिला आहे, हें उघड दिसतें. तथापि गोसावीदासांचा काल निश्चित करण्यास एकच उपाय व तो म्हणजे पिंगल संवत्सर प्रमाण धरणें हा होय. शके १५९९ मध्यें पिंगल संवत्सर येत आहे. व हा काल एकनाथांनंतर ८० वर्षांनीं येत असल्यानें तोच रचनाकाल धरणें सयुक्तिक दिसतें. यावरून पाहातां गोसावीदासानें शतश्लोकी टीका काशी येथें मठांत पौष वद्य ३ शके १५९९ या दिवशीं संपविली, हें निश्चयानें म्हणतां येतें.

गोसावीदासांनीं टीकेमधून श्रीशंकराचार्यांच्या कांहीं गोष्टी सांगितल्या आहेत. त्यापैकी त्रोटकाचार्यांची कथा सांगतांना त्यांनीं पुढील उल्लेख केला आहे–

ग्रंथ श्री शंकर विजय ।। जेथें वर्णिला दिग्विजय ।। त्रोटककथेचा अभिप्राय ।। तयामाझी कथियेला ।। ९१–३० ।।

त्याचप्रमाणें त्यांनीं मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम या संतांचाहि उल्लेख केला आहे व विवेकसिंधु, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, रुक्मिणी-स्वयंवर या ग्रंथांचाहि नामनिर्देश केला आहे.

ऐसा संतांचा महिमा ।। जाली बोलावयाचि शिमा ।। एकनाथा घरीं प्रमा ।। मेघःशामा लागला ।। ८६–२४ ।। गंध उगाळी वाहे पाणि ।। घोडी धुवितां रणांगणि ।। दाशी जनाबाईच्या शेणि ।। अंगें हरी लावीतसे ।। ८६–२५ ।। ज्ञानोबाची चालवी भींत ।। हेल्यास बोलावून केला मुक्त ।। भक्त महिमा अद्भुत ।। शेषादिका न वर्णवे ।। ८६–२६ ।। संजय आणि सौती ।। तुका नामदेवादि असती ।। एवं जातिवर्णाविषइं चित्तिं ।। सशय कोणी न करावा ।। ९१–५ ।।

तुकारामानंतर वीस वर्षांनीं गोसावीदास त्यांचा निर्देश करीत आहेत, हें विशेष आहे. एखाद्या श्लोकावरील टीका नमुन्यादाखल घ्यावी. परंतु विस्तारभयास्तव देत नाहीं. परंतु ग्रंथ अगदीं सरस असून प्रसिद्ध करण्यास योग्य आहे, असें माझें मत झालें आहे.

● ● ●

४. विजापूरचा एक प्राचीन कवि : लक्ष्मीपति

श्री. नारायण बळवंत जोशी

विजापूरमध्यें शके १५३२ ते १६३२ पर्यंत होऊन गेलेला रुक्मांगद पंडित यांची शिष्यपरंपरा बरीच मोठी होती. तो संत होता, तसा कविहि होता. त्यानें संस्कृत, मराठी, हिंदी व कानडी या चार भाषांत बरीच रचना केली असून, तिच्यापैकीं फार थोडी का होईना आतां हातीं लागली आहे. त्यानें लिहिलेले दोन छोटेखानी ग्रंथ—' बोधभक्तितरंगिणी ' व ' स्वानंदसुरद्रुम ' त्रुटित स्वरूपांत का होईना — उपलब्ध झाले आहेत. या दोन ग्रंथांची ओळख मीं पूर्वींच ' इंद्रायणी 'च्या मे १९६३ च्या अंकांत करून दिली आहे.

रुक्मांगदाच्या कांहीं शिष्य-प्रशिष्यांनींहि मराठी, कानडी, हिंदी या भाषांत पदें व ग्रंथ लिहून सारस्वतांत भर घातली आहे. त्याच्या परंपरेंतील रुक्मजदासानें सद्‌गुरु रुक्मांगदाचें चरित्र लिहिलें असून, तें प्रसिद्धही झालें आहे. यानेंच काखंडकीच्या महीपतिस्वामीचें चरित्र लिहिलें आहे. मात्र त्याचा फक्त पहिलाच अध्याय मिळाला आहे. विजापूरच्या परिसरांत होऊन गेलेल्या संतांचीं चरित्रें लिहिण्याचा त्याचा विचार होता, असें त्यानें पुष्पिकेंत केलेल्या ' गुरुमालिकाग्रंथ ' या निर्देशावरून वाटतें. रुक्मांगदाचा पट्टशिष्य राजीवानंद याचें लिखाण अजून तरी मिळालें नाहीं; पण त्याचा शिष्य भगवंत यानें लिहिलेल्या ' प्रश्नावळि ' या दहा-प्रकरणीं ग्रंथाचीं कांहीं पानें माझ्या संग्रहांत आहेत. पूर्ण ग्रंथ मिळण्याची आशा मी बाळगून आहें. राजीवानंदाच्या एका गुरुबंधूनें लिहिलेलीं कांहीं मराठी व हिंदी पदें माझ्या हातीं लागलीं असून, त्यांचा परिचय करून देण्याची इच्छा मी ' इंद्रायणी 'च्या उपरिनिर्दिष्ट लेखांत व्यक्त केली होती. पण ' इंद्रायणी 'चें प्रकाशन पुढें बंद पडल्यानें ती पूर्ण करतां आली नाहीं. आतां या लेखांत तो मानस पूर्ण करण्याचें योजिलें आहे.

' लक्ष्मीपति ' ही मुद्रा धारण करणाऱ्या या कवीनें आपल्या कांहीं पदांत आपण रुक्मांगदाचे शिष्य असल्याचें स्पष्टपणे नमूद केलें असल्यानेंच, त्याचा काल कळतो; पण तोहि अजमासें. त्याची नक्की अशी हयात किती वर्षांची व त्यानें रुक्मांगदाचें शिष्यत्व कोणत्या वयांत व कशा परिस्थितींत पत्करिलें, त्याचें कायमचें वास्तव्य-स्थल विजापूर कीं आणखी कोणतें गांव, त्याची जात व कुल यांपैकीं कशाचाच पत्ता अजून तरी लागला नाहीं. इतकेंच नव्हे, तर रुक्मांगदाच्या शिष्यपरंपरेंतील जीं थोडीं जुनीं घराणीं विजापूर येथें आहेत त्यांना याचें नांव ऐकूनहि माहीत नाहीं. याचें कारण कदाचित् हेंहि असूं शकेल कीं, औरंगजेबानें शके १६०८ (इ. स. १६८६) मध्यें विजापूरच्या आदिलशाही घराण्याच्या केलेल्या

नायनाटाबरोबरच विजापूर शहराचाहि जाळपोळ, कत्तल वगैरेंनीं नायनाट केला. त्यामुळें विजापुरांत पांच-पन्नास घराणीं कशीं तरी तग धरून राहिलीं; बाकी एक तर कत्तलींत मारलीं गेलीं; महामारी, प्लेग वगैरेंचा जो उपद्रव झाला त्यांत दगावलीं अथवा परागंदा झालीं. रुक्मांगद पंडिताची हयात शके १५३२ ते १६३२. रुक्मजदासानें त्याची जन्मतिथि दिली नसली, तरी त्यांचा समाधिदिन तिथि, वार, शक यांचा निर्देश करून दिला आहे. लक्ष्मीपति एका पदांत म्हणतो—

अनंत जन्मांचें सुकृत । आजि वोढूनि आणी मातें ॥
विठोबाचे चरण देखिले । परमानंद जालें येणें जाणें गेलें ॥

हा प्रसंग कोणत्या शकांतला, हें समजण्यास पदांत कांहीं आधार नाहीं; पण एक अंदाज करतां येण्याजोगा आहे कीं, रुक्मांगद पंडित शके १५६८ मध्यें पंढरपुरास गेला होता व याचा स्पष्ट उल्लेख रुक्मजदासानें रुक्मांगदचरित्रांत केला आहे. हा शक शिवराज पूर्णानंदांच्या आयुष्यांतील एका महत्त्वाच्या घटनेशीं जुळता आहे, हें ध्यानांत घेतां या घटनेबाबत व शकाबाबत शंका घेण्याचें कारण नाहीं. हें संभवतें कीं, लक्ष्मीपतीस याच वेळीं रुक्मांगदानें आग्रहानें, पंढरपुरास नेलें असावें व म्हणून तो 'वोढुनि आणी मातें' असें म्हणत असावा. हा तर्क चुकीचा ठरूं नये, असें वाटतें. या वेळीं लक्ष्मीपति १८–२० वर्षांचा होता असें समजल्यास अंदाजें शके १५५० ते १६०८ ही त्याची हयात ठरूं शकेल. शिवाय एका पदांत तो म्हणतो कीं, पांडुरंगानें मज पापिष्टावर दया करावयाची गोष्ट गुरू रुक्मांगदाच्या हातांतील आहे. यावरून हें पद त्यानें रुक्मांगद हयात असतांना रचलें आहे.

लक्ष्मीपतीचीं पदें ज्या हस्तलिखितामध्यें मिळालीं तें हस्तलिखित म्हणजे एका वहीचीं सुटीं व अधलीं-मधलीं पानें या स्वरूपाचें आहे. मूळ वही निदान १५०–१७५ पानांची तरी असली पाहिजे. त्या वहींतील फक्त ४९ पानें हातीं लागलीं आहेत. बरींच पानें फाटलीं असल्यानें मजकूर त्रुटित आहे. मिळालेल्या सुट्या पानांमध्यें सूरदास, तुळसीदास, वगैरेंचीं कांहीं हिंदी पदें असून पुरंदर विठ्ठल वगैरेंचीं थोडींशींच कानडी पदें आहेत. ज्ञानेश्वर, नामदेव, गोसावीसुत, वासुदेव, माधव वगैरेंचे कांहीं मराठी अभंगहि आहेत. मात्र प्रामुख्यानें रुक्मांगदाचीं संस्कृत, मराठी, कानडी व हिंदी पदें यांत असून लक्ष्मीपतीचीं मराठी व हिंदी पदें जवळ जवळ बरोबरीनें आहेत. यांत एक पद रुक्मांगदसुताचेंहि आढळलें. रुक्मांगदसुताचें आतांपर्यंत एकहि पद पहावयास मिळालें नव्हतें. एकंदरींत या वहींत रुक्मांगद पंडिताची व त्याच्या परंपरेंतल्या कवींची रचनाच असावी, असें दिसतें. ही संपूर्ण वही मिळाली असती, तर काय बहार झाली असती! यांतील एका पानावर मध्येंच घुसडलेलें मानपुरीचेंहि एक पद आहे. हें पद श्री. ढेरे व प्रा. कामत यांनीं नुकतींच मानपुरीचीं जीं पदें प्रसिद्ध केलीं, आहेत, त्यांत मिळत नाहीं. या वहींतील हस्ताक्षर एकाचें नाहीं. निदान चार-पांच निरनिराळ्या व्यक्तींचीं हस्ताक्षरें

दिसतात. एकंदरीत ही वही निदान २००–२२५ वर्षांची जुनी असावी. मात्र पुरीचा समाधिकाल शक १६५२ मधील, पण त्याचें पद नंतर घुसडलेलें आहे त्या अर्थी ही वही शक १६५०–६० मधील असणेंच संभवतें. यांतील एकाहि पानावर वॉटरमार्क नाहीं, शिवाय कागदांची जाडी एकसारखी नाहीं.

लक्ष्मीपतीचीं पदें—ज्यांमध्यें शेवटीं मुद्रा आहे तेवढीच विचारांत घेतां – मराठी २३ व हिंदी ५१ आढळलीं. तीं बहुतेक सर्व रागदारीवर आहेत. ओवी अथवा अभंग जवळ जवळ नाहींतच. त्याचप्रमाणें इतर वृत्तांतील रचनाहि आढळत नाहीं. ओवी कां लावणी, हें निश्चित सांगतां येत नाहीं, असें जरासें मिश्र रचनेचें एक पद आहे. मात्र हा अपवादच. पदांची भाषा—मराठी काय किंवा हिंदी काय सोपी आहे. लेखकांच्या लेखनाच्या चुकांमुळें मूळ शब्द कोणता असावा, हें ठरविणें अनेक ठिकाणीं जड जातें. काहीं हिंदी पदांत उर्दू शब्दांचा भरणा थोडा जास्त आढळतो व तें अपरिहार्यच आहे. त्या कालाचा विचार करतां उर्दू शब्द टाळणें कठीणच होतें. लक्ष्मीपतीच्या रचनेवर सूरदास, तुळसीदास व खुद्द रुक्मांगद पंडित या तिघांचाही प्रभाव दिसतो. मराठी पदांमध्यें वास्तविक ज्ञानेश्वर, एकनाथ यांचा प्रभाव विशेष दिसावा, पण तसा तो दिसत नाहीं.

सर्वसाधारणपणें प्राचीन मराठी कविता अध्यात्मपरच आहे, त्याप्रमाणेंच लक्ष्मीपतीची आहे. याच्या पदांत मुद्दाम तत्त्वज्ञान सांगण्यावर भर फार कमी आहे. त्रितापानें पोळलेल्या मनाच्या भावना याच्या रचनेंत उत्कट रीतीनें दर्शविलेल्या दिसतात. सूरदास, मीराबाई यांच्याप्रमाणें कृष्णलीलांचा आध्यात्मिक आविष्कार याच्या पदांत आढळून येतो. याचा विशेष हा कीं, मधुरा भक्तीतील शृंगारिक भावनांवर भर नाहीं. किंबहुना हा कवि असे प्रसंग चित्रित करीत नाहीं. मग वामन पंडित वा एकनाथ यांच्याप्रमाणें त्यांमध्यें रमून जाणें त्यास कसें आवडणार?

परमेश्वराच्या अनंत गुणांचें ' वर्णन करतां येणें ' शक्य नाहीं, याची त्यास जाणीव आहे. दया–क्षमा–औदार्यादि गुणांचा परमेश्वर कसा प्रत्यय आणून देतो, हें तो सांगतो; मात्र ही दृष्टि गुरूकडून प्राप्त झाली पाहिजे, याची तो आठवण देतो. श्रीकृष्णाच्या बाललीला या त्यास हरिदर्शन घडण्यास वाहक झाल्या आहेत.

सयें आजि तो जगदात्म हरि देखिला ।। जन्मासि आनंद म्यां मानिला ।।

या पदांत जन्म दुःखमय आहे, ही कल्पना नष्ट होऊन त्या ठिकाणीं कृष्णलीलांच्या चिंतनांत जन्म आनंदमय आहे, याचा साक्षात्कार त्यास होतो.

सर्वच संत गुरुमहिमा फार उत्कटतेनें व श्रद्धेनें गातात. लक्ष्मीपतीनेंहि गुरु रुक्मांगदांच्या अधिकाराची विशेष स्तुति केली आहे. तो म्हणतो–

जप तप कर्मादिक अनुष्ठान नेणेंचि मुळीं मी कांहीं ।।
......दक्षिण उत्तर मानस यात्रा नाहीं रे केली पाही ।।
आरत भावें शरण रिघालों गुरु रुक्मांगदपाईं ।।
तेणें मज लो लागला लक्ष्मीपति नामाच्या ठाईं ।।

शिव, राम, कृष्ण, अंबा इत्यादि देव-देवतांच्या गुणवर्णनपर पदें लक्ष्मीपति रचतो. त्यास भेद माहीत नाहीं. परमेश्वरास कोणत्याहि नांवानें हांक मारली, तरी ती एकेच ठायीं पोहोंचते, ही त्याची दृढ श्रद्धा आहे. " अळस करूं नये शिवनामजपिं ॥ " असें तो म्हणतो; तसेंच राम, कृष्ण यांच्यावरही श्रद्धा प्रकट करतो– " राम राखेल तैसें राहावें मग कांहीं न चिंता ॥ "; "रामनामेंविण केणें घेणें नेणें जाणें तो सत् गुरु रुक्म भूषण ॥ " रुक्मांगद पंडिताचें तर पांडुरंग हें उपास्य दैवत; तेव्हां पांडुरंगा-वर लक्ष्मीपतीची निष्ठा असणें स्वाभाविकच आहे. परमेश्वराची कृपा झाली म्हणजे सर्व कर्में निर्विघ्नपणें पार पडतात, इतकेंच नव्हे तर तो कृपानिधि प्रत्यक्ष प्रकट होऊन भक्ताची आस पुरवितो, हें सांगतांना कवि म्हणतो,

जब जदुराज कृपा करे तबहीं सब बनि आवे आस ॥
परम पुरुष माधव गौवनकों ज्याय खिवायो घास ॥

मात्र ' बिन लछमीपत भजन किये कछु सुख आवे नहीं पास ॥ ' असा इशारा देण्यास तो विसरत नाहीं.

अयोध्येंत रामावतार झाला, त्यामुळें विष्णुलोक कसा ओसाड पडला, हें तो याप्रमाणें वर्णितो.

शख भरत शत्रुघ्न सुदरसन सेस सौमित्र भये ॥
विष्णु लोक सुनो कर लछमीपत अवतार लये ॥

गोकुळांत कृष्णावतार झाल्यानें तेथील गोप–गोपींना किती धन्य वाटलें, याची कल्पना लक्ष्मीपति पुढील शब्दांत देतो–

सखि री भाग बडे हम जनके ॥
पूरन ब्रह्म सनातन आतम प्रगट भयो ग्वालन के ॥

कलियुगांत दानाचें महत्त्वच विशेष आहे. जप, तप, यात्रा वगैरे पाहिजेतच असें नाहीं, असें लक्ष्मीपति सांगतो,

कलमे दान हि तरन उपाव ॥
दानबिना को पार न पावे भवजलमें यह पार ॥
जप तप कर न सके काम क्रोध को भाव ॥
कर न जात कछु होय जाय कछु क्यौंकर होय निबाव ॥
......तीर्थ यात्रा को रक्यौ चल न सके तसु पाव ॥

अशा स्थितींत पुढील स्वरूपाच्या दानाचें महत्त्व आहे–

बिध अबिध ओर लाज डरनसों दीजे तो ही छुटाव ॥
कहे लछमीपत दानसों पावत जमकों घाव बचाव ॥

कन्हैय्याच्या प्रेमानें धुंद झालेली गोपी सर्व व्यवहार कशी भुलते, त्याचें हें चित्र पहा :

कान्हके पाछ मोही ब्रजनार ॥ दध बेचन लै चलि ॥
गोकुल मैं भूल कही ले गोबिंद मुरार ॥ धृ ॥

यह अचरज देखत अंबरमें सब देवन तन सुध हुं बिसार ।। १ ।।
धन धन धन व्रजजन लछमीपत पाछे लो लाहै तज घर बार ।। २ ।।

कृष्णप्रेमानें तीन्ही लोकींचें सर्व वातावरण कसें दुमदुमून जाऊन कृष्णमय झालें, याचें किती थोडक्यांत व सुंदर चित्रण झालें आहे ! लक्ष्मीपति थोडक्या शब्दांत सर्व भावांचा आलेख फार उत्तमरीतीनें रंगवितो.

अशा या कवीची थोडक्यांत ओळख करून देऊन त्यांची मराठी पदावली सादर करीत आहें. प्राचीन मराठी संत कवींच्या साहित्यसंभारांत ही एक उत्तम भर पडत आहे, एवढें निश्चित.

लक्ष्मीपतींचीं मराठी पदें

(१) गौड सारंग.

तुजविण मज कोण पाळी ।। कृपाळी ।। धृ ।। सति सुत धन तापत्रय जाळी ।। पाडुनि हें मन जाळी ।। १ ।। विषयी अवस्था समुल मुराली । तृष्णा नाहीं गळाली ।। २ ।। प्राप्ति तुझी ज लक्ष्मी आली । तरि मति सहज निमाली ।। ३ ।।

(२) कांबोद

दीनापासूनि काय अपराध घडला । सांग पां गुरुराज राजवैहिला ।। धृ० ।। जरिहि घडला अपराध मायबाप कोठेंतरी पाहुनि दुर्गुणु त्यजति बाळा ।। नेणतां मी आधीं सर्व जाणा तुह्मी राग कां माझिया लाड खेळा ।। १ ।। मी अपराधि जाणूनि तुमच्या कुशीं उपजलों जीवभावें दयाळा ।। जरि क्षमा नोहे तरि जावें कोठें आतां बोल पां बरव्या प्रकारें मजला ।। २।। जरि कुसंतान ह्मणसी तरी सर्वत्र नाहीं मजसा बाळ आणि तुजला ।। करि कृपाभाव दे सर्वभूतिं तुझा मागणें हेचि लक्ष्मीपतीला ।। ३।।

(३) कल्याण

अळस करू नये शिवनाम जपिं । थोर चतुर शिरोमणि अरे मना कां गमसी येर गपीं ।। धृ० ।। पुनरपि जन्म तुला मज नाहिं सावध होयी तपिं ।। मी लक्ष्मीपति गरु वचनावरि स्नेह तुझ्या करुनि न पडें खपिं ।। १ ।।

(४) कांबोद

चोरी करिशी आम्हाघरां रिघुनि लोणी कृष्णु ऐकुनि कानी बोलें रागें ।। तुझा भी । सांगेन मातेपाशीं मी जाउनी ।। १ ।। धृ० ।। आपुल्या नेउनि मुली खेळ मांडिशी वनीं ।। २ ।। ऐसें न पाहिलें बालक या जनीं ।। ३ ।। भला बलरामु हा चोर शिरोमणी ।। ४।। पाहतां बालक तान्हा वोखटी करणी ।। ५।। घरां जाउनी नंदा सांगेन गाऱ्हाणीं ।। ६।। लक्ष्मीपति तुझें काय आहे मनीं ।। कृष्णु ऐकुनि कानीं बोलें रागें ।। ७।।

(५)

गुरुराज माझा पाहा पाहा अनाथ कैवारी ।। धृ० ।। दीनानाथ कृपानिधि पावन

दर्शनमात्रें उद्धारी ॥ १ ॥ वचनामृत अभिषेक करुनि दुस्तर श्रम निवारी ॥ २ ॥ माथा ठेवुनि कर लक्ष्मीपति सम करुनि जनां दैन्य हारी ॥ ३ ॥

(६) उबायी मल्हार

अनंत जन्मांचें सुकृत । आजि वोढुनि आणी मातें ॥ विठोबाचे चरण देखिले परमानंद जालें येणें जाणें गेलें ॥ १ ॥ काय सांगों मी काय । सच्चिदानंदघनु ॥ आला पुंडरीकालागीं धेनू । घेउनि समपद उभा ईटे मुनी ॥ निर्विशेष स्थिति दावित बायिरे ॥ २ ॥ साधन चतुष्टहीन । त्यासी देईन माझें स्थान । करिति सद्यस्नान चद्रभागिये । लक्ष्मीकांत म्हणुनि भाक केली गे बायिये ॥ ३ ॥

(७) सारंग

क्षमासार जो साधु नाहीं त्याला नाहे बोधु ॥ धृ० ॥ माजि सभा जाणवणें अपणा जाणे तो जना भोंदु ॥ १ ॥ निर्मत्सरी होउनि करि श्रवण पावे तो निजामोदु ॥ २ ॥ सर्वभूतिं लक्ष्मीपति पाहे भजन तें अविरोधु ॥ ३ ॥

(८) परज

आतां आहे क्षणां नाहिं या जगाची चाड काई ॥ पाहत्यापणहीं टाकुनि आहे आनंद सागर डोहीं ॥ १ ॥ नांव न रूप जाहलें दुःखा राहुनियां समुदायीं ॥ २ ॥ सर्व होउनि विरहित सर्वां या गुरु रुक्माच्या पाईं ॥ ३ ॥ जेवि लक्ष्मीपति अंबुधि वर्षा तेवि नुचंबळे कांहीं ॥ ४ ॥

(९)

ब्रह्म सनातनु रे " हरि हा " नंदानंदनु रे ॥ धृ० ॥ सच्चिद आनंदघन उदासिन नित्य निरंजन निर्गुण व्यापक रे ॥ १ ॥ गोकुळीं गौळणीया मेळीं लीला दाविली योगीजनां अति दुर्लभ रे ॥ २ ॥ लक्ष्मीच्या संगें क्षणिक जगातें वीतो विचित्र नपुंसक रे ॥ ३ ॥

(१०)

ये रे ये रे उशीरु कां रे दीनानाथ कसा रे ॥ धृ ॥ धरिला म्यां बहु तुझा भरंवसा ॥ रक्षी मान अतां रे ॥ १ ॥ सकळ सुरासुर वंदिती चरणा ॥ मानिति धन्य जीवा रे ॥ २ ॥ तुजसा नाथ त्यजुनि लक्ष्मीपति ॥ जाऊं शरण कोण्हा रे ॥ ३ ॥

(११) राग असावरी

सये आजि तो जगदात्म हरि देखिला । जन्मासि आनंद म्या मानिला ॥ धृ० ॥ जो मधुर मुरलि वाजवि शामसुंदरु जो गोकुळीं गाय चारि आणी ॥ नुपसतां जो गोपिकांघरि नवनीत दधिदूध लुटवी फोडि भरणी ॥ १ ॥ जो पूतना थान प्राशन मिसें प्राण वरपूनि व्रजजनांमाजि ज्याला ॥ अक्रुराच्या सुबोलें धनुष संभ्रमीं जाउनि जो कंस वधुनि धाला ॥ २ ॥ तरणितनयातटीं संग गोपाळ घेउनि क्रीडा करि जो मुकुंदु ॥ इंद्रकोपीं धराधर धरुनि करिं बाल राखिला जो सकल आप्तबंधु ॥ ३ ॥ हिमकिरण उदयिं जो गोपिका मेळ घेउनि पुलिनी रास करूनि मोहवी ॥ चोरुनि

जो कन्यकावसन लगबगें नीपतरुवरि वेधुनि लपवी ॥ ४ ॥ जो मत्स कूर्म सूकरु सिंह वामनु जो परशराम श्रीराम रामु ॥ जो वेदधर्म मोहक खळजनांतकु जो नित्यतृप्त लक्ष्मीस धामु ॥ ५ ॥

(१२) बिलावल

मन स्थिर केलें ऐसें तें सुख सांगू मी काई ॥ पवनाहुनि आगळ अनिवारु दोष वेचीव पराई ॥ धृ० ॥ जप तप कर्मादिक अनुष्ठान नेणेंचि मुळि मी कांहीं ॥ शम दम नित्यानित्य विवेकू श्रवणि ऐकिला नाहीं ॥ १ ॥ सांख्य योग आणि ज्ञान ध्यान मज वाटतसे हो नवाई ॥ दक्षिण उत्तर मानस यात्रा नाहीं रे केली पांही ॥ २ ॥ आरतभावें शरण रिघालों गुरु रुक्मांगदपाईं ॥ तेणें मज लो लागला लक्ष्मीपति नामाच्या ठाईं ॥ ३ ॥

(१३) काफी

राम राखेल तैसें राहावें मग कांहीं न चिंता ॥ अंबुधि जैसें तरंगापरि दृश्य जाणुनि कौतुक पाहावें ॥ १ ॥ सुख दुःख दोन्हीं नाहीं वास्तव जीवा ॥ या लागिं कां हो उलावें ॥ २ ॥ लक्ष्मीशावांचुनि द्रष्टा दर्शन दृश्य ॥ रुक्मरूपें वोळखावें ॥ ३ ॥

(१४)

येउं नय तो आलो आतां कां भवा भ्यावें ॥ वेद शास्त्र अपुला अनुभवसिद्ध बंध स्वज्ञान तोडावें ॥ १ ॥ कामादिकांचे पाय मोडुनि जन्म सफल तें करावें ॥ २ ॥ धर्म आपुलें आचरुनि कृष्णार्पण अळिक फलां न झोंबावें ॥ ३ ॥ शरण रिघुनि रुक्मांगददारिं लक्ष्मीरमण वोळखावें ॥ ४ ॥

(१५) कल्याण

अंबे तूं माते मज भेटि देईं ॥ आर्त पुरवावें आर्ता बाहुनि आनंदपद दाउनि तेथेंचि ठेईं ॥ धृ० ॥ मन सौविदल्ल खल चंचल करुनि येउं न देतो तुझ्या ठाईं ॥ १ ॥ द्यावा अधिकारु द्वारावरि शम दमां मग पीडि कोण कोणाला कांहीं ॥ २ ॥ धाडुनि वैराग्यदूत बोलाविसी जरि आंत होईन कृतार्थ पांईं ॥ ३ ॥ लक्ष्मीकांतादिक थोर जाले पाउनि तुज पाहुनि विनवीतो पाहीं ॥ ४ ॥

(१६) कल्याण

नाहीं कोण्ही या जीवा आवा बावा ॥ आहे जे तें पामरां दृष्टी पाहतां संसार अवघा मावा ॥ धृ ॥ आला गेला ठाव नेणती कोण्ही याचा विधि हर देवा न ठावा ॥ न वर्णवे याची थोरी कवणु जाणे हा ऐसा तैसा सांगा वा दावा ॥ १ ॥ नाहीं तनु मन प्राण आणि इंद्रियगण तो जाणावा सतरावा ॥ रुक्मप्रसादें याला मी जाणीतला वासुदेवमहंच सकलमिदं हि ॥ २ ॥

(१७) भैरवी

संसारीं भ्यां फार फार वारंवार सार विचार केला कांहीं ना तोडे ॥ १ ॥ राम नाम कृष्ण नाम० राम नामें विण केणें घेणें नेणें जाणें तो सत्गुरु रुक्मभूषण ॥ धृ ॥

दारा हे मना विदारा वारा वारा मारा मारा नाहिं संसारी थारा ॥ २ ॥ आगारा लोभु न करा कारा खरा अंगारा परि निःसार निर्धारा ॥ ३ ॥ पुत्र मित्र वित्त अत्र पर कामा न येत विण लक्ष्मीकलत्रा ॥ ४ ॥

(१८)

पांडुरंगा मना रे स्मर निजसुख तुजपासीं ॥ धृ० ॥ आणुनियां ध्यानीं सुंदर आकृति । मदनमोहन मूर्ति राजसी ॥१॥ देहादिकीं अहंता सति सुति ममता । जायिजे तों भ्रांता नातळसी ॥२॥ वांचुनि लक्ष्मीपति सर्व होय विस्मृति । त्रिपुटी सहज न राहे मानसीं ॥३॥

(१९) राग बगळा

काय केलें गा संसारा । येउनि न केला थारा ॥ धृ० ॥ कुमति नाहीं टाकली । रामकृष्ण नो उचारिली ॥ जळो जिव्हा तुझी सिंदळी । ... गा जळी ॥ १ ॥ भूतदया न केली । ममता नाहीं सोडिली ॥ शांतिहि न वाणिली भवरुचि न गळाली ॥ २ ॥ गुरुचि शेवा न जाहली । मी मी मति न मुराली ॥ मायेचि न केलि होळी लक्ष्मीपति भक्ति न आली ॥३॥

(२०) भैरवी

श्लोक

ज्या वेळे न यति कोण्ही येक चक्रपाणी वांचूनि ॥ धृ ॥
श्वासा होय कोंडणी ने...रि दोन्ही । घोरघुरघरितां पडे धरणीं ॥ १ ॥
स्त्रीया पुत्र सकळ वृथा करिति कोल्हाळ । वोडूनि ने येम काळ ॥ २ ॥
बुडेल आठवण नाठवे नारायेण । जीता गोदास शरण आपण ॥ ३ ॥

श्लोक

अंतीं भ्रांति पडे वगोत्र न घडे दातोत्रि कोण्हीकडे ॥
भार्या वेर्थ रडे वीवक्त विषई वोढील पुत्रांकडे ॥
या देह्याला घडेल या ना घडे संसकार कर्मापुढे ॥
ऐसा जो प्रसंग न पडे शुमना तू लाग धर्माकडे ॥ १ ॥

(२१) भैरवी

अजुनि तुज कां दया नुपजे मज रक्षाया ॥ मी वंदीन तुझीया पायां धांव धांव पंढरीराया ॥ १ ॥ मी पापिष्टा वरिष्ट । निजभक्तांत कनिष्ट ॥ परि अनेक कर्म-भ्रष्ट त्वां केले परमेष्ठ ॥ २ ॥ मज नाहीं अन्य गती । तुजविण लक्ष्मीपति ॥ हेचि बोलो मीं ... रुक्मांगदा हाती ॥ ३ ॥

(२२)

रुक्मिणी मण्हे अहो बावा मला यदुनाथ पाहिजे वरश्रेष्ठ ॥ रुक्म भाउ मण्हती शिशुपाल संबंध करावा तो श्रेष्ट ॥ कुलगोत नाहिं वाढला गोपघरीं खाउनि त्यांचे वदन उच्छिष्ट ॥ आम्ही राजे थोर कुळिचे मण्हुनि गर्वें करिता जनी वटवट ॥१॥ नलगे नलगे हरिविण नलगे नलगे जरि द्याल तुम्ही बळं देइन हा माझा प्राणु ॥

पंनास कोटि योजनं भूप येकला आला अणिखि देवराणु ।। कोण जालो कृष्ण अवतार भूभार उतरावया जाला खुणुं ।। येकांन्तीं येउनि सांगितले मज नाद तो आपण ।। धृ० ।। बापासिं बोलुनि मग द्विजाहातीं पत्र लिहुनि द्वारकेशी ।। पाठविलें मज वाचुनि आणिक नांगिकरिजे हृषीकेशी ।। चैद्य दिनद्वया येउनि वरण्या यामाजि सावध होशी ।। तरि हातीं लागेन जाणा निश्चय तर पाहुनि यावें त्वरेशीं ।। २ ।। ऐका ऐका सावधान घेवुनि आश्वासन द्विज येउनि करुनि गेला ... ।। दुर्गा दर्शन मिसें चालिलि देउळा हर्षें तेथुनि येते ... ।। दारुकसहित रथावरि बैसुनि लपत समीप जों आले ।। लगबगं लक्ष्मीपति निजवधूला घेउनि रथीं चालले ।। ३ ।। पाहो पाहो कौतुक ।।

(२३)

येक ब्राह्मण येउनिया । हरिगुण गातां घरीं । तंव ते भीमक कुंवरी । अैकिलें कानीं ।।१।। तंव मूर्च्छित होउनियां । पडली नृपसेजारी । लाउनि वारि निवारी । बाइकांही ।।२।। मग सावध होउनियां । बोले हो घाबरी । हरिविण कवणु तारी । संकटा या ।। ३ ।। बायी काय मण्हुनियां । उचलुनि मांडीवरी । घेउनि परोपरि । पुशिलें नृप ।। ४ ।। जनक मी हे तुझी जननी । त्वां रुक्माची भगिनी । काय उणे गे सदनी । नाहिं तें आहे ।। ५ ।। चैद्यवरा नेमियला । जाण विवाह हो जाहला । चिंता येवढी का तुजला । जाणो आम्ही ।। ६ ।। अैकुनि नरपति माता जैसा वज्र निघात । भिजल अश्रूपात । क ... देह ।। ७ ।। पुनरपि बोले नृपति । कां अैसी... मागूती आहे काय चित्तीं । सांगे आम्हा ।। ८ ।। रुक्मीणी बोले बावा । आतां जीव द्यावा । सेखी काय घ्यावा । तुमचा बा. ।। ९ ।। न वरी चैद्य वरासी । मी कृष्णाची दासी । तो आहे अविनाशी । सर्वकाळीं ।। १० ।। आहे तो गोवळा । का न महा सांवळा । आहे माझ्या भाळा । जन्मोजन्मीं ।। ११ ।। लक्ष्मीपति तो जाणा । वाहते तुमच्या आणा । काय ते हो जाणा । जाणे कोण्ही ।। १२ ।।

● ● ●

५. अष्टावक्रसूक्त : सिद्धान्त चिदंबरी टीका

डॉ. व. वि. पारखे

सरस्वतीमहाल लायब्ररी तंजावर येथें हें हस्तलिखित माझ्या पाहण्यांत आलें.[1] या सिद्धान्त चिदंबरी टीकेचा कर्ता वैद्यनाथ, शके १६०० च्या पूर्वींच होऊन गेल्याचा केवळ निर्देश श्री. वि. ल. भावे महाराष्ट्र सारस्वतांत करतात;[2] परंतु

१. सरस्वतीमहाल लायब्ररी हस्तलिखित क्रमांक–४२१. २. महाराष्ट्र सारस्वत (५ वी आवृत्ति) श्री. वि. ल. भावे : पान ४००.

डॉ. शं. गो. तुळपुळे यांनींसुद्धां उल्लेखाव्यतिरिक्त या कवीविषयी फारशी माहिती दिलेली आढळत नाही.[1]

वैद्यनाथाच्या सिद्धान्त चिदंबरी टीकेचीं २७ प्रकरणें असून सुमारें ३८५० ओव्यांचा हा ग्रंथ आहे. अरण्यपर्वामध्यें, तीर्थयात्रा करीत असतां धर्मराजाला लोमष ऋषीनें जें तत्त्वज्ञान सांगितलें, तें ' तत्त्वमसि 'चें विवरण उद्दालक या महाप्रसिद्ध ऋषीनें श्वेतकेतु या पुत्रास सांगितलें होतें. तेंच अष्टावक्रानें आपल्या शिष्यांना कथन केलें; त्यावरील ही टीका आहे, असें वैद्यनाथ म्हणतो. या कवीनें, ही टीका शके १५७३ खर नाम संवत्सरीं, फाल्गुन वद्य द्वादशी गुरुवारीं चंजी नगरीं (तंजावरीं) पूर्ण केल्याचा उल्लेख २७ व्या अध्यायांत येतो.

आपल्या गुरूला नमन करतांना वैद्यनाथ म्हणतो–

आतां नमुं तो श्रीगुरु । जो या सकळासि आधारु ।
जो ज्ञानाचा दातारु । श्री अमूर्तानंदु ।। ३० ।। अध्याय १

या उल्लेखानुसार वैद्यनाथाच्या गुरूचें नांव अमूर्तानंद असावें असें दिसतें; परतु येथें हस्तदोष असण्याचीही शक्यता असावी ! कारण श्री. मेथेकर यांनीं या कवीची ' भगवद्गीतारूपिणी ' नांवाची जी गीता–टीका प्रकाशांत आणली आहे.[2] त्यानुसार ' अमृतानंद ' हेंही याच्या गुरूचें एक नांव दिसतें ! ' भगवद्गीतारूपिणी ' ही गीता-टीका कवीनें शके १५७७ मध्ये रचिली असल्यामुळें तत्पूर्वींच सिद्धान्त चिदंबरी टीका त्यानें रचिली होती हें स्पष्ट होतें. या कवीनें स्वतःविषयी फारशी माहिती दिलेली आढळत नाहीं. २७ व्या अध्यायांत कवि म्हणतो–

उपनाम तक्र ओदनी । महाप्रख्यात आत्मज्ञानी ।
ब्रह्मगिरि नामाभिधानी । तेणें ग्रथा द्योतिले ।। ३५ ।।
जैसें चंद्राचेनि उदयें । समुद्र उचंबळला लागे स्वयें ।
तैसे त्र्यंबक नामधेयें । प्रेरिलें ग्रंथा ।। ३६ ।।
ये ग्रंथिचा परमार्थु । तोचि असे तुमचा स्वार्थु ।
करसंपुटें वैद्यनाथु । विनवि श्रोतां ।। ३७ ।।

या ओव्यांतील उल्लेखानुसार ब्रह्मगिरी ताकभाते नांवाच्या विख्यात आत्मज्ञानी व्यक्तीनें आणि त्र्यंबक नांवाच्या परिचितानें त्यास अत्यंत प्रेमानें ग्रंथ निर्माण कर-ण्यास प्रवृत्त केलें, असें दिसतें.

वैद्यनाथ कवि मोठा विनयशील दिसतो. ज्ञानेश्वर, एकनाथ आणि दासोपंत यांच्याप्रमाणें वैद्यनाथानेंही मराठी भाषेची प्रशस्ति केली आहे. कवि म्हणतो–

परि कोण्ही म्हणति हें मऱ्हाटे । याच्या श्रवणें केंवि होय गोमटें ।
संस्कृत परिपाटें । हें आइकावें ।। २२ ।।

---

१. महाराष्ट्र सारस्वत (५ वी आवृत्ति), वि. ल. भावे; पान ८९७.
२. प्रतिष्ठान : मार्च १९६३; पृष्ठें २३ ते २७.

तरि हो अति कठिण संस्कृत भाषा । अर्थें गाभीर्यें सिंधु सदृशा ।
परि तयाच्या प्राशनें तृषा । नव जाय तृषार्ताची ॥ २३ ॥
त्याचि सिंधूचें उदक । शोषून घेती बलाहक ।
वर्षती अमृता ऐसें उदक । तृप्ति करिती लोकांतें ॥ २४ ॥
तैसे हे अष्टावक्र श्लोक । यांचा अर्थ काय जाणती सर्व लोक ।
म्हणौनि ईश्वर जाला प्रेरक । वैद्यनाथ हृदई ॥ २५ ॥
तेणें मऱ्हाटिया भाषा । अर्थ लिहिला कलें ऐसा ।
सुगम आत्मा जाणवे जैसा । दशम आपणा दशमु ॥ २६ ॥

ज्ञानेश्वरीचा छाप या ग्रंथावर पडल्याचें आपणांस जाणवतें. ज्ञानेश्वरांना स्फुरण चढलें म्हणजे जसे ते एकापेक्षां एक सरस उत्प्रेक्षा योजून उत्प्रेक्षा मालिका तयार करतात त्याचप्रमाणें हा कविसुद्धां उत्प्रेक्षांची सुंदर मालिका रचतांना आढळतो. उदाहरणार्थ सिद्धान्त चिदंबरी टीकेची तरफदारी करतांना वैद्यनाथ म्हणतो–

म्हणौनि हे मऱ्हाटि । टीका सिद्धान्त चिदंबरी गोमटी ।
जैंसी डोळयांची दिठी । तैसी संस्कृताची हे ॥ २७ ॥
कां दुहिलें धेनुचें दुग्ध । कां पुष्पाचा काढिला सुगंध ।
तैसी संस्कृताची शुद्ध । हे मऱ्हाटी टीका ॥ २८ ॥
कां नवनीत तप्त कैलें । तें अधिकचि गुणा आलें ।
कां पिळूनिया काढिलें । इक्षुरसा जैसें ॥ २९ ॥
कां सूर्याचि किरणें । कां चंद्राचें चांदिणें ।
कां सुवर्णाचि भूषणें । तैसें संस्कृताचें हें ॥ ३० ॥
नातरि संस्कृत ब्रह्मगिरिचां सिरिं । होति गुप्त अर्थ गोदावरि ।
ते कविमुख गंगाद्वारिं । महाराष्ट्र वाणी प्रकटली ॥ ३१ ॥
तेथूनि आली जनस्थाना । श्रवणें रुषिमुनि आले स्नाना ।
ते पावोनि समाधाना । आत्मनिष्ठ जाले ॥ ३२ ॥
का हे संस्कृत ब्रह्मवल्लि । महाराष्ट्र भाषे वेली गेली ।
तिथे समाधान फलें आलि । आनंदरसालें ॥ ३३ ॥

या उत्प्रेक्षा पाहिल्या म्हणजे तत्त्वज्ञानपर टीका वाचीत असतांना काव्यानंदाचाही लाभ सहजगत्या घडून जातो.

हा कवि शैवपंथाचा दिसतो हें त्यानें त्र्यंबकेश्वराच्या दिलेल्या दृष्टान्तावरून सहज स्पष्ट होतें, परंतु आणखीही अन्यत्र त्यानें तें कथन केलें आहे.

ग्रंथारंभीं या कवीनें केलेलें सरस्वतीवंदन विचार करण्यासारखें आहे. कवि म्हणतो–

तैसीच नमिली सरस्वति । जे वाग्देवता माझा स्फूर्ति ।
जियेचि असे मूर्ति । स्वानंदाची ॥ १० ॥

जियेसि म्हणति आनंदी । जे स्तविती नाना प्रबंदीं ।
जियेसि चहुं वेदीं । गायत्री म्हणती ॥ ११ ॥
जे भक्ता कामधेनु । जिये निजीं अवघा जनु ।
जियेचेनि होय मानु । जेथें तेथें ॥ १२ ॥
जे सकलांचि जननि । हें सकल होय जियेपासूनि ।
जे सकलि असोनि । सकल नोहे ॥ १३ ॥
जे नव्हे खचरि ना भूचरि । चाचरि ना अगोचरि ।
जे असे अखंडाकारि । सबाह्य शांभवी ॥ १४ ॥
जे वेदांत्यांचियें मति । अनिर्वाच्य माया म्हणति ।
तार्किक नाम ठेवति । जिथे ईश्वरेच्छा ॥ १५ ॥
सांख्य म्हणति प्रकृति । मीमांसिकांची मंत्रमूर्ति ।
योगी जियेतें म्हणति । कुंडलिनी ॥ १६ ॥
वेदबाह्य म्हणती दया । यवन म्हणति दुनिया ।
नावें ठेविती परि आया । रूप न ये जियेचें ॥ १७ ॥
जिये न जालीं तो देव । आणि जे देवचि स्वयमेव ।
द्वैताचा दिसे भाव । परि अभेद दोघं ॥ १८ ॥
जैसा तो दशावतारि । अर्धनारीचें सोंग धरि ।
उभयता संपादणी करि । येक देहें ॥ १९ ॥
तैसी हे शिवशक्तिभेदें । उभयता आपणचि नांदे ।
ते मज कैसेनि वंदे । दुजियेपणें ॥ २० ॥ अध्याय ॥ १ ॥

सामान्यतः न्याय, सांख्य, तर्क, मीमांसा इत्यादिकांचे प्रवर्तक सरस्वतीस काय समजतात तें देण्याच्या भानगडीत प्राचीन कवि पडत नाहीत; तसेंच या कवीनें यवनांच्या दृष्टिकोनांतून सरस्वतीचा दिलेला अर्थ पाहतां या कवीस हिंदु-मुसलमान धर्मोपासकांचा समन्वय साधावयाचा होता कीं काय न कळे ! परंतु असा प्रयत्न प्रथमच झालेला आढळत आहे. याच कवीचें ' चिदंबर जयंती स्तोत्र ' या नांवाचें दुसरें हस्तलिखित सरस्वतीमहाल लायब्ररींत उपलब्ध आहे. त्यांतही त्यानें हुसेन अंबरखान नांवाच्या यवनास कलियुगांतील देवाचा अवतार मानलें आहे.[१] कदाचित् वैद्यनाथाच्या काळांत हुसेन अंबरखान ही कोणी प्रख्यात शैव व्यक्ति तंजावरच्या आसमंतांत झाली असावी आणि तिचा अनुग्रह वैद्यनाथ कवीनें घेतला असावा ! गोदावरीच्या तीरावर गोरक्षनाथांचा सुफीपंथीय धर्माचार्याशी थोर वादविवाद झाला होता आणि त्यानंतर अनेक यवन नाथपंथाकडे आकृष्ट झाले होते. हा हुसेनांबरखान असाच आकृष्ट झाला नसेल ना ?

● ● ●

एकंदरीत सिद्धान्त चिदंबरी टीका हा ग्रंथ रसाळ आहे.

---

१. कॅटलॉग क्रमांक १ : हस्तलिखित क्रमांक १२३.

६. विष्णुदासनाम्याची एकादशी कथा

श्री. ज. शा. देशपांडे

[विष्णुदास नाम्याची 'एकादशी कथा' अथवा एकादशी माहात्म्य ' हें लोकांच्या नेहमी वाचनांत असलेलें काव्य आहे. बा. ल. पाठक, मुंबई यांनीं १९५९ मधें प्रकाशित केलेल्या दहाव्या आवृत्तींत १८८ ओव्या आहेत. ही प्रत कुठल्या हस्तलिखितावरून छापली तें ठाऊक नाहीं. या प्रकरणाचीं हस्तलिखितें पाहातां मला खालीलप्रमाणें हस्तलिखितें असल्याचें समजलें :–

(१) राजवाडे संशोधन मंदिर, धुळें – विष्णुदास नामाकृत येकादसीची उत्पत्ती-कथा–मृदुमान्याची येकादशी – ओंव्या १२१.

(२) औंध येथील सरकारी हस्तलिखितें – मराठी, भक्ती विभाग, राजवाडे संग्रह नं. २७. एकादशी माहात्म्य (ऋद्धपूर प्रत). ओव्या ११०

(३) श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर–धुळें बाडांक ५७९. ओव्या १०९ पर्यंत पुढें पान फाटलें आहे.

(४) धुळें बाडांक ७०२. ओव्या ७४–१५५. शेवट आहे पण आरंभ नाहीं.

विष्णुदास नाम्याच्या कवनांत निरनिराळ्या प्रतींत फार फरक आढळतात. याबद्दल विस्तृत चर्चा ' प्राचीन मराठी कविता खंड ५, नामदेवांचीं स्फुट आख्यानें यांत केली आहे. कालांतराने येथेंही मूळ कवनांत भर पडत गेलेली दिसून येते. धुळें बाडांक ५७९ व ७०२ याबद्दलची माहिती धुळ्याचे श्री. दा. शं. जोशी यांनीं पाठवली. तीवरून असें दिसून आलें कीं बाडांक ५७९ मधील आरंभींच्या ५ ओव्या वरील (१) मधील ओव्यांशी बहुतांशी जुळतात. १०९ वी ओवी (१) मधील १०४ ओवीसारखी आहे. या संपूर्ण प्रकरणात १२५–१३० ओव्या असाव्यात. बाडांक ७०२ व छापील प्रकरण ही या प्रकरणाची वाढवलेली आवृत्ती आहे, हें उघड आहे. वरील (१) व (२) पैकी औंध प्रत मूळ धरून हें आख्यान पुढें दिलें आहे. अनेक ठिकाणीं अशुद्धतेमुळे व चुकीच्या शब्दामुळें (१) प्रतीची व छापील प्रतीची मदत घ्यावी लागली. हस्तलिखितांत अनुस्वार गाळणें, ण ऐवजी न इत्यादि अनेक प्रकार आहेत व ते दुरुस्त केले आहेत. औंध प्रतींत मधेंच प्रथमवचनी वाक्यें येतात. उदाहरणार्थ 'मी चालिलों.' अशा ठिकाणीं अन्य प्रतीप्रमाणें 'विष्णु राहिला' इत्यादि प्रयोग घालावे लागले. खालीं दिलेल्या ओव्यांतील ४२ वी ओवी मुळांत ३८ वी आहे. अर्थ जुळण्यासाठी (१) प्रमाणें ही ओवी पुढे घेतली व ४१ ओवी ही (१) मधून जादा घेतली. ही (१) मधे ४५ वी आहे. या जादा ओवीमुळे एकंदर ओव्या ११० ऐवजी १११ होतात. विष्णुदास नाम्याच्या अन्य आख्यानाप्रमाणें पाठभेद फारच आहेत व पाठभेद शोधण्यापूर्वीं प्रथम त्यांची लहानांत लहान प्रत शोधणें

जरूर आहे. औंध प्रतीपेक्षांही लहान आवृत्ति असणें शक्य वाटतें.

हें प्रकरण शांतिपर्वाचा भाग असल्याचा उल्लेख फक्त औंध प्रतींत आहे. वाडांक ७०२ प्रमाणें ही कथा वैशंपायनानें जन्मेजयाला सांगितली. शांतिपर्वाच्या उपलब्ध प्रतींत हें आख्यान आढळतें का नाहीं हे पाहिलें पाहिजे. मात्र अशीं दुसरीं आख्यानें उपलब्ध प्रतींत आढळत नाहींत व विष्णुदास नाम्याच्या नावावर भारताच्या अनेक पूर्णपणें भिन्न प्रती लिहिल्या गेल्या असें दिसतें. विष्णुदास नाम्याच्या एकादशी-माहात्म्य प्रकरणाचा हा आढावा भावी संशोधनास उपयोगी पडावा या दृष्टीने केला आहे.]

श्री गणेशाय नमः ॥ जन्मेजयो प्रश्न करी । वैशंपायेन अवधारी । भीष्म निजधामा गेलीयावरी । कथा पुढारी सांग पां ॥ १ ॥ मग हस्तीनापूर नगरीं । श्रीकृष्ण पांडवांचा साहाकारी । गोत्रवधाची हत्या थोरी । घडली राया धर्मासी ॥ २ ॥ तेव्हां स्मरिलें श्रीकृष्णासी । म्हणती पाव पाव गा रुसीकेसी । तूं सकळ सोयेरा आम्हांसी । आणि तारक विश्वाचा ॥ ३ ॥ ऐसें स्मरण करितां । श्रीकृष्ण पावले त्वरिता । द्रौपदी असे चरण वंदिता । त्राहे त्राहे म्हणोनिया ॥ ४ ॥ तव श्रीकृष्ण म्हणे पांडवांते । कासया स्मरिलें आमुचें । कवणें गांजीलें तुम्हातें । तें त्वरित सांगिजे ॥ ५ ॥ द्रौपदी म्हणे श्रीकृष्णासी । पातकें घडलीं राया धर्मासी । कवण उपाव तयासी । तें रूसीकेसी सांगीजे ॥ ६ ॥ मग हासुनिया पुढत पुढती । काय बोलीले कमळापती । जेणें ब्रह्महत्या नासती । तें वृत्त सांगेन ॥ ७ ॥ ते वृत्त असे आम्हासी । जेणे रक्षिले देवासी । तये नाम एकादशी । त्रिभुवनीं समर्थ ॥ ८ ॥ यैसा श्रीकृष्ण बोलिला । अर्जुन चरणासी लागला । म्हणे देवा तुम्ही जो वृत्तांत सांगीतला । ते नवल ऐकिले दातारा ॥ ९ ॥ कवणा रायाची कुमरी । जन्मली कवणाचे उदरीं । तुम्हासी रक्षिलें कवणेपरी । तें श्रीहरी सांगिजे ॥ १० ॥ मग हासोनी बोलिले श्रीहरी । अर्जुना हें तूं अवधारीं । मी सांगेन बरवीयापरी । एकादशीचें महिमान ॥ ११ ॥ यकादशी-कथा जे ऐकती । त्यांचीं महापातकें हरती । श्रीकृष्ण सांगें अर्जुनाप्रती । तुम्ही तरी परियेसा ॥ १२ ॥ पूर्वीं कुंभ दैत्यसुत । मृदमन्य नाम अद्‌भुत । वनांतरीं होता तप करीत । त्यानें प्रसंन्न केला त्रीपुरारी ॥ १३ ॥ देवें दिधलें वरदान । तुज राज्य होईल आंगवण । तुज कोण्हाचे हातीं नाहीं मरण । ऐसा वर दीधला ॥ १४ ॥ हरूषें निर्भर जाला । दैत्य मदें मातला । पुनरपि काय बोलीला । ईश्वर त्यासी परीयेसा ॥ १५ ॥ मायबापावीण जन्मेल कुमरी । ते मृदुमन्या तुतें संव्हारी । जिंकोनी ब्रह्मा विष्णु त्रिपुरारी । इंद्रादिक देव समस्त ॥ १६ ॥ मग तो तेथुनी निघाला । इंद्रावरी तो चालिला । इंद्र भेणे पळाला । दैत्य लागला पाठीसी ॥ १७ ॥ इंद्र सत्यलोकासी गेला । मृदमन्य पाठोसी धाविन्नला । ऐसा गर्जत पावला । म्हणे सोडी आस सत्य लोकींची ॥ १८ ॥ ऐसा गजबजु आयेकिला । चतुरानन वैकुंठ पावला । सावित्रीसहित पळाला । द्वारीं पडला तो ब्रह्मा ॥ १९ ॥ तव धांवोनी

पुसे विष्णु। कवणे गांजिला गा ब्राह्मणु। देवा पाठीं लागला मृदमन्यु। मग मी धावोनी येथ आलों ॥ २० ॥ तेहतीस कोटी देवांसहित। मी भागलों गा बहुत। चतुरानन थरथरा कापत। मग तया वेळीं सावध केला ॥ २१ ॥ परमेष्टी म्हणे श्रीहरी। दैत्यें मज घातलें बाहेरी। आपण सत्य लोकामाझारी। सुखें राज्य करी तूं ॥ २२ ॥ आणीक भयानक गर्जीनला। तेन्हे भूमीसी कंप सुटला। थोर भयातें मी पावला। मग मी शरण आलों तुज ॥ २३ ॥ तूं भक्तकाज कैवारी। त्रिभुवन रक्षीता मुरारी। काये होईल वैकुंठा माझारीं। तें श्रीहरी नेणवे ॥ २४ ॥ ऐसी करितां मातु। दैत्य पावला त्वरितु। बोभाट जाला वैकुंठा आंतु। सकळही जन गजबजीले ॥ २५ ॥ मग तो म्हणे विष्णुसी तूं जरी मजसी शरण येसी। कांहीं न करी वैकुंठासी। अैसा बोलत चालिला ॥ २६ ॥ मग म्हणे सारंगधरू। बारे तूं कवणे वौसीचा वीरू। कवणे रायाचा कुमरू। हा निर्धारू सांग पा ॥ २७ ॥ येरू म्हणे जन्मलों कुंभ दैत्याचे उदरीं। प्रसन्न केला त्रीपुरारी। तुमतें घालोनी बाहेरी। राज्य दीधलें आमुतें ॥ २८ ॥ अैसा मृदमन्या बोलिला। मग विष्णुस आवेश चढला। गदा घेवोनी परताळीला। मग जाला संग्रामु ॥ २९ ॥ तये वेळीं देव समस्त। दैत्यावरी घाये हाणीत। मग तो आवेशला त्वरित। राहे राहे म्हणोनिया ॥ ३० ॥ विष्णूसी धरिलें दोहीं करी। जाले मलयुद्ध जुंझारी। तो वीर अद्‌भुत भारी। संग्रामासी नातुडे ॥ ३१ ॥ देव त्याचे हातींहुनी सुटला। जीवा प्राण असे उरला। मग बोभाट जाहाला। अंतःपुरामाझारीं ॥ ३२ ॥ मग सोडोनी सकळिका तें। लक्षुमी झोंबिली कंठातें। टाकते झाले वैकुंठातें। थोर कष्टी होवोनिया ॥ ३३ ॥ तव इतुकीया अवसरीं। वोळगे बैसले त्रिपुरारी। हा काये बोभाट असे नगरीं। तो सकळिकीं सांगिजे ॥ ३४ ॥ मग बोले नारायण। आतां काये करी बैसोन। अंत पुरला येथुन। देवराया समस्तांचा ॥ ३५ ॥ इतुकीया अवसरीं। बोभाट जाला नगरीं। जी वैकुंठ सांडुनि श्रीहरी। दैत्यभेणे आलेती ॥ ३६ ॥ तव इतुकीयावरी। दैत्य पातला भारी। म्हणे कोठें जासी मुरारी। वैकुंठ सोडोनी आता ॥ ३७ ॥ धरोनिया कैलासस्तंभातें। हालविलें मृदमन्ये दैत्यें। तये वेळीं कैलासनाथें। कैसें युद्ध मांडिलें ॥ ३८ ॥ नंदीवरी आरूढ होवोनी। साठी सहस्त्र गण परिवारोनी। शस्त्रें त्रिशुळ घेवोनी संग्रामासी निघाले ॥ ३९ ॥ येरीकडे विष्णु राहिला। येकीकडे ईश्वर जाला। दैत्य भोवता वेढीला। तये अवसरी ॥ ४० ॥ मग तो उठीला निशाचरू। सींह्यनादें गर्जुन थोर। म्हणे कोठें गेला सारंगधर। वैकुंठ सोडून आला तो ॥ ४१ ॥ तो दाऊनी दे गा त्रीपुरारी। नाहीं तरी तुझी संव्हारीन कैलासपुरी। विष्णु सुद्रसेन घेऊनिया करीं। दैत्यावरी चालिला ॥ ४२ ॥ मग दैत्यें क्रोधें थोरू। हिरोनि घेतलें हतियारू। धावोनि आला ईश्वरू। तेन्हें हानीयलें दैत्यातें ॥ ४३ ॥ मग तो क्रोधा चढिनला। ईश्वरें चरणीं धरोनि आपटीला। मूर्च्छागत जाहला। कैलासराज तयेवेळीं ॥ ४४ ॥ पुनरपि मृदमन्या पावला। ईश्वर काकुळती आला।

म्हणे रे तुं भला रे भला । रक्षी रक्षी म्हणतसे ।। ४५ ।। मग उजु आला तयेवेळीं । तोमरे हानीतला क्रोधानळीं । तेथें थोर जाली हातफळी । हाहाकार प्रवर्तला ।। ४६ ।। मग सांगातें घेवोनी स्त्रियांसी । गेले त्रीकुट सिखरासी । दैत्य लागला पाठीसी । कवणे परी न सोडी ।। ४७ ।। स्वर्ग मृत्य पाताळी । दैत्य पाठी न सोडी ते वेळी । मग आली कळवळी । तिन्ही देवांसी ।। ४८ ।। पळता जाहले देव हिंपुटी । स्वास उस्वास न माये पोटीं । तीन्ही लोका नाहीं सुटी । पराक्रम राहीला ।। ४९ ।। सांडीली अलंकार भूषणें । वस्त्रें शस्त्रें आभरणें । उघडे पळती साहीजणें । गिरी पर्वत उल्लंघिला ।। ५० ।। तव त्या पर्वतावरी । महा अरण्यामाझारी होती वृक्षाची पोखरी । जाऊनिया झडकरी । तयाभीतरी प्रवेशती ।। ५१ ।। म्हणती भक्त ते हो का येथें । आतां शरण रीघो कवणातें । साहीजण आकांतोनी तेथें । श्वाससुश्वास घालिती ।। ५२ ।। तंव त्या पोखरामाझारी । जन्मली येक कुमरी । ते उठोनी निघाली बाहेरी । दृष्टी देखत तयातें ।। ५३ ।। तयें कर जोडोनी तत्क्षणीं । तिची करिती विनवणी । तुवां रक्षावें स्वामिनी । शरणागतें आपुलिया ।। ५४ ।। इतुकिया अवसरीं । ब्रह्मा विष्णु त्रिपुरारी । जिची वर्णवेना थोरी । तिनें आंगाभीतरी लपविले ।। ५५ ।। तव क्षणाभीतरी । दैत्य पावला वनांतरीं । देखिली ब्रह्मकुमरी । म्हणे कन्या कवणा रायाची ।। ५६ ।। म्हणे येव्हडें अवघड आरण्य । तुज यावया काये कारण । तुजसारिखें निधान । या त्रिभुवनामाजी न देखो ।। ५७ ।। तुझें नाव काये ते सांगिजे । तुवां कोठोनी केलें बीजें । कोन्हें वौसी जन्म तुझे । तें तुवां सांगीजे आम्हासी ।। ५८ ।। येरू म्हणे माझे नांव काये करावे । म्यां तुतें संव्हारावें । ऐसें वरदान देवें । आधीच आम्हासी दीधले ।। ५९ ।। म्हणे येथवरी आलासी । आता कवणे ठाया जासी । कोपु आला मृदमन्यासी । तेणें सींव्हनादु केला ।। ६० ।। मग शस्त्र घेऊनिया करीं । दैत्य चालीला तीयेवरी । सीळा उचलोनी महाथोरी । ते अवसरीं धाविन्नला ।। ६१ ।। तंव अदृश्य जाली सुंदरी । तेज लोपलें अंबरी । नवल त्रीभुवनामाझारी । ते श्रीहरी नेणवे ।। ६२ ।। नग्न खर्ग घेवोनी हातीं । सवेंची उभी राहिली ब्रह्ममूर्ती । दैत्य विचारी चित्तीं । थोर ख्याती इयेची ।। ६३ ।। आतां कैसें करूं । हे ब्रह्ममूर्ती संव्हारूं । म्हणोनि तो निशाचरू । चिंताक्रांत बैसला ।। ६४ ।। तंव इतुकिया अवधानीं । आली शरणागताची जननी । राहे राहे म्हणोनी । खर्ग मंत्रोनी मोकलिलें ।। ६५ ।। खर्ग टाकिलें तयावरी । म्हणे दैत्य संव्हारी गा झडकरी । ऐसें म्हणोनि सुंदरी । शस्त्र सोडिती झाली ।। ६६ ।। पडली देवीसी चिंता । कैसें संव्हारुं या दैत्या । दैत्य न मरे तरी सर्वथा । मज शाप देतील ।। ६७ ।। तिचे हातींहोनी शस्त्र सुटलें । भुजादंड तोडोनी गेलें । सिरकमल पडिलें । सवेंची गेलें आकाशीं ।। ६८ ।। तव रुंड पडले धरणी । उदो म्हणती तत्क्षणी । तुवां रक्षिलें स्वामिनी । शरणांगतातें ।। ६९ ।। यैसा मृदमन्या संव्हारीला । ब्रह्मा विष्णु रुद्र विजयी जाला । महामायेच्या चरणीं लागला । त्राहे त्राहे म्हणोनिया ।। ७० ।।

सावित्री लक्ष्मी पार्वती । महामायेचे चरणीं लागती । तुवां रक्षिले आमुचे पती । जीवदान दीधलें ॥ ७१ ॥ मग येरायेरी आलिंगीलें । कर जोडोनी पुसीलें । माते कोठोनी बीजें केलें । तें आम्हासी सांगिजे ॥ ७२ ॥ तंव इतुकिया अवसरीं । काये बोलिली सुंदरी । चौदा भुवनें तुमच्या उदरीं । आपुले मनीं विचारा ॥ ७३ ॥ मज नाहीं जनक जननी । माझा रहिवास त्रिभुवनीं । मी नीरांजनें असे स्वामिनी । अैसें तुम्ही जाणावें ॥ ७४ ॥ माझें नांव एकादशी । मी ठाउकी नव्हती कोन्हासी । होती अदृश्य वनवासी । मी जालीये प्रगट ॥ ७५ ॥ मग म्हणे रुसीकेसी । तुवां कधीं न सांडावें आम्हासी । आम्ही पंधरावे दिवसीं । येकादशीव्रत आचरूं ॥ ७६ ॥ एकादशी म्हणे लक्षुमीपती । माझें वृत जे आचरिती । ते तुवां नुपेक्षावे श्रीपती । ऐसी भाक देई मज ॥ ७७ ॥ मग म्हणे लक्षुमीपती । तुझें व्रत जे आचरिती । त्यासी नाहीं पुनरावृत्ती । ते संसारावेगळे ॥ ७८ ॥ मात्रागमन सुरापान । ब्रह्महत्या गोत्रवध जाण । परस्त्रीवेश्यागमन । महापातकें हरती ॥ ७९ ॥ येक यातीभ्रष्ट जाले । येकीं गोत्रवध केले । येकीं अतीत दवडिले । येकी वर्जिले भ्रतारा ॥ ८० ॥ येक वृतभंग करिती । येक ब्राह्मणाचीं घरें मोडिती । येंक कन्याद्रव्यें घेती । येक करिती विश्वासघात ॥ ८१ ॥ येक तीर्थयात्रा न करिती । येक नेमभाक मोडिती । इतुके महापातके नासती । येकादसीं केलिया ॥ ८२ ॥ येकादसीस जो घेईल अन्न । तो पित्रुघातकी जाण । गर्दभमांस तेणें अग्नीवीण । स्वीकरीलें जाण पां ॥ ८३ ॥ कीटक पडला गोमांसासी । ऐसें भोजन होये त्यासी । मायबापाचीया जीवासी । घात करी परियेसा ॥ ८४ ॥ जो न करी येकादसी । इतुकें पातक घडेल त्यासी । अैसें बोले रुसीकेसी । येकादसीजवळी ॥ ८५ ॥ तंव विष्णु बोले आपण । अैसें देतो वरदान । महेश म्हणे सत्यवचन । आतां चलावें कैलासीं ॥ ८६ ॥ मग घंटानादें विमानीं संभ्रमेसी । बैसवीली येकादसी । मंगळ तुराचेनी घोसीं । अंबर गर्जत असे ॥ ८७ ॥ विष्णु सामवेद म्हणतसे । ब्रह्मा नारदु गातसे । अैसा आनंदु कैलासीं होतसे । ईश्वर टाकी सहश्रमनेसी ॥ ८८ ॥ मग कर जोडोनी रुसीकेसी । विनवीतसे महेशासी । आज्ञा द्यावी जी आम्हासी । वैकुंठासी जावया ॥ ८९ ॥ येकादसी वाहिली गरुडावरी । लक्षुमीसहित बैसले हरी । तेज प्रकाशलें अंबरीं । जयेजयकार प्रवर्तला ॥ ९० ॥ मग गरुडावरी उतरोनी । येकादसी बैसली सिंव्हासनीं । अर्घ्य पाद्य देउनी । नाना विधी पुजीली ॥ ९१ ॥ मग म्हणे रुसीकेसी । वेगीं बोलावा गरुडासी । डांगोरा पिटावा नगरासी । येकादसी करावया ॥ ९२ ॥ अवघे विस्मीत जाले । लोक तटस्थ राहिले । तव नारदें ऐकिलें । झडकरी आला विष्णुपासी ॥ ९३ ॥ इंद्र मुख्य रुसीश्वर । आणि गंधर्व सुरवर । करिती मंत्रघोष उच्चार । येकादसी जवळी पैं ॥ ९४ ॥ तेथे थोर आनंद जाला । महाविष्णु संतोषला । नारद चरणीं लागला । देवा विनंती परियेसा ॥ ९५ ॥ नारद म्हणे अवधारी । हें वृत आचरावें कैसियापरी । मग बोलिले श्रीहरी । नारदाप्रती पैं ॥ ९६ ॥ दशमीस येकभुक्त

राहावें । संध्या अनुष्ठान सारावें । मग दिंडी जागरण करावें । हरिकीर्तनेसी ।। ९७।। लावोनी गोपीचंदनाचा टिळा । शंखचक्र तुळसी माळा । उभा वज्रपंजर टिळा । तुळसी मृत्तिका लावोनी ।। ९८ ।। येरे दिवसीं संध्या स्नान । येकादसी उपोशन । आइकावें हरीकीर्तन । जागरणें करोनी ।। ९९ ।। चतुरप्रहर येकादसीसी । निद्रा करूं नये रात्रीसी । अंतर न दयावें द्वादसीसी । येकभुक्त करावी ।। १०० ।। दिवसा असावें जागृत । निद्रा करों नये निभ्रांत । वृतभंग होईल त्वरित । यापरी वृत आचरावें ।। १०१ ।। महापातकाचे पर्वत नासत । आचरतां हे वृत्तांत । विष्णु असे सांगत । नारदापुढे ।। १०२ ।। अैकोनि श्रीहरीचें वचन । संतोशलें नारदाचें मन । हृदयीं धरोनिया पूर्ण । चरणीं माथा ठेविला ।। १०३ ।। मग म्हणे रुसीकेसी । हेची सांगतसे तुम्हापासी । जो न करी या वृतासी । तुम्ही त्यासी दंडावें ।। १०४ ।। त्यासी नेवोनी यमपुरीसी । दंड करावा तयासी । भविष्य प्रहरी यमप्रदेशी । नेवोनि कुंभीं घालावें ।। १०५ ।। गरुड पाठवीला नगरांत । जो न करील येकादसीवृत । धरोनी तयासी त्वरित । नगराबाहिर घालावें ।।१०६।। अैसें वृत जे आचरती । त्याचीं महापातकें नासती । श्रीकृष्ण सांगे पांडवांप्रती । द्रौपदी कुंती मुख्ये करोनी ।। १०७ ।। मी बोलिलो अल्पमती । कथा सांगितली भारती । श्रीकृष्ण सांगे अर्जुनाप्रती । ते तुम्ही परियेसा ।। १०८ ।। हे कथा जे ऐकती । पावती पुत्र कलत्र संपत्ती । त्यासी होये ज्ञान मुक्ती । अैसें श्रीपती बोलिले ।। १०९ ।। अैका येकादशीचें महिमान । श्रीकृष्ण सांगती आपण । वृत आचरती सकळ जन । महापातकें नासती ।। ११० ।। विष्णुदास नामयासी । प्रसन्न जाली येकादसी । विघ्न बांधोनि चरणासी । वैकुंठासी पैं नेलें ।। १११ ।। इति श्री महाभारते शांतिपर्वे शतसहस्रसंहितायां प्रसंग दहावा ।।

७. केशवकृत संतमालिका

प्रा. मधुकर रामदास जोशी, अकोला

आजपर्यंत अनेकांच्या संत मालिका उपलब्ध झालेल्या असल्या तरी केशवाची संतमालिका महाराष्ट्रास अज्ञातच होती. तंजावर येथील सरस्वतीमहाल ग्रंथ-संग्रहालयांत ही मालिका मला उपलब्ध झाली.[१]

या संतमालिकेंत येणारीं माधव पाठक, चिदानंद, अच्युताश्रम, आनंदबोध, टुका कृष्ण, काको मडक्या व श्रीकांत हीं नांवें आजपर्यंत महाराष्ट्रास अपरिचित होतीं.

अच्युताश्रमाची गीता टीका सरस्वती महालांत असून[२] या टीकेचा उल्लेख अंबर-

---

१. वही क्रमांक २१४०; Vol. III; २. भगवद्गीता बालबोधिनी टीका; क्र. २६५ :Vol. I.

हुसेनींत झालेला आहे.[१] अच्युताश्रम हा चिदानंदाचा शिष्य असून त्याच्या गीता-टीकेवर शके १६४४ असा लेखन शक दिलेला आढळतो. या मालिकेंत उल्लेखिलेला श्रीकांत हा "अवधूत दत्त-सदानंद" परंपरेंतील असून त्याच्या नांवावर "अद्वैत मकरंद" नांवाचा निर्देश केलेला आहे.

संतमालिकाकार केशव "एकनाथ-जनी जनार्दन" परंपरेंतील आहे. तो सर्व संतांना 'खेळिये' असें संबोधितो. ह्या मालिकेंत आलेली संतमंडळी शके १६५० पर्यंतची आहेत.

संतमालिका

मत्स्येंद्र गोरक्ष गैणी चर्पटी चौरंगी जालंधर गोपीचंद कानपा योगी रे।
येकलिंग गुहेश्वर परमार्थ शंकर हस्तामलक नि:संगी रे ॥
भाइयों तयामध्यें थोर येका रे। ते स्वयेंचि आपण जीवन्मुक्त जाले ॥
येणें तरोनि तारीले देखारे भाईनो तयामध्यें थोर येका रे॥
येकी अनेकी येकत्व दाउनि। उद्धरिले सर्व लोका रे तयामध्यें थोर एका रे ॥धृ॥
निवृति सोपाने ज्ञानदेव मुक्ताई चांगदेव खेचर विसा रे।
नामा बिठा नारा सावंत नरहरि। भानुदास गोरा कुंभार बहिरो पिंजा रे भाईनो ॥ २ ॥
परमानंद जोगा जनमैत्र नागा परसा केशवदास चांगा रे
नामा पाठक माधव पाठक माधवदास स्वरुपी ज्या सता गाइरे भाईनो ॥३॥
नवलाख साला सनतीदास मैराळ कनकदास चोखा मेळा रे
विठ्ठल पुरंदर हर्या कुर्मदास रेणुकानंदन खेलया रे भाईनो ॥ ४ ॥
जगनाथ हरिनाथ रामचंद्र मुनिमुकुंद तत्वदर्शिनी रे
सदानद चिदानंद अच्युताश्रम तुका योगी आत्मज्ञानी रे भाईनो ॥ ५ ॥
सूरदास जसवंत रामानंद कबीर रोहीदास तुलसीदास रे
धनाजाट शेनी पात्र काना मिराबाई खुदो सोनु सीदास रे भाईनो ॥ ६ ॥
पिपापूत दादू पिंजारा आत्मबोध वेडा नागा धन्य रे
अज्ञानसिद्ध सेख महामदमीया बीडस्थ जनार्दन रे भाईनो ॥ ७ ॥
सैद महामद चांद बोधला जनार्दन सहजबोध रंगबोध आनंद बोध रे
चिद्रुप नारायण श्रीकांत मृत्युंजय मुधया सहजानंद रे भाईनो ॥ ८ ॥
तयामध्ये थोर एका रे ॥
आचार्य त्रिविक्रम आनंदमूर्ति काको मडक्या स्वयं ब्रह्म रे
चिंतामणि बहिरो दासोपंत निंबाजी काशीराज आत्मारामी राम रे भाईनो ॥ ९ ॥

---

१. अच्युताश्रम निवृत्ति नाथादि। गीतेचिये प्रति श्लोकिं।
केली वोवी येकि येकी। परि श्लोकार्थ संपूर्ण नसे ॥ ११ ॥ अ. १ ॥
हस्तलिखित क्रमांक ४९; Vol. I.

विश्वनाथ मालो लतीफ गंभीर नाथ तुका कृष्ण जयराम रे
नित्यानंद पूर्णानंद कल्याण शिवरामदास सहजसिद्ध विश्राम रे भाईनो ॥१०॥
अवघे खेळया समान भाइया खेळयास पाड तो काई रे ॥
जनी जनार्दन तेथे कैचे न्यून पूर्ण गुरु कृपे केशव पाहिं रे ॥ ११ ॥

८. साताऱ्चे छत्रपति प्रतापसिंह महाराज यांच्या कारकिर्दीतील सातारा शहर

(सन १८१९ ते १८३९)

श्री. वि. गो. खोबरेकर

साताऱ्चे छत्रपति प्रतापसिंह महाराज यांना इंग्रजांनीं साताऱ्चें राज्य स. १८१९त दिलें, तेव्हां सुरुवातीला सातारा हें राजधानीचें शहर एक बकाल शहर होतें, असें इंग्रजी कागदपत्रांवरून समजतें. १८२० त या शहरांत म्हणे एकच लांब रस्ता होता. दगड मातींनी किंवा बिन भाजलेल्या विटांनीं बांधलेली कौलारू घरें होतीं. शहरांत एकहि हिंदु देवालय नव्हतें. अदालत वाड्याखेरीज नांव घेण्यासारखी दुसरी वास्तु जवळ जवळ नव्हतीच. पेशवे जेव्हां साताऱ्यांत येत तेव्हां ते अदालत वाड्यांत रहात. त्यानंतर रेसिडेन्ट ग्रँट डफ हा तिथें राहूं लागला. राजवाडा बांधून होईपर्यंत प्रतापसिंहहि तेथें कांहीं काळ रहात होता. अदालत वाडा ही मराठेकालीन जुन्या पद्धतीनें बांधलेली दुमजली इमारत होती. छत्रपतींचें निवासस्थान किल्ल्यांतील राजवाड्यांत नाहीं तर 'जुन्या वाड्यां'त असे. हीं दोन्ही ठिकाणें राजाच्या रहाण्याच्या दृष्टीनें अपुरीं होतीं. रेसिडेंट ग्रँट डफनें नवीन राजवाडा बांधण्यासाठीं म्हणून तीन लाख रुपये बाजूला काढून ठेवले होते, व राजवाड्यासाठीं जागाहि पाहून ठेवली होती. शहरांतील मुख्य रस्त्यांपासून ही जागा बरीच दूर असली तरी ग्रँटच्या भाकिताप्रमाणें तो भागहि पुढें गजबजून गेला.[1]

या तीन लाखांच्या रकमेंत बांधलेल्या राजवाड्याचा मुख्य भाग १८२२ च्या सुमारास पुरा झाला. त्यानंतर कालांतरानें त्यांत जलमंदिर, नवीन राजवाडा, तबेले, विविध प्रकारच्या कचेऱ्या, पहारेकऱ्यांच्या खोल्या आणि नगारखाने यांची भर पडली.[2]

कं. ग्रँट डफ आणि जनरल ब्रिग्ज या दोन्हीं रेसिडेंटांनीं सातारा शहराची पुन-

१. पोलिटिकिल डिपार्टमेंट व्हॉल्यूम १४९–२३२१, पृ. ३; २. कित्ता पृ. १०४–१३१.

रचना करण्याच्या दृष्टीनें आखणी केली आणि याबाबत ज्या योजना आखल्या गेल्या, त्यांना राजानें फक्त संमतीच दिली नाहीं, तर त्या पार पाडण्याचे सर्व प्रयत्न केले.

छत्रपति प्रतापसिंहाच्या कारकीर्दीत शहर सुधारणेच्या दृष्टीनें जी खबरदारी घेतली जात होती, त्यांत पुढील गोष्टी उल्लेखनीय होत्या. शहरांतील रस्ते स्वच्छ ठेवणेविषयीं हुकूम काढला गेला होता. रस्त्यांवर घाण करणाऱ्यांकडून दंड वसूल केला जात होता. तसा जाहीरनामा काढला गेला होता.[१] रस्त्यांची बांधणी व डागडुजी यांकडेहि विशेष लक्ष पुरविलें जात होतें. रस्त्यांवरील मोठे दगड, झाडें वगैरे काढून, खाचखळगे बुजवून ते सपाट करण्याची काळजी घेतली जात होती. असें करतांना ज्या रस्त्यावर विशेष खर्च लागेल असा रस्ता डावलून मुळांतच सपाट जागा असलेला रस्ता उपयोगांत आणून खर्च आटोक्यांत आणण्याची खबरदारीहि घेतली जात होती. अशा प्रकारें बांधल्या गेलेल्या रस्त्यांत पुढीलप्रमाणें रस्ते उल्लेखनीय होते. (१) वाड्यापासून जकातवाडीपर्यंत अर्धा कोस, (२) जकातवाडीपासून निरतलपर्यंत चार कोस, (३) निरल चढाव एक कोस, (४) घाटमाथा अडीच कोस, (५) घाट उतार दोन कोस, (६) कोयनेपासून तिवऱ्यापर्यंत दोन कोस. या सर्वांसाठीं सुमारें चाळीस हजार रुपये खर्च आला.[२] अशा प्रकारें बांधलेल्या रस्त्यांवर रहदारी सुरळीत होते कीं नाहीं, प्रवाशांना ते रस्ते सोयीचे पडतात कीं नाहीं याची चौकशी राजा स्वतः प्रवाशांना भेटून करीत असे.[३]

नद्यांवर पूल बांधतांना चांगल्या सामानांचा वापर करण्याकडे विशेष लक्ष दिलें जात होतें. कृष्णा नदीवर आरळे वडूथ येथें पूल बांधण्याच्या संबंधांत मक्तेदारांना ज्या सूचना देण्यांत आल्या होत्या, त्यांतील पुढील सूचना लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत " सर्व सळईचें काम लोखंडी असावें. कोने (कॉर्नर्स) ३६ इंच लांबीचे व १८ इंच रुंदीचे असावेत, दोन दगडांमध्यें पाव बसेल तो खोल इंचभर दगडांत असावा व त्यावर गरम शिसें ओतून तो घट्ट करावा, चीर गेलेला दगड कामास लावूं नये, गावरानी चुना वापरू नये, चांगला वापरावा, चुन्यांत रंगाचें सामान घालावयाचें तें चांगलें असावें. पुलावर कठडा करावयाचा तो पक्क्या विटांचा चुन्यांत करुन बाहेरून टिपगारी व आंतून चुन्याचा गिलावा करावा. " इत्यादि[४]

आरळे वडूथ येथील या पुलाची लांबी ३७५ फूट होती. याखेरीज वेण्णा नदीवर वाढे येथेंहि पूल बांधला गेला होता. त्याची लांबी २३० फूट होती. सदरहू दोन्ही पुलांचें काम कशा रीतीनें करावें त्याच्या याद्या स्मिथ साहेबानें तयार केल्या होत्या व केवळराम मिस्त्री सुतार गुजराती यानें या कामांवर देखरेख ठेवून स्मिथ साहेबांच्या फरमान्याबरहुकूम करावें, त्यांत कोणताहि हलगर्जीपणा होऊं देऊं नये अशा सूचना व ताकिदी देण्यांत आल्या होत्या.[५]

१. प्रतापसिंह रोजनिशी न. १३, पृ ३९१; २. कित्ता, पृ. २९५; ३. कित्ता पृ. ३१०; ४. सातारा महाराजा दप्तर फडणिशी, रु. क्र. १३१; ५ कित्ता.

पालीच्या जत्रेस जातांना वाटेंत देवजाणे नदीवर लाकडी पूल घालण्यांत येत असे. गोरगरीब व विशेषतः बायकामुलें या तकलादू पुलावर धक्के बसून पडण्याचा धोका असे, शिवाय गुंडांचाहि या बाबतींत उपद्रव होत असल्यामुळें हा पूल करूं नयें असेंच राजानें आपलें मत रोजनिशींत व्यक्त केलें आहे.[1]

प्रतापसिंहाच्या मनांत पाण्यासाठीं एक नळ बांधावयाचा होता व त्यासाठीं सुमारें ५०,००० रुपये खर्च होणार होता. पण ग्रँट साहेबांचें मत होतें कीं राजाची पाण्याची व्यवस्था आहेच व रयतेसाठींहि तलाव आहे. म्हणून खजिन्याचा अजमास पाहून पाण्यासाठीं जास्ती पैसा खर्च न करतां पंढरपुरापर्यंत किंवा चिपळूणपर्यंत रस्ते बांधण्यासाठीं पैसा खर्च करावा.[2]

सातारा येथें प्रतापगंज, दुर्गा पेठ, मल्हार पेठ, भवानी पेठ, इत्यादि नवीन पेठांच्या वसाहती करण्यांत आल्या. ह्या पेठा वसवितांना व्यापाऱ्यांस सर्व प्रकारच्या सोयी व सवलती उपलब्ध करून देण्यांत आल्या. सातारा येथील मारवाडी, व्यापारी वगैरे लोकांनीं आपणांस विशेष सवलती हव्या असल्याबद्दल अर्जी केली. अकरा वर्षें कौल माफी, दुकानें बांधण्याकरितां तगाई कर्जें, पेठेंत पाण्यासाठीं विहीर, बंदोबस्तासाठीं चावडी, धर्मशाळा, इत्यादि सोयी त्यांना देण्यांत आल्या.[3]

हैदराबादचे रेणूराव फडणीस यांच्या कारकुनानें प्रतापसिंहाकडे येऊन अर्ज केला कीं बाजीराव पेशव्यांनीं भीमा तीरीं घाट बांधावयास घेतला होता, पण तें काम पुरें झालें नव्हतें, तेव्हां तो घाट पुरा करण्याची परवानगी त्यांस देण्यांत आली.[4]

सातारा शहरांत बंदोबस्ताकरितां कवाईती लोकांचे पहारे चार ठिकाणीं ठेवण्यांत आले. अश्विन महिन्यापासूनचे चार महिने खेरीज करून व कवाईती करण्याचे दिवस सोडून या लोकांनीं आपापल्या जागीं नेहमीं पहारा ठेवावा असा बंदोबस्त केला. चोर दरोडेखोरांना दबदबा बसावा व शहरांत योग्य बंदोबस्त रहावा हा यामागील हेतु होता.[5]

सातारा शहरांत वानरांचे कळप नेहमीं येऊन घरांवरील कौलें फोडून व दारांतील झाडें मोडून फार उपद्रव देत म्हणून या माकडांना शहरांतून पिटून काढून येवतेश्वराकडून कोयना काठाकडे आठ-दहा कोसांवर नेऊन घालण्यासाठीं बालाजी कृष्ण करमरकर याजकडे हें काम सोपविण्यांत आलें. यासाठीं लागणारे शिपाई वगैरे करमरकरांनींच ठेवावेत व त्यासाठीं शहरांतील दर मोठ्या घरांतून एक रुपया, मध्यम घरांतून दहा आणे, व त्याहून लहान घरांतून सहा आणे व चार आणे वसूल करावेत असा मक्ता देण्यांत आला.[6]

● ● ●

---

१. प्र. रो. नं. ८, पृ. ११८. २. प्र. रो. नं. ५, पृ. ३३१–३३२; ३. सा. म. द. फडणिशी, रु. १३६; ४. प्र. रो. नं. १३, पृ. १३०; ५. प्र. रो. नं. १७, पृ. २८५; ६. सा. म. द. फडणिशी, रु. क्र. १३१.

९. पिलाजी गायकवाडाचा खून

प्रा. दि. के. देशपांडे, अमळनेर

गुजराथेंत मराठी सत्तेचा विस्तार करण्याचें श्रेय बव्हंशीं गायकवाड घराण्याकड जातें. या राजघराण्याचे आद्यपुरुष म्हणून पिलाजी गायकवाड यांचा उल्लेख करण्यांत येतो. या पिलाजी गायकवाडाचा खून, दिल्लीच्या मोंगल बादशाहाचा गुजराथेंतील चौपन्नावा सुभेदार, राजराजेश्वर, महाराजाधिराज अभयसिंग (मारवाडचा राजा) यानें डाकोर मुक्कामीं करविला. खुनाची ही घटना नियोजनपूर्वक, जाणूनबुजून व विचारपूर्वक अशी झालेली असल्यामुळें या घटनेचा तपशील बघणें व विश्लेषण करणें उपयुक्त ठरेल.

पिलाजी झुंगोजी गायकवाड हे मौजे दावडी, परगणे चाकण येथील पाटील घराण्यांत जन्मले. आपले चुलते थोरले दमाजी यांचेबरोबर मुलुखगिरी करीत करीत पुढें आले. थोरल्या दमाजींना मुलगा नसल्यामुळें त्यानें पिलाजीला दत्तक घेतलें. सेनापती दाभाडयांच्या सैन्यांत कामगिरी बजावीत व कर्तबगारी गाजवीत ही मंडळी पुढें आली. इ. स. १७१९ नंतर पिलाजीनें गुजराथेंत चांगला जम बसवला. सुरतेजवळील सोनगड किल्ला, बडोदें, डभई इत्यादि ठिकाणीं त्यांनीं बळकट ठाणीं प्रस्थापित केलीं. १ एप्रिल १७३१ ला डभईच्या लढाईंत सेनापती त्रिंबकराव दाभाडे मारले गेले व गुजराथच्या राजकारणाला कलाटणी मिळाली. पिलाजी गायकवाड हेच दाभाडयांच्या वतीने गुजराथेंत कामगिरी पाहूं लागले. त्रिंबकराव दाभाडयांचा मृत्यु व त्यानंतर पेशवे थोरले बाजीराव यांनीं गुजराथेंतून काढता घेतलेला पाय यांमुळें पिलाजी गायकवाड हेच एकटे कर्तबगार मातबर असामी गुजराथेंत शिल्लक राहिले. कोणत्याहि मार्गानें त्यांचा काटा काढल्यास गुजराथ मराठ्यांचेपासून पूर्णपणें मुक्त होईल या आशेनें अभयसिंगानें खुनाचा हा पवित्रा घेतला.

अभयसिंगाच्या पूर्वींचा गुजराथेंतील मोंगल सुभेदार सरबुलंदखान हा मराठ्यांच्या गुजराथेंतील राज्यविस्ताराला आवरूं शकला नाहीं व मराठ्यांनीं गुजराथेंत पुनः पुन्हा स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली; तेव्हां अकार्यक्षम अधिकारी म्हणून त्याची बदली करून त्याचेऐवजी अभयसिंगाची नेमणूक झालेली होती.[१] अभयसिंग मोठ्या तयारीनिशी गुजराथेंत आला होता.[२] १७३० सालच्या धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर तो अहमदाबादला आला होता. १ एप्रिल १७३१ ला पेशवे व सेनापती यांच्यांत यादवी युद्ध होऊन सेनापती दाभाडे मारले गेले. ही घटना अभयसिंगाच्या पथ्या-

१. Com. : Vol. II, p. 430; २. I. H. R. C. XV, p. 124–125; XXIII, p. 69.

वरच पडली. मराठ्यांची शक्ति गुजराथेंतून आतां ऱ्हास पावणार या समाधानांत तो असतां, पिलाजी गायकवाड कर्तबगारी दाखवूं लागला व ही त्याची कर्तबगारी सुभेदार अभयसिगाच्या डोळ्याला सलूं लागली. पिलाजीनें एका वर्षाच्या आंत मराठ्यांची बाजू सावरून धरून पुन्हा गुजराथेंतील राज्यविस्ताराला सुरुवात केली. त्यामुळें अभयसिंगाला पिलाजीचा बंदोबस्त करणें भाग पडलें. वास्तविक पिलाजीचें सैन्य पंधरा हजार घोडेस्वार व पांच हजार पायदळ येवढें[1] तर अभयसिंगाच्याजवळ याच्या दुप्पट सैन्य होतें.[2] याशिवाय मोंगलांचा तोफखाना त्याचेजवळ होता. अशा स्थितींत पिलाजीशी समोरासमोर लढाई करण्याऐवजी त्याचा खून करण्याच्या मनस्थितींत अभयसिंग कां आला याचें आश्चर्य वाटणें साहजिक आहे. अभयसिंगानें दिल्लीला बादशहाजवळ असलेल्या आपल्या वकिलाला पाठवलेल्या एका पत्रांत यासबंधाने स्पष्टीकरण केलें आहे. तो म्हणतो, "पिलू समोरासमोर लढाई कधींच देत नाहीं. मोंगलांच्या सैन्यांवर सतत धाड घालतो. पिछाडीवर वारंवार हल्ला करून, दिवसाला तीन मैल जाणेंदेखील कठीण करून सोडतो. आमच्यासमोर वीस मैलांवर त्याने मुक्काम केला तर आम्ही त्याचेवर हल्ला करून त्याला ठार मारूं शकूं. परंतु तो आमच्यासमोर थांबतच नाहीं."[3] तेव्हां पिलाजीला थांबवण्यासाठीं तहाच्या वाटाघाटीचा घोळ घालून दग्यानें त्याला ठार मारण्यांत आलें. ही गोष्ट अभयसिंगानें स्वतःच मान्य केलेली आहे.[4]

१७३२ च्या मार्चमध्यें पिलाजीचें सैन्य मही नदी ओलांडून अहमदाबादच्या रोखानें निघालें. त्याला अडवण्यासाठीं अभयसिंग अहमदाबादबाहेर पडून, वरेजा येथें तळ ठोकून उभा राहिला. वाटाघाटीनें प्रश्न सुटला तर पहावें म्हणून प्रयत्नास सुरुवात झाली. बडोदें व डभई हीं दोन मातबर ठाणीं सोडण्यास पिलाजी तयार होईना. पिलाजीनें मोंगलांची नोकरी स्वीकारावी म्हणून अभयसिंगानें त्याला आमिषहि दाखविलें,[5] परंतु पिलाजी या गोष्टीस कबूल होईना. वाटाघाटीचे वेळीं पिलाजीनें मांडलेली भूमिका खंबीर होती.

"बडोद्याचा संबंध आपल्या मस्तकाशीं आहे. (तें सोडतां येणार नाहीं) असले तीन सुभेदार आले व गेले. सरबुलंदखान देखील सुभेदार म्हणून आला, परंतु आम्हाला 'चौथाई' देऊनच त्याला परत जावें लागलें." अशी भाषा पिलाजीकडुन उच्चारली गेली. तेव्हां त्याचा कांटा काढल्यावाचून बडोद्याचा ताबा मिळणें अशक्य आहे असा विचार मनांत आणून अभयसिंगानें त्याचा खून करण्याचा मार्ग स्वीकारला असें अभयसिंगानेंच आपल्या दिल्लींतील वकिलाला पाठवलेल्या पत्रांत म्हटलें आहे.[6] त्रिंबकराव दाभाड्यांच्या मृत्यूनंतर त्याचे मुतालिक व सहाय्यक

---

१. I. H. R. C. XIV, p. 64; २. I. H. R. C. XXIII. p. 69; ३. I. H. C. VI. p. 283–284; ४. कित्ता. ५. कित्ता. ६. I. H. C. VI, p. 283–284.

म्हणून राजकारण पिलाजीच्या हातांत आलेलें होतें. गुजराथेंतील भिल्ल व कोळी लोकांवर त्याचें जबरदस्त वजन होतें.[१] पाद्रा येथील देसाई व इतर जमीनदारांना मोंगलांच्यापेक्षां मराठ्यांचा ओढा अधिक होता व ते मराठ्यांना शक्य तें सर्व सहाय्य करीत असत.[२] मातबर ठाणीं ताब्यांत घेऊन पिलाजी आपले पाय गुजरायेंत पक्के करीत होता. त्याचा कांटा काढल्याशिवाय दक्षिण गुजराथचा प्रदेश मोंगलांच्या ताब्यांत येणें कठीण होतें. डभईच्या लढाईनंतर बाजीराव घाईघाईनें दक्षिणेंत परत गेला तेव्हां या एकुलत्या एका मातबर सरदाराचा नाश करावा व मराठ्यांचा गुजराथेंतील अम्मल उठवून त्यांना जबर दहशत बसवावी असा सर्व दृष्टीनें विचार करून अभयसिंगानें ही कृती केली, असें सर्व घटनांचा साकल्यानें अभ्यास केल्यानंतर मत होतें. केवळ बोलाचालीचे वेळीं वावगे शब्द पिलाजीनें उच्चारले म्हणून क्रोधानें झालेली ही कृती नाहीं. पिलाजीच्या (व एकूण मराठ्यांच्या) ‘ गनिमी काव्या ’च्या लढाईला अभयसिंगाला तोंड देतां येईना, त्यांना थोपवून धरतां येईना म्हणून त्यानें हा ‘ मोगलाई कावा ’ केला हें स्पष्ट दिसतें. अभयसिंगानें स्वतःच्या एका पत्रांत ही गोष्ट मान्य केलेली आहे.[३]

पिलाजीचा खून किती पद्धतशीर व नियोजनपूर्वक केला गेला हें पाहाण्याजोगें आहे. २० मार्च १७३२ च्या सुमारास पिलाजीचा मुक्काम क्षेत्र डाकोर येथें होता. वाटाघाटी करण्यासाठीं अभयसिंगानें त्याचेकडे आपलीं माणसें पाठविलीं. इंदा लखदीर (जैनसिंगाचा मुलगा), पांचोली रामानंद व अजदासिंग भंडारी हीं या शिष्टमंडळांतील प्रमुख माणसें होतीं. “ ज्या जमातींत गुन्हा करणें ही नेहमीची बाब आहे अशी ही दगाबाजींत प्रवीण असलेली मंडळी मुद्दाम निवडून पाठविली होती. ” असें मिरात-इ-अहमदी या ग्रंथांत अली महमदखान या तत्कालीन इतिहासकारानें म्हटलें आहे.[४] वाटाघाटीला जाण्यापूर्वीं त्यांच्याशीं गुप्त करार करून व वचनानें पक्कें बांधून घेऊन कामाचें स्वरूप पक्कें केलें. मुलाखतीच्या वेळीं अनुकूल संधी पाहून त्यांनी हें काम उरकावें असें त्यांना सुचविण्यांत आलें.[५] त्याचप्रमाणें गेल्यानंतर त्यांची सूचना येतांच निवडक लोक, अचानक हल्ला करून मराठ्यांच्या छावणींत गोंधळ माजवून, त्यांचा उच्छेद करण्यासाठीं तयार ठेवण्यांत आले.[६] कशा तऱ्हेनें व केव्हां हा अचानक हल्ला व्हावा ही गोष्ट गेलेल्या लोकांनीं, तेथील परिस्थिति पाहून, सुचवावयाचें होतें.[७] तहाच्या वाटाघाटीसाठीं गेलेली ही मंडळी, मराठ्यांच्या छावणींत हेरगिरी करून माहिती पाठवण्यासाठीं व खुनाची संधि साधण्यासाठीं वाटाघाटीचा घोळ घालत राहिली. हवी असलेली संधि प्राप्त होणें शक्य आहे असें पाहून त्यांनीं सुभेदार अभयसिंगाकडे निरोप पाठवला. अभयसिंगानें अत्यंत निवडक,

१. Bombay Gazetteer, p. 313; २. राजवाडे खं. २, पृ. ६४; ३. I. H. C. VI, p. 283–284; ४. Mirat. part II, p. 142–143. ५. कित्ता; ६. I. H. R. C. XIV, p. 64; ७. कित्ता.

युद्धांत निष्णात व अनुभवी असे दोन हजार निवडक स्वार रात्र होण्याचे वेळीं पिलाजीच्या छावणीकडे पाठवले. अभयसिंगाचे हे स्वार जवळ आल्याची खात्री पटतांच, वाटाघाटीचे निमित्तानें दगाबाजी करण्यासाठीं आलेल्या लोकांनीं वाटाघाटी संपवून पिलाजीचा निरोप घेतला व ते तंबूतून बाहेर पडले. तेवढ्यांत इंदा लखदीर हा गृहस्थ कांहींतरी महत्त्वाचें सांगावयाचें राहिलें किंवा जवळील एक महत्त्वाची वस्तु पिलाजीच्या तबूंत विसरली असा बहाणा करून घाईघाईनें तंबूंत परतला व पिलाजीजवळ जाऊन त्याच्या कानांत कांहीं महत्त्वाचें सांगण्यासाठीं म्हणून तो वाकला व त्याच वेळीं हातांतील कट्यारीनें किंवा जमदाडेनें त्यानें पिलाजीवर दोन खोल वार केले.[१] पिलाजीच्या तंबूतील लोकांनीं तावडतोब या मारेकऱ्यास ठार मारले.[२] ग्रँट डफनें आपल्या ग्रंथांत एक मारेकरी सापडला व बाकीचे पसार झाले असें म्हटलें आहे.[३] पण ' मिराते अहमदी ' या फारसी ग्रंथांत तत्कालीन लेखकानें पिलाजीच्या छावणीतील मराठ्यांनीं बाकीच्या साथीदारांनाहि पकडून ठार मारलें असें म्हटलें आहे.[४] प्रत्यक्ष वार करणारा मारेकरी निश्चित मारला गेला याबाबत मात्र सर्वांचें एकमत आहे.

पिलाजीच्या खुनाची ही घटना २३ मार्च १७३२ या दिवशीं (चैत्र शु. ९ विक्रम संवत् १७८८) क्षेत्र डाकोर येथें पिलाजीच्या लष्करी छावणींत घडली. दिवस मावळल्यानंतर दोन तासांनीं हा दगा केला गेला. मराठे अशा बेसावध अवस्थेंत असतांनाच अभयसिंगाच्या दोन हजार निवडक स्वारांनी त्यांच्यावर धाड घातली. वाटाघाटीच्या घोळानें सैन्य बेसावध होतें व वेळ रात्रीची यामुळें मराठ्यांचें जबर नुकसान झालें. सुभेदार अभयसिंगानें दिल्लीला बादशहाजवळ असलेल्या अमरसिंग भंडारी या आपल्या वकिलाला २६ मार्च १७३२ ला पाठवलेल्या पत्रांत यासंबंधीं पुढील माहिती दिली आहे. " पिलूचा भाऊ मेमा[५] व आणखी ५–७ मातबर माणसें मारलीं गेलीं. मराठ्यांचे ५०० लोक जाग्यावरच मारले गेले. मोंगली सैन्यानें कोळ्यांच्याहि निरनिराळ्या ठाण्यावर कत्तली केल्या. ७००–८०० घोडे व बराचसा दारूगोळा आमच्या हातीं लागला. याशिवाय मिळालेली लूट फार मोठी आहे. याप्रसंगीं आमचे फक्त ५० लोक मारले गेले. जखमीत पन्नास बऱ्यांपैकी व सामान्य २०० माणसें आहेत. "[६] या पत्रावरून अशा कठीण प्रसंगींहि मराठे उणे पडले नाहीत हेंच स्पष्ट होतें. पिलाजीचें शव पालखींत घालून, मराठे डाकोर-

---

१, राजवाडे खं. २, पृ. ६४, २. काव्येतिहास संग्रह सन १८८७ पृ. ४० ३. Mirat-i II, p. 142-143; ४. I. H. C. VI, p. 283-84. ५. I. H. R. C. XIV, p. 64; ६. Duff. I. p. 380. २. कित्ता; ३. Duff. I, p. 380. ४. Mirat. II, 142-143. ५. पिलाजीचा भाऊ महादेव याप्रसंगी मारला गेला ही या पत्रांत दिलेली माहिती चुकीची आहे. अभयसिंगाविरुद्ध झालेल्या हालचालींत पुढें बरेच दिवस तो भाग घेतांना दिसतो; ६. I. H. C. VI, p. 283-84;

हून निघून मही ओलांडून, सावळी[१] येथें आलें. तेथेंच त्यांनीं पिलाजीच्या प्रेताचें दहन करून उत्तरक्रिया केली.[२] सावळी येथें पिलाजीची एक छत्री उभारून, जवळच एक तळेंही नंतरच्या काळांत खोदलेलें दिसतें. मही कांठच्या कोळी लोकांनीं, मराठ्यांची फौज माघार घेऊन पळत असतां, त्यांचेवर हल्ला करून त्यांचेजवळ राहिलेली चीजवस्तदेखील लुटून घेतली.[३]

अभयसिंगानें ज्या हेतूनें ही दगाबाजी केली तो हेतु कितपत साध्य झाला हें पाहणें उचित ठरेल. पिलाजी मारला गेला हें निश्चितपणें कळतांच, वेळ न दवडतां, अभयसिंगानें आपल्या तोफखान्यासह मराठ्यांचेवर चाल केली.[४] डाकोरच्या तळाचा विध्वंस झाल्यावर मराठे सैरावैरा पळाले होते. अभयसिंगानें गुजराथेंतील सर्व जमीनदारांना, मराठ्यांना थारा न देण्याविषयीं ताकीद दिलेली होती. शक्य असेल तेथें मराठ्यांना अडवून धरावें असेंहि त्यानें सुचवलें होतें. अभयसिंगानें नंतर बडोद्यावर स्वारी करून २१ एप्रिल १७३२ ला बडोदें जिंकून घेतलें. त्यानंतर हळूहळू जवळपासचे छोटेमोठे वीस किल्लेही अभयसिंगानें जिंकून घेतले. माघार घेत असतांना मराठ्यांची कांहीं फौज नर्मदेकडे सरकली व कांहींनीं डभई किल्ल्याचा आसरा घेतला.[५] पावसाळ्यापूर्वी व नंतरहि अभयसिंगाला डभईचा किल्ला जिंकून घेतां आला नाहीं.[६] याउलट घडलेल्या दुर्दैवी घटनेनें नाउमेद न होतां पिलाजीचा मुलगा दमाजी व पिलाजीचा भाऊ महादाजी त्वेषानें अभयसिंगावर तुटून पडले. उमाबाई दाभाडे, कंठाजी कदमबांडे यांच्यासह तीस हजार फौज घेऊन चाल करून आली, व तिनें अहमदाबादेपर्यंतचा मुलूख लुटून फस्त केला. मराठ्यांच्या या लाटेला थोपवणें अभयसिंगाला अशक्य झालें. शेवटीं मराठ्यांना चौथाई देण्याचें अभयसिंगानें मान्य केलें व अहमदाबादचा वेढा उठवण्यासाठीं त्यानें उमाबाईला ८० हजार रुपये देऊं केले.[७] पेशवे शकावलींतील यासंबंधींची नोंद मोठी बोलकी व मार्मिक आहे. ती नोंद अशी : " पिलाजीचे मरणामुळें अभेसिंग लाभ चिंतीत होता. तो त्यास प्राप्त झाला नाहीं. पिलाजीचा मित्र पाद्रा गांवचा ठिकमा नांवाचा तेथील देसाई होता. त्यानें पिलाजीचा भाऊ महादजी यास बोलावून आणून बडोदें किल्ला त्यानें घेतला. तो अद्यापपर्यंत गाईकवाड यांचे वंशजाकडे आहे. पिलाजीचा वडील पुत्र सोनगडास होता. त्यानें मोठें लष्कर जमा करून बडोद्यापासून जोतपूरपर्यंत स्वाऱ्या करून अभेसिंगास बहुत उपद्रव दिल्यामुळें तो अहमदाबादेस आपला विश्वासू मनुष्य ठेऊन आपण जोतपुरास जाता झाला. "[८] बडो-

१. सावळी बडोद्याच्या उत्तरेला चौदा मैल आहे. २. काव्येतिहाससंग्रहातील 'गायकवाड यांची हकीकत' बखरींत 'पिलाजीला पालखींत घालून सावळी येथें आणतांच तेथें प्राण गेला व यानंतर तेथें प्रेताचें दहन केलें.' अशी माहिती आहे. पृ. ३०; ३. I. H. R. C. XIV, p. 64 ४. Mirat-i-Ahmdi II, p. 143: ५. I. H. R. C. XIV, p. 64-65; ६. Com. p. 445; ७. कित्ता. ८. पेशवे शकावली. राजवाडे खं. २ पृ. ६४.

द्याचा व जिंकलेल्या मुलखाचा परत ताबा मराठ्यांनीं थोडक्याच दिवसांत घेतला व अभयसिंगाला आपल्या जोधपूरच्या मुलखाचें रक्षण करण्यासाठीं परत जाणें भाग पडलें.[१] ज्या गायकवाडांचा उच्छेद करण्यासाठीं हें कृत्य अभयसिंगानें केलें, ते लौकरच गुजराथचे स्वामी झाले व भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत (१९४७) त्यांचा अंमल तेथें चालला.

अभयसिंगाची नामुष्की या मथळ्याखालीं, या खुनासंबंधी माहिती देतांना रियासतकार डॉ. गो. स. सरदेसाई यांनीं 'पेशवा बाजीराव' या ग्रंथांत दोन चुका केल्या आहेत. त्या अभ्यासकांच्या नजरेला आणणें जरूर आहे. सरदेसाई यांनीं पुढील माहिती दिली आहे. "जून (१७३०) महिन्यांत चिमाजी पुण्यास आला. त्यावेळीं बडोदें पिलाजीच्या ताब्यांत होतें, तें अभयसिंगानें हिसकावून घेतलें, आणि डभईस वेढा घातला. नंतर तहासंबधीं उभयतांची वाटाघाट सुरू झाली. त्याकरितां एकमेकांचे वकील एकमेकांकडे जाऊं-येऊं लागले. अशा उपक्रमानें अभयसिंगानें कपटव्यूह रचून एका मारवाड्याचे मदतीनें डाकोर येथें पिलाजीचा खून करविला. (१४ एप्रिल १७३२.),"[२] पिलाजीच्या खुनाची दिलेली तारीख १४ एप्रिल नसून २२ मार्च १७३२ आहे हें अभयसिंगाच्या, २६ मार्च १७३२ च्या पत्रानेंच निश्चित होतें.[३] त्यासंबंधीं संशयाला थोडीदेखील जागा रहात नाहीं.

प्रथम बडोदें जिंकून व डभईला वेढा घालून नतर डाकोरला वाटाघाटी सुरू झाल्या या रियासतकारांच्या विधानांत कालविपर्यासाचा दोष आहे. बडोदें पिलाजीपासून घेण्यासाठींच या वाटाघाटी होत्या, तेव्हां बडोदें घेतल्यानंतर त्या चालू ठेवण्याचें कारण काय? वस्तुस्थिती अशी आहे कीं बडोदें व डभई वाटाघाटीनें मिळत नाहींत म्हणून खुनाचा हा कपटव्यूह अभयसिंगानें रचला व खून झाल्यानंतर जवळजवळ महिन्यानें बडोदें त्यानें जिंकून घेतलें.[४]

अभयसिंगाचे हातून ही अनुचित क्रिया झाल्यामुळें त्याच्या पूर्वचरित्राचा अभ्यास करीत असतां, प्रत्यक्ष जन्मदात्या पित्याचा खून त्यानें केल्याचें आढळतें. 'वीर विनोद' या राजपुतांच्याविषयींच्या इतिहासग्रंथांत पुढील माहिती दिली आहे. "एकदां कांहीं मोंगल सरदार व जयपूरचा सवाई जयसिंग यानें अभयसिंगाला असें समजावून सांगितलें कीं फर्रुखशियर बादशहाच्या खुनांत अजितसिंगाचा हात असल्यामुळें, अजितसिंगाच्याविषयीं बादशाहाच्या (महमदशाह) मनांत खटकतें आहे. जर मारवाडचें राज्य तुम्हांला आपल्या घराण्यांत ठेवावयाचें असेल तर तुम्हीं अजितसिंगाला मारून टाका. तेव्हां अभयसिंगानें आपला धाकटा भाऊ बख्तसिंग याला पत्र लिहून त्याचेकरवीं आपल्या पित्याचा खून करविला व मारवाडची गादी मिळविली."[५] गादी मिळाल्यावर ही मनाजोगी गोष्ट केल्या-

१. कित्ता व Com II, p. 446. २. सरदेसाईकृत पेशवा बाजीराव, पृ. २०७; ३. I. H. C. VI, p. 283–284. ४. I. H. R. C. XIII, p. 249. ५. वीर विनोद. खंड २ (भाग ३) पृ. ८४२ जगदीशसिंह गहलोत: मारवाड राज्यना इतिहास. पृ. १६३; Later Mughals II p. 115.

बद्दल अभयसिगानें बख्तसिंगाला 'राजेश्वर' ही पदवी व नागोरची जागीर दिली.

अभयसिंगाला 'ढोकळसिंग' या नांवानेंहि ओळखत असत. मराठी कागदपत्रांत तो या नांवानेंच ओळखला जातो. अभयसिंगानें राजपुतान्यांत जो विध्वंस केला, जाळपोळ केली त्यामुळें त्याला हें नामाभिधान प्राप्त झालें, असें टॉड म्हणतो. ढोकळसिंग याचा अर्थ विध्वंसक, सर्वनाशक असा होतो. आपल्या राजपुतान्यांत जाळपोळ करून विध्वंसक ही उपाधी मिळविणाऱ्या व जन्मदात्या वडिलांचा खून करणाऱ्या अभयसिंगापासून यापेक्षां अधिक चांगल्या वागणुकीची अपेक्षा कशी करावी? येरवी दग्यानें मारण्याची कृती राजपूत राठोडाला शोभणारी नाहीं हें निश्चित.

Abbreviations explained :

(1) I. H. R. C. : Proceedings of the Indian Historical Records Commission.
(2) I. H. C. : Proceedings of the Indian History Congress.
(3) Com. : History of Gujrat by Commissariat.
(4) Later Mughals : by Irvine and editted by Dr. J. Sarkar.
(5) Gazetteer : Bombay Gazetteer. History of Gujrat. Vol. I; Part P.
(6) Duff : History of Marathas.
(7) Mirat : Mirat-i-Ahmdi (Persian) by Ali Muhammad Khan.
(8) राजवाडे : मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें. खंड –

● ● ●

टीप : पिलाजी गायकवाडाच्या खुनाची बडोदें गॅझेटिअरमध्यें दिलेली हकीकत यापेक्षां निराळी आहे. दंतकथा म्हणून प्रचलित असलेली हकीकत तेथें दिली आहे. "एके दिवशीं पिलाजी डाकोर गावांतून घोड्यावरून जात असतांना, दोन सशस्त्र मारवाडी, एकमेकांशीं हमरीतुमरीवर आलेले त्यांनीं पाहिले. त्यांच्यांत समझोता करून, त्यांचें भांडण मिटविण्यासाठीं पिलाजी त्यांचेजवळ गेला. त्यावेळीं त्या दोघां मारवाड्यांनीं एकदम त्याचेवर हल्ला करून, त्याला कापून काढलें. त्या दोन्हीं मारवाड्यांतील तें भांडण लटकें होतें. पिलाजीला आपल्या मंडळींतून वेगळा काढणें, येवढाच त्या भांडणाचा उद्देश होता." पहा : बॉम्बे गॅझेटिअर, खंड ७; बडोदें, (पृ. १७३.)

१०. सेनापति दाभाडे घराणें : एक अभ्यास

[खंडेराव व त्रिंबकराव]

प्रा. रा. वि. ओतुरकर

१. साधनें

इ. स. १८८७ सालीं म्हणजे ८४ वर्षांपूर्वी काव्येतिहास संग्रहांत 'सेनापति दाभाडे व गायकवाड यांची हकीगत' या नांवानें एक ३६ पृष्ठांची बखर प्रसिद्ध झाली. पुढील वर्षी परांडेकर यांनीं दाभाड्यांचा इतिहास व नंतर धनुर्धारी यांनीं याच विषयावर लेखन केलें. परांडेकरकृत दाभाडे घराण्याचा इतिहास या (प्रसिद्ध इ. स. १८८८) १९५ पृष्ठांच्या छोटेखानी पुस्तकांत त्रिंबकराव पर्यंतची हकीकत सुमारें ८० पृष्ठें असून तींत काव्येतिहास संग्रहांत प्रसिद्ध झालेल्या बखरीपेक्षां बराच वेगळा तपशील आहे. पण त्यास कोठेंही अस्सल पत्राचा आधार दिलेला नाहीं. यावरून हा ग्रंथही त्या काळापुरता तरी ऐकीव माहितीवर आधारित असल्याचें म्हणावें लागतें. धनुर्धारीच्या चरित्रास का. इ. सं. बखरीचा आधार असल्याचें त्यांनींच लिहिलें आहे. पण लेखकासमोर अन्यही साधनें होतीं पण त्यांचें पुस्तकही पुरेशा पुराव्याच्या अभावीं बऱ्याच ठिकाणीं तर्कावर अधिष्ठित आहे. (प्रसिद्धि वर्ष १९०८ दुसरी आवृत्ति) पुढें इ. स. १९३१ त 'पेशवे आणि दाभाडे' हा पेशवे दप्तराचा १२ वा खंड प्रसिद्ध झाला व पेशवे दप्तराच्या इतर अनेक खंडांतील पत्रांतूनही खंडेराव दाभाडे व त्याचे वंशज यांचे प्रसंगोपात्त उल्लेख आलेले आहेत. आणि इ. स. १९५१ सालीं शंकरराव जोशी यांनीं 'सेनापति दाभाडे दप्तर,' भाग १ ला, भा. इ. सं. मंडळ त्रैमासिकाचें वर्ष ३१ अंक २–३ या जोड अंकांत प्रसिद्ध केला. ज्या अनेक कागदपत्रांतून या दप्तरासाठीं त्यांनीं साहित्य निवडलें त्या कागदपत्रांचीं कितीतरी पोतीं तळेगाव दाभाडे येथून ज्यांनीं भरून आणलीं त्यांत माझे मित्र प्रा. ग. ह. खरे, श्री. गो. नी. दांडेकर व मी असे कांहींजण होतों. या साधनसाहित्याखेरीज आणखी मा. वि. गुजर यांचीं करवीर घराण्याच्या इतिहासाचीं साधनें भाग १ व २; डॉ. पवार यांचीं, ताराबाईकालीन कागदपत्रें : खंड १ ला, राजवाडे खंड ३ रा व ८ वा, शाहू रोजनिशी भाग १ ला, व गतवर्षी (इ. स. १९७०) प्रसिद्ध झालेलें श्री. स. मा. गर्गे-सपादित 'करवीर रियासतीचीं कागदपत्रें,' अशा अनेक साधन-ग्रंथांतून खंडेराव दाभाडे व त्याचे वंशज यांचे उल्लेख आलेले आहेत. वीस वर्षांपूर्वी तळेगावहून आणलेले कागद अद्याप तसेच पडलेले आहेत. पण उपलब्ध प्रसिद्ध साधनें संकलित करून त्याच्या आधारे 'सेनापति दाभाडे घराणे : एक अभ्यास' असा विषय तयार करून आज तो आपणांपुढे सादर करीत आहें.

२. शिवकालीन दाभाडे

दाभाडे घराण्यासंबंधीं सर्वांत जुना कागद (त्रै. ३१।१) इ. स. १५१० चा म्हणून आहे. हा कागद नकल व त्याचा सनही संशयित असला तरी त्यांतील मुद्दा महत्त्वाचा आहे, असें शंकररावांनी म्हटलें आहे. मुधाजी देशमुख यांनीं एका वाटमारी करणाऱ्यास धरून देवगिरीस नेलें असतां त्यानें आपण सिसोदे देशमुखांचे चाकर आहोंत असें सांगितलें, त्यावरून मुधाजी देशमुखांनीं कसबे ओझरच्या दाभाडे यास सिसोदे देशमुख समजून पत्र लिहिले. त्यास उत्तर म्हणन लिहिलेल्या पत्रांत दाभाडे लिहितात, 'साहेब मेहेरबान अपन सिसोदे नहो, बरोडे दाभाडे अहो, मांगाही (मागानी) आपलें नांव घेतलें असेल ते तुफान, ते आपले चाकर नाहीत.' यावरून दाभाडे मूळचे ओझर (जि. नाशिक) चे कीं काय हा एक प्रश्न उत्पन्न होतो (दाभाडयांचा ओझरशी खरोखर संबंध असावा. कारण त्रै. वर्ष ३१। ६२ या इ. सं. १७२३ च्या लेखांत ओझरचा कुळकर्णी सेनापति खंडेरावकडे एक तक्रार करीत आहे.) व दाभाडे व शिसोदे देशमुख यांचें हें वेगळेपण स्पष्ट होतें.

दाभाडे यांच्या मूळ पुरुषाची हकीकत, काव्येतिहास संग्रह, रा. खं. ३, त्रैमासिक वर्ष ३१, अशी एकूण तीन ठिकाणीं आली आहे तींत विरोध नाहीं. मूळ पुरुष बाज पाटील दाभाडे मोकदम मौजे तळेगाव, ता. चाकण, प्रा. जुन्नर सुभे खुजस्तेबुनियाद (औरंगाबाद) असें सर्वत्र आहे. त्यावरून बाज पाटलाचे पूर्वज मूळ कोठूनही येवोत–तो तळेगांवी स्थिर झाला तेथपासूनचें स्मरण ही माहिती देणारास आहे हें लक्षांत येतें. आणि छत्रपति घराण्याकडून तळेगांवीं कांहीं इनाम मिळण्यापूर्वीपासून दाभाडे हे तळेगावचे होते हें लक्षांत येतें. मंडळ त्रैमासिक वर्ष ३१ च्या दाभाडे अंकांत ले. ५ इ. स. १३ डिसेंबर १६९१ चा आहे त्यांत '××× बिन बाजी पाटील मौजे तळेगांव यांणीं हुजूर येऊन विदित केलें जे मौजे मजकूरची पाटिलगीची मिरास पूर्वीपासून चालत आहे. आपले वाडवडील चालवीत आले आहेती' असें म्हटलें आहे. त्यांत नावाच्या जागी फुल्या आहेत तेथे 'येसाजी' असाच शब्द असावा असें संबंध पत्राचा संदर्भ लक्षांत घेतां ध्यानात येतें. येसाजी हे शिवछत्रपतींचे समकालीन. त्यांच्या वाडवडिलांपासूनची हकीगत तो सांगत आहे.

बजाजीस पुत्र दोन : (१) येस पाटील व (२) सोमाजी पाटील. सोमाजीची शाखा वेगळी होऊन चऱ्होलीस स्थिर झाली. या शाखेची वंशावळ पे. द. ४४ मध्यें आहे. येस पाटील हे छत्रपति शिवाजीचे पदरीं हुजरे होते असें का. सं. बखरींत आहे. व येस पाटील हे मोकदमी करीत होते असें रा. खं. ३ मध्यें मोघम लिहिलें आहे. याचा अर्थ येसजी हे प्रथमपासून मोकदम असून नंतर केव्हांतरी त्यांनीं हुजरेपण पतकरलें असावें. साने नं. ३ च्या तळटीपेंत लिहितात, 'शिवाजी महाराजांच्या सरदारांच्या यादींत खंडेराव दाभाडे याचें नांव आहे. तेव्हां तीर्थरूप हुजरे व चिरंजीव सरदारीचें काम करीत होते असें दिसतें.' मी सभासद बखर व ९१

कलमी बखर या दोन्ही ठिकाणच्या शिवकालीन सरदारांच्या याद्या तपासल्या त्यांत खंडेरावाचें नांव नाहीं. तेव्हां साने यांना कोणती यादी उपलब्ध झाली हें कळत नाहीं.

३. दाभाडे–संभाजी काल

मला उपलब्ध झालेल्या इ. स. १७३१ पर्यंतच्या १२५ उल्लेखांत शिवाजी-नंतरच्या संभाजीच्या काळांतील दाभाडे घराण्यांतील पुरुषांचे उल्लेख क्वचितच सांपडतात. एक उल्लेख असा कीं, 'शिवाजीच्या मृत्यूनंतर संभाजीने येसाजी दाभाडे यास रायगडावर राजारामाचे तैनातीस ठेविलें होतें. (रियासत मध्य-विभाग भाग १, १७०७ ते १७४०, पृ. २३८)...काव्येतिहास संग्रहांत 'संभाजीं महाराजांस पट्टाभिषेक जहाला त्यांची सेवा येस पाटील दाभाडे व त्याचे पुत्र खंडोजी दाभाडे व शिवाजी दाभाडे करीत होते.' (पृ. १) असें आहे. पुढें असेंही म्हटलें आहे कीं, (संभाजी महाराजांनीं मोगलांशीं) लढाई सुरू होण्यापूर्वी श्रीमंत राजाराम महाराज यांचेबरोबर येस पाटील दाभाडे व खंडोजी दाभाडे व (खंडोजीचा भाऊ) शिवाजी दाभाडे देऊन किल्ले पन्हाळे वगैरे येथील बंदोबस्तास पाठविले होते.' नंतर संभाजीविरुद्ध रायगडावर जीं कटकारस्थानें झालीं त्यांत राजाराम कैद झाला. तेव्हां रियासतकार म्हणतात त्याप्रमाणें रायगडावर येसाजीस राजारामाच्या तैनातीस ठेवलें असलें पाहिजे. असो. तिसरा उल्लेख डॉ. सौ. गोखले यांच्या संभाजी चरित्रांत पृ. २७३ वर आहे. 'फेब्रुवारी महिन्यांत संभाजीचा सरदार खंडोजी याने आपल्या लोकांसह सरसगावला (अहमदनगर जिल्हा) वेढा दिला.' हें विधान बिकानेर अखबार ता. १०–२–१६८५ च्या आधारें त्यांनीं केलें. पण हा खंडोजी दाभाडेच असेल कीं नाहीं याची शंका आहे, तिचें निरसन होत नाहीं. या तीन उल्लेखांखेरीज इ. स. १६८०–८९ या काळांतील दाभाडे यांच्या हालचालीचा उल्लेख मराठी कागदांत अगर बखरींत कोठेच सांपडत नाहीं वास्तविक संभाजीकालीन अनेक युद्धप्रसंग लक्षांत घेतां व खंडोजी शिवकालीं सरदार होता हें खरें असलें तर त्याचे अधिक उल्लेख सापडावयास हवे होते. कदाचित संभाजीने येसाजीबरोबर खंडोजीसह बंदिवान राजारामाच्या तैनातीत ठेवलें असेल म्हणून तो या काळच्या लढायांत कोठें चमकला नसेल.

४. दाभाडे–राजाराम काल

संभाजीच्या वधाचे काळीं रायगडला मोगलांचा वेढा पडला असतां पुढें कोणतें धोरण आखावें यासंबंधीं येसूबाईनें ज्या निवडक मराठे सरदारांशीं विचारविनिमयतें केला त्यांत खंडेराव होता (डफ पृ. २७८, एडवर्डस सं. प्रत) व जिंजीच्या प्रवासांत राजारामाची सोबत त्यानें केली हें प्रसिद्धच आहे. (डफ २८१) १ एप्रिल १६९१ च्या राजारामाच्या अभयपत्रांत 'तुम्ही स्वामीचे पायास एकनिष्ठपणे सेवा बहुतच केली. स्वामी रायगड प्रांतीहून कर्नाटक प्रांतास आले त्या समई तुम्ही

बरोबरी आलेत ...... या करिता स्वामी तुम्हावरी कृपालु होऊन मौजे मजकुरी इनाम ......' अमुक अमुक (त्रै. ३१ ले. ४) या पत्रांत कर्नाटक प्रांतांत 'आले' असा शब्द आहे. 'गेले' असा नाहीं. यावरून हें अभयपत्र जिंजीहूनच दिलें असलें पाहिजे असा शंकरराव जोशी तर्क करतात (त्रै. ३१ पृ. ३–४) तो सुसंगत वाटतो. ताराबाईकालीन कागदपत्रें, खंड १ ला, ले. क्रमांक ६२ पृ. ९५ वर 'राजारामसाहेब राज्यास निघालेवर मोंगलाच्या भयामुळें रामचंद्रपंत यांचे आव्यान (आधीन) सारे किल्ले करून त्याजपाशी खंडोजी दाभाडे हुजरे ठेऊन मग आपण राजारामसाहेब चंदीस निघोन गेले.' असें जें विधान आहे तें तर साफ चुकीचें आहे. खंडोजी हा सरदार होता. हुजऱ्या नव्हता. रायगडावर इ. स. १६८९ त येसूबाईंनी ज्यांचा सल्ला घेतला त्यांत तो होता. हुजऱ्याचा सल्ला घेतला जाणें असंभवनीय आहे. मीं या विषयावर मंडळाच्या एका पाक्षिक सभेंत टिपण वाचलें असतां हुजरे ही मोडी वाचनाची चूक असावी व त्याऐवजी 'हजीर' असें मुळांत असेल असें सुचविण्यांत आलें. पण 'खंडेरावास हजीर ठेवून' हेंही चूकच आहे. कारण खंडेराव रामचंद्रपंतांजवळ पन्हाळयास न राहतां जिंजीस गेला हें अन्य पुराव्यानें सिद्ध झालें आहे. एकूण हा सबंध लेखच अविश्वसनीय वाटतो. असो. २६ सप्टेंबर १६८९ त राजारामानें पन्हाळा सोडला. (पन्हाळयापासून जिंजीपर्यंतचा राजारामाचा प्रवास कसा झाला याचें दानाध्यक्ष केशव पंडितकृत 'राजारामचरितम्' या पुस्तकांत वर्णन असून तें श्री. बेंद्रे यांनी चाळीस वर्षांपूर्वी संपादित केलें. या समकालीन पंडितानें केलेल्या वर्णनांतील अनेक त्रुटी व चुका, मुंबईच्या कीर्ति कॉलेजचे प्रा. पी. एस्. जोशी यांनीं डॉ. एस्. पी. सेन संपादित क्वॉर्टर्ली रिव्हयू ऑफ् हिस्टॉरिकल स्टडीज, व्हॉ. १० अंक २ रा या १९७०–७१ च्या अंकांत साधार दाखविल्या आहेत. परंतु त्याचा आपल्या विषयाशी संबंध नसल्यामुळें त्याची येथें चर्चा नको.) जिंजीच्या प्रवासांत राजारामास मोगलांकडून पकडलें जाण्याचें संकट आलें त्यावेळी राजारामाच्या बरोबरच्या मंडळींनीं आपले दोन भाग केले. एक भाग राजारामाबरोबर एका रस्त्याने गेला व दुसरा दुसऱ्या मार्गानें गेला. खंडोजी या दुसऱ्या भागांत होता. (डफ २८२). राजाराम ता. २-११-१६८९ रोजीं जिंजीस पोहोंचला. त्याच वेळीं खंडोजी वगैरे मंडळीही तेथें पोहोंचली. खंडोजीचा बाप येसजी व भाऊ शिवाजी हे कबिलेसुद्धां कर्नाटक प्रांतीं गेले असें बखरींत सांगितलें आहे. याचा अर्थ राजाराम जसा आपल्या राण्यांसह गेला तसा येसाजीही आपल्या कबिल्यासह गेला. असें म्हणण्याचें कारण पुढें इ. स. १६९७ सालीं झुल्फिकारखानानें जिंजीस वेढा घातला असतां राजाराम त्या वेढयांतून खंडोजी व त्याचा भाऊ शिवाजी यांचेसह निघाला. (भीमसेन सक्सेना, पगडीकृत हिंदवी स्वराज्य आणि मोगल पृ. १७८ उद्धृत) महाराजांचे कबिल्याबरोबर येसाजी मागें राहिला. त्यानंतरच्या गडबडींत येसाजीनें राजारामाच्या बायकांस वेष बदलून बाहेर काढलें. पण 'दाभाडे

यांचे कबिले निघो न पावले सबब तेथेंच मारून टाकले ' असें बखरींत म्हटलें आहे. हीं बखरींतील विधानें प्रत्यंतर पुराव्यानें पारखून घेण्यास मला कांहीं साधन उपलब्ध झालें नाहीं. पण जिंजी काबीज झाल्यावर झुल्फिकारखानानें राजारामाचीं सर्व माणसें बाहेर आणविलीं असें भीमसेन म्हणतो (पगडी, पृ. १८७) येथपर्यंत दाभाडे कुटुंब राजारामाबरोबर जिंजीस गेल्याचें सांगितलें. आतां इ. स. १६८९ ते १६९७ या सुमारें ७/८ वर्षांच्या जिंजीतील मुक्कामांत दाभाडे कुटुंबाशीं संबद्ध अशा कांहीं घटनांचा उल्लेख करतों.

५. दाभाडे जिंजी येथें

ताराबाईकालीन कागदपत्र खंड १ मध्यें क्रमांक ३२२ च्या ५-१२-१७१६ च्या निवाडपत्रांत स्वरूपजी यादव व गिरजोजी यादव यांचे मालमत्तेचें विभागणीपत्र आहे. त्यांत अनुषंगानें पूर्वीची हकीकत दिली आहे. त्यांत वेळोवेळीं यादव घराण्यावर छत्रपती कसे खूष असत, परंतु स्वामींनीं दिलेलीं वचनें अनेक कारणांनीं कशीं लांबणीवर पडत. त्यांत कऱ्हाडची देशमुखी गिरजोजी याजकडे दिली जावी म्हणून खंडोजी दाभाडे यानें राजारामाकडे दोनदा शब्द खर्च केला व विनंती केली अशा अर्थाचीं विधानें आहेत. (पृ. ४७४ व ४७७) या माहितीवरून खंडोजी हा जिंजी मुक्कामीं राजारामाजवळ दुसऱ्या कुणासाठीं शब्द टाकण्याइतका वजनदार सरदार होता हें दिसून येतें. ही घटना जिंजीस घडली; पण नेमकी कोणत्या सालीं तें कळत नाहीं. इ. स. १६९६ च्या ता. ९ जूनला राजारामास पुत्र झाला तोच शिवाजी होय. त्या समयीं झालेल्या उत्सवानिमित्त ' स्वामींचें आज्ञापत्र जालें कीं, येसजी बिन बजाजी दाभाडे ' यानें विनंती केल्यावरून ' मौजे मार आपला पाटिलकीचा आहे तो इनाम देविला पाहिजे त्यावरून मनास आणितां यांचें चालवणें अगत्य यास्तव मौजे तलेगांव नजिक इंदोरी हा गांव नूतन इनाम देह १ येक कुलबाब कुलकानू हालीपटी व पेस्तर पटीखेरीज हकदार इनामदार करून इनाम दिल्हा. (त्रै. ३१-७). हें इनाम येसजीच्या नांवाचें आहे; पण, पुढील वर्षीं सौ. वाल्हाई आऊ हे खंडोजी दाभाडे यांची मातुश्री, यांचें चालवणें स्वामीस अगत्य, यास्तव.. .. यास नूतन इनाम मौजे धामणे सा हवेली प्रा मजकूर देह १ ...... इनाम दिधला (त्रै. ३१-८). या ठिकाणीं सौ. वाल्हाईस येसजीची पत्नी म्हणून इनाम मिळालेलें नसून, तें खंडेरावाची आई म्हणून मिळालेलें आहे. या घटनेकडे शंकरराव जोशी यांनीं प्रस्तावनेंत लक्ष वेधलें आहे तें खंडेरावाच्या दरबारांतील स्थानाचें निदर्शक या दृष्टीनें योग्यच आहे. या दोन्ही इनामांचा उल्लेख का. सं. बखरींत आहे. दाभाडे दफ्तरांतील अस्सल पत्रांची त्यास पुष्टी मिळाली. याच वर्षीं (इ. स. १६९७) खंडेरावास वाईची पाटिलकी मुसलमान पाटलाकडून काढून देवविली. कारण ' ते पाटील गनिमास मिलोन उपद्रव करताती ' (त्रै. ३१-९) असें म्हटलें आहे. इ. स. १६९८ सालीं खंडेराबास प्रांत बीड देश येथील राजदेशमुखीचें

वतन व सरदेश कुलकर्णी वतन राजारामानें दिलेल्या सनदेने मिळाल्याचें नमूद आहे. (त्रै. ३१-१०) (थोडा फरक धनुर्धारी : मराठे सरदार असे सेनापति दाभाडे, पृ. ११ पहा. पण हा फरक दुर्लक्षिण्याजोगा आहे. त्रै. ३१-१०, सर्व पत्र वाचलें म्हणजे कळतें.) या पत्रांत 'स्वामी कर्नाटकांतून देशास आले' असे शब्द आहेत. यावरून राजाराम इ. स. १६९८ त महाराष्ट्रांत आला हें लक्षांत येतें. असो.

खंडेरावास अशीं वेळोवेळीं अनेक इनामें व वतनें मिळाल्याचे उल्लेख दाभाडे दप्तरांत व इतरत्र आहेत. खंडेरावास एकूण १३९५ गावांची सरपाटिलकी मिळाली होती. याखेरीज नुसते पाटील, देशमुख, राजदेशमुख, सरदेशमुख, सरदेशकुलकर्णी, अठरा कारखान्यांचे हवालदार, इनामदार, मोकासदार, सेनाखासखेल असे त्याचे अनेक हुद्दे आहेत व पुढें तो सेनापति झाला. सेनापति असा त्याचा उल्लेख एका विहिरीवरील इ. स. १७२४ फेब्रु. २८ च्या लेखांत ओवीबद्ध आहे. (त्रै. ३१-५०) ती ओवी अशी – 'जेष्ठी जन्मला खंडेराव। रूढ सेनापती नांव। शांभवपूर्ण वैभव। असे जयाकारणें,।' 'रूढ सेनापती नांव' या शब्दावरून सेनापति म्हटला कीं तो खंडेराव दाभाडेच होय. असें त्याकाळीं समाजाकडून गृहीत धरलें जाई हें स्पष्ट होतें. ही विहीर कोठली तें स्पष्ट नाहीं. जर तळेगावची असेल तर तिचा शोध घेतला पाहिजे. असो. खंडेरावास मिळालेल्या वतन–इनामांचा उल्लेख येथें विस्तारभयास्तव करीत नाहीं. ज्या इनामपत्रांतून त्याच्या चरित्रांतील कांहीं घटनांची माहिती मिळते तेवढ्यांचाच उल्लेख करून पुढें जाणें मला इष्ट वाटतें.

६. जिंजीहून परत

इ. स. १६९७ चे अखेरीअखेरीस राजाराम जिंजीहून बाहेर पडला. तो वेलोरला आला व तेथून डिसेंबरांत विशाळगडला पोहोंचला. (डफ २९३) त्याची बायकामुलें निराळ्या मार्गानें त्यास येऊन मिळालीं. वाटेंत राजारामावर अनेक संकटें आलीं. राजारामाबरोबर खंडोजी दाभाडे व शिवाजी दाभाडे हे होते. 'त्यांणी महाराजांस पाठीशी बांधून पंचवीस कोस आले. पुढें कूच करून चालले असतां शिवाजी दाभाडे यास रक्ताची गुळणी येऊन तो मृत्यू पावला.' नंतर 'महाराज यांणी (व) खंडेराव दाभाडे यांणी ओढ्याची नळी पाहून त्यांत घालून वर माती लोटली.' (का. सं. बखर, पृ. ३) पुढें महाराज पन्हाळ्यास आले. मागून महाराजांचे कबिले आले. पन्हाळ्यास येसाजी मृत्यू पावले. खंडेराव दाभाडे याची सेवा पाहून महाराजांनीं त्यास जुन्नर वगैरे ठिकाणच्या सरपाटिलकीचीं इनामें देवविलीं, सेना खासखेलीचें पद दिलें व हुजरात तैनातीस देऊन सेवा घेत होते. या का. सं. बखरींतील उल्लेखांपैकीं जुन्नर प्रांतांतील सरपाटिलकीच्या सनदेचा उल्लेख कृ. वा. पुरंदरे यांनीं त्रै. वर्ष ८ अं. ३ मध्यें केला आहे. त्यावरून ही घटना १६९८ सालीं घडली. इ. स. १७०१ मध्यें ही सनद राजारामपुत्र शिवाजी छत्रपती यानें पुनः करून दिली. (त्रै. ३१ ले. ११) इ. स. १६९९ (ता. ९ नोव्हेंबर) चें राजा-

रामाचें एक आज्ञापत्र पे. द. ३१ क्र. ५७ मध्यें कोकण जमाव रुमाल नं. ५५१ चें उपलब्ध आहे. त्यांत 'सावोत्रा हक्क राजश्री खंडेराव दाभाडे याचे जमावाचे बेगमीस दिला होता. तो दूर करून राजश्री शंकराजी पंडित सचिव याचे पुत्र रा. जनार्दन शंकर यासी वतन करून दिलें आहे असें म्हटलें आहे. हे सावोत्रा हक्क बहुधा कोकणांतील मुलुखाचे असावे. कारण खंडेराव लवकरच राजारामासमागमें स्वारीवर गेला व त्याची बागलाणांत नेमणूक झाली असा संदर्भ सांपडतो. 'इ. स. १६९९ च्या दसऱ्यास राजारामानें स्वारीचें प्रस्थान ठेविलें. नेमाजी शिंदे, खंडेराव दाभाडे, परसोजी भोसले......वगैरे पुढें प्रसिद्धीस आलेले सरदार त्यास येऊन मिळाले......त्याने सुरतेकडे रोख धरला. पुढे गंगथडींतून चौथाई वसूल करून खानदेश वऱ्हाडांत ते शिरणार होते. पण मोगलांनीं तिकडून त्यास परत फिरविलें. तथापि मराठे सरदार चहूंकडे फाकले गेले होते.' (स्थिरबुद्धि राजाराम पृ. ८९) त्यांत नेमाजी शिंदे खानदेशांत, परसोजी भोसले वऱ्हाडांत, खंडेराव दाभाडे बागलाणांत व हैबतराव निंबाळकर गंगथडींत राहिले, किंवा तेथें त्यांची नेमणूक झाली. (डफ २८७).

इ. स. १७०० त राजाराम मृत्यू पावल्यावर त्याचे पुत्र शिवाजी व संभाजी लहान होते. तेव्हां रामचंद्रपंतानें सर्व सेनाप्रमुखांस पत्रें पाठवून त्यांत राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वांनीं मिळून पार पाडली पाहिजे असें म्हटलें होतें. या सेनाप्रमुखांच्या यादींत खंडेरावाचें नांव आहे. या पत्रास सेनाप्रमुखांनी पाठविलेल्या उत्तरांत 'महाराजांचे ठिकाणी आपण आहांत. खासा स्वारी असतांना कामकाज उदईक करूं म्हणत होतों. सांप्रत उद्यांचे आज करून आपणांस बिनंती लिहीत जाऊं. आपल्या हुकुमासरशी तृणवत् प्राण मानून उडी घेत जाऊं. कांहीं काळजी करू नये' असें म्हटलें आहे. (चिटणीस बखर पृ. १२०, करवीर रियासत सं. गर्गे यांत उद्धृत, पृ. ४६) व या योजनेची व्यवस्था तांबडतोब झालेली दिसते. कारण इ. स. १७०१ सालीं खंडेरावास जुन्नर भागांतील सरपाटिलकीच्या हक्काची पूर्वी दिलेली सनद पुनः शिवाजीनें करून दिल्याचें वर सांगितलेंच आहे.

७. दुसरा शिवाजी काल

राजाराम ता. २–३–१७०० रोजी सिंहगडावर मृत्यू पावला. तेथपासून ते ता. १२–१–१७०८ रोजीं साताऱ्यास शाहूस राज्याभिषेक होईपर्यंतच्या काळांत राजारामपुत्र शिवाजी हा छत्रपति होता. पुढेंही तो कांहीं वर्षें कोल्हापुरास छत्रपती म्हणून होता. वरील आठ वर्षांच्या काळांत ज्या मराठे सरदारांनीं मोगलांस हैराण करून सोडलें त्यांत खंडेराव होता. १७०७ पासून ताराबाई व शाहू यांचें यादवी युद्ध सुरू झालें. हें यादवी युद्ध सुरु होण्यापूर्वींच्या काळांतील एकूण पाच उल्लेख शंकरराव जोशी संपादित दाभाडे दफ्तरांत आपणांस पहावयास मिळतात. (लेखांक १२ ते १६) पण ते सर्व खंडेरावास मिळालेल्या वतन इनामीसंबधीं आहेत. (त्यांत

१७०२–७ या पांच वर्षांतील एकही उल्लेख नाहीं. इ. स. १७०७ च्या जाने. ९ चा लेख शंकराजी पंडित सचिवाचें अभयपत्र आहे. खंडेरावानें कसबे पौडची निम्मी मोकदमी व कसबे मोदडे येथील सारी मोकदमी ढमाले देशमुखांकडून खुष खरेदी करून घेतली. ते सर्व कागदपत्र शंकराजीने सरकारीरीत्या तपासून व्यवहार बरोबर झाला असल्याची खात्री करून खेऊन खंडेरावास अभयपत्र दिलें आहे.

८. यादवी युद्ध व खंडेराव

शाहू भोंपाळनजिक दोरह गांवीं ८ मे १७०७ रोजीं मोगलांच्या छावणींतून निघून आपला राज्यावरील हक्क बजावण्यासाठीं दक्षिणेकडे निघाला. ताराबाईनें त्यास विरोध करण्याचें ठरविलें होतें. तिनें सेनापति धनाजी जाधवाच्या हाताखालीं त्याच्याविरुद्ध जें सैन्य पाठविलें त्यांत खंडेराव दाभाडे होता. उभय पक्षांचीं सैन्यें खेड येथें भीमेच्या उत्तर तीरावर समोरासमोर आलीं. लढाईचे आधले दिवशीं धनाजी जाधवानें शाहूस तटस्थ राहण्याचें वचन दिलें.* १२ ऑक्टोबर १७०७ रोजीं झालेल्या लढाईंत परशुराम त्र्यंबक, खंडेराव दाभाडे वगैरे सरदार ताराबाईचे बाजूने कसोशीनें लढले; पण शाहूस जय मिळाला. खंडेरावास शाहूच्या फौजेनें पकडून नेलें. (गर्गे : करवीर रियासत, पृ. ६७) पण शाहूनें त्यास दुखविलें नाहीं. शाहूविषयीं मराठे सरदारांचें मन अधिकाधिक अनुकूल आहे हें खंडेरावाच्या लक्षांत आलें असें दिसतें. शाहू व ताराबाई यांच्यांत कांहीं समेट व्हावा असें त्यास वाटलें. शाहूस राज्याभिषेक झाल्यानंतर चारच दिवसांनीं १६–१–१७०८ रोजीं शाहूनें ताराबाईकडे मध्यस्थीसाठीं जे सरदार पाठविले त्यांत खंडेराव होता. वारणानदीचे दक्षिणेकडील मुलूख शिवाजीकडे राहूं देऊन ताराबाईनें शाहूचे छत्रपतिपदास मान्यता द्यावी. अशी समेटाची अट होती. पण ताराबाईनें ती मानली नाहीं व यादवी पुढें चालू राहिली. खंडेरावाचें मन आतां द्विधा होऊं लागलें. राजाराम, ताराबाई–शिवाजी यांचेबरोबर स्वामिनिष्ठेनें दिवस काढलेला खंडेराव उद्विग्न झाला व तो बागलाणांत आपल्या कक्षेंतील मुलुखाचो व्यवस्था पाहण्यास गेला. खंडेरावाची ही वृत्ति धनाजी जाधवाच्या लक्षांत आली असावी. कारण गदाधर प्रल्हाद प्रतिनिधीस ता. १० मे १७०८ नंतर लवकरच केव्हांतरी लिहिलेल्या पत्रांत तो लिहितो, 'आम्ही स्वामीची आज्ञा घेऊन आलों ते मजल दर मजल खानदेश प्रांतें गेलों. राजश्री रायजी प्रभू यास थोरात दाभाडे याजकडे पाठविलें. कित्येक साधक बाधक विचार सांगोन पाठविले...त्या उप्पर कसबे पिंपळनेर प्रा बागलाण या मोकामास गेलो. थोरात दाभाडेहि त्या मुकामास आले. आक्षत्रितीयेस भेटी झाली. सारांष सर्व अन्याय क्षमा करावे दाभाडियाचा सरंजाम पूर्ववत करून द्यावा.

* आधार : सनदापत्रें, पृ. २१९ सरदेसाई, बाळाजी विश्वनाथ चरित्र, पृ. ४० टीप. चिटणीस सनदेंतील वाक्य 'स्वामीस गुप्तरूपें भेटून सेनापती सरदार यांच्या खातरजमा करून सर्वांस स्वामींचे लक्षीं आणलें.

राजश्री स्वामीपासून बहुमान गौरवास अंतर न करावें ऐसे मुद्दे घातले ते सर्वही मान्य करून...इ. (त्रै. व. ७ पृ. ८४) एकंदरींत शाहूचें आसन दृढ झालें असें वाटून खंडेरावानें ताराबाईचा नाद सोडून तो शाहूशीं एकनिष्ठ राहूं लागला. अस्सल पत्रांच्या आधारें वर दिलेली हकीकत पहातां का. सं. बखरींतील शाहू तोतया नसल्याबद्दल खंडेरावानें गोदातीरीं जाऊन खात्री करून घेतली व त्यानें शाहूस विश्वासाने पन्हाळ्यास ताराबाईकडे आणलें. 'श्रीमंत आईसाहेब व श्रीमंत महाराज एक पात्रांत बसून भोजन केलें' वगैरे मनोरंजक हकीकत काल्पनिक मानावी लागेल. बखरकार खेडच्या लढाईचा मुळीं उल्लेखच करीत नाहींत. खंडेरावास वेळोवेळीं वतनें इनामें कोणकोणतीं मिळालीं हें सांगण्यावर मात्र त्यांचा विशेष भर आहे. असो.

शाहूस लिहिलेल्या एका पत्रांत (पे. द. १२-जून १७०८ पूर्वी धनाजी जाधवाने खंडेराऊ दाभाडे (१) 'खंडेराव दाभाडे यास जमिनीविसी आज्ञा केली त्यावरून बिरादरीदेखील हातीं घेतले' म्हणजे खंडेराव आपल्या भाऊबंदासह आपणास येऊन मिळाला असें म्हटलें आहे. यावरून खंडेराव धनाजीच्या सैन्यांत येऊन शाहूस मिळाला हें स्पष्ट होतें. जूनमध्यें धनाजी जाधव मृत्यू पावला. तो खानदेशहून दक्षिणेस सातार्‍यास छत्रपतीच्या भेटीस येत होता. परंतु उभयतांची भेट झाली नाहीं. धनाजीच्या मृत्यूनंतर सेनाकर्ते बाळाजी विश्वनाथ यांस सैन्याच्या जमावासाठीं पैका हवा होता, तेव्हां २४-१२-१७०८ च्या एका आज्ञापत्रांत शाहूने खंडरावाकडे असलेल्या एका परगण्याचा (या परगण्याचें नांव कागदपत्रांत नाहीं) निम्मा मोकासा त्याजकडून काढून बाळाजीकडे देण्याविषयीं परगण्याच्या देशमुख देशपांड्यांस आज्ञा केली आहे. (पे. द. ३०-२). या पत्रावरून वाटतें कीं शाहूचा ओढा खंडेरावापेक्षा बाळाजीकडे अधिक होता. मराठेशाहींतील जुन्या सरदारांपेक्षा नवे आपल्या विश्वासाचे सरदार निर्माण करावेत असेंहि त्याचें धोरण असण्याचा संभव आहे. याखेरीज दाभाडे दप्तरांत १७०८, ९ व १० या वर्षांतील शाहूचीं दाभाडे यास दिलेल्या इनामासंबंधीचीं पत्रें आहेत. (त्रै. ३१-१७, १८, १९, २०) परंतु यापेक्षां पे. द. ३०-७ हें पत्र महत्त्वाचें आहे. त्यांत खंडेराव शाहूस लिहितो कीं (ता. २७-२-१७१०) 'होनाजी अनंत (न्यायाधीश) यास बारा हजारी सागितली. जमाना (जामिनकी) विषीं अज्ञा केली तरी आपण हजीर जमान असो.' याचा अर्थ सैन्यांत बारा हजार शिपायांवर होनाजी हा अधिकारी नेमला. तेव्हां त्यास खंडेराव जामीन राहिला. तेव्हा एवढ्या अधिकार्‍याची जामिनकी सांभाळण्या-इतका तो महत्त्वास पोहोंचला होता याचा पुरावा मिळतो.

धनाजी जाधवाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा चंद्रसेन हा त्याच्या जागीं आला; पण तो पुढें प्रसंगानें ताराबाईस मिळाला. शाहूनें प्रथम चंद्रसेनाशीं मिळतें घेण्याचें धोरण ठेवलें होतें तेव्हां चंद्रसेनानें शाहूस पत्र लिहिलें कीं, परशुरामपंत प्रतिनिधी

व खंडेराव दाभाडे यास आपल्या समाधानार्थ (वाटाघाटीस) पाठवावें. त्याप्रमाणें उभयतां गेले. त्यांच्या भेटींत शाहूशीं समेटाचें बोलणें एकीकडे राहून चंद्रसेनानें उभयतां सरदारांचें मन ताराबाईकडे वळविलें. त्यांत परशुरामपंताचें मन वळल्याचें दिसतें. कारण शाहूनें पुढें त्याबद्दल त्याचें वतन जप्त केलें. (शाहू रोजनिशी कलम १२०) खंडेरावाचें मन आपण ताराबाईकडे वळविल्याचें वृत्त ता. १३ ऑगस्ट १७११ च्या एका पत्रांत चंद्रसेन ताराबाईस लिहितो तेंही खरें असावे. कारण मा. वि. गुजर संपादित करवीर इतिहास साधन भाग २ मधील शाहू दप्तर रुमाल नं. ३० च्या ता. ५–१–१७१२ च्या पत्रांत खंडोजी दाभाडे याणें हरामखोरी केली म्हणऊन त्याजकडून सदरहू वतन (जुन्नरचे) दूर करवून हुजूर ठेऊन मशारनिल्हेचे (बाळकृष्ण पंडित अमात्य याचे) ताबीन केलें असें म्हटलें आहे. शाहू–ताराबाई यांच्या लढ्यांत ज्याचें बळ अधिक होईल असें वाटे तिकडे मराठे सरदारांची त्या काळांत ये–जा होई. पुढें ताराबाईचा पक्ष कमजोर झाल्यावर साहजिकच हा प्रकार थांबला.

याप्रमाणें खंडेराव शाहूशीं एकनिष्ठ असला तरीही त्यास कोल्हापूर-छत्रपती संभाजी याजकडून कोल्हापूर भागांत ता. २ जाने. १७१५ रोजीं वतन मिळाल्याची नोंद आहे. दाभाडे दफ्तर ले. २२ मध्यें म्हटलें आहे कीं, शंभु छत्रपति स्वामी यांणी मुकादमानी ता हवेली कोल्हापूर यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री खंडेराव दाभाडे यासी...ता. हवेली मजकूरचे देशमुखीचें वतन अजरामऱ्हामत करून दिल्हें आहे...देशमुखीच्या मामल्यावरी बाजी दाभाडे यांस ठेविले आहेत...तुम्ही देशमुखीचे वतन खंडेराव दाभाडे यास सुरलीत चालविणे...इ. या आधारावरून वाटतें कीं, कोल्हापूरकर छत्रपतीचा खंडेरावास खूष राखून आपल्याकडे आकर्षित करण्याचा यत्न असावा.

इ. स. १७१२ नंतर खंडोजीनें कधीं शाहूचा पक्ष सोडला नाहीं. शाहूचोही त्याच्यावर मर्जी दिसते. कारण पे. द. ३१-११४ च्या ता. ९–९–१७१४ च्या लेखांत एक चकनामा (हद्दी दर्शविणारा कागद) आहे. त्यांत उल्लख आहे कीं, ' राजश्री स्वामी कृपाळू होऊन ' खंडोजी बिन येसाजा दाभाडयासी राज्याभिशक शके ४७ यामध्ये कसबे मत इनामचावर येक देविला. अवलदूमसीम तीन प्रती चऊ सीमा पडजमीनपैकी मोजून देण म्हणऊन आज्ञापत्र. '

९. खंडेराव सेनापति

इ. स. १७१३ च्या नोव्हेंबरांत बाळाजी विश्वनाथास पेशवाईपदाची प्राप्ती झाली. मोगल-मराठे झगडा चालूच होता. पुण्यानजिकच्या भागांत मोगल प्रबळ झाले व आपला जम बसवूं लागले तेव्हां त्यांचें अन्यत्र लक्ष वेधावें म्हणून बाळाजीनें पुण्याच्या उत्तरेकडील मोहीम अंगावर घेतली. तत्पूर्वी पुण्याच्या बंदोबस्तासाठीं ठिकाठिकाणीं सरदार नेमले (बाळाजी विश्वनाथ रियासत, पृ. १२३) व आपण

स्वतः मराठवाड्याकडे वळला. ते समयीं 'धामधूम बहुत गंगथडीस जाली ते पत्रीं काय म्हणोन लेहावी.' (रा. खं. ८ ले. ७५) 'आतांतरी खंडेराव दाभाडा व रायाजी प्रभु व नरसोजी मोऱ्या व राजजी थोरात ऐसे एकत्र होऊन...येवले प्रांतीं खंडेराव दाभाडे याच्या लेकी दोन व सासू व मेहुणा ऐशीं माणसें सहा अंबोजी देशमुख यांणीं धरिलीं आहेत, तीं सोडवावयास आले आहेत.' (कित्ता) या वर्णनावरून खंडेराव पराक्रम करीत असतां कधीं कधीं किती धोक्यांत सांपडत होता व तत्कालीन मराठे सरदारांचें जीवन कसें साहसमय होतें हें लक्षांत येतें. असो. याच वर्षीच्या एप्रिल महिन्यांत खंडेराव दाभाडे व कान्होजी भोसले यांनीं तीस हजार फौजेनिशीं नर्मदा ओलांडून माळव्यांत प्रवेश केल्याची बातमी (माळव्याचा सुभेदार) सवाई जयसिंग यास आली. उज्जैनजवळचीं गांवें लुटून त्यांनीं देपाळपूरचा विध्वंस केला ही हकीकत रियासतकारांनीं सर जदुनाथकृत अप्रकाशित अशा जयपूरच्या इतिहासावरून घेतलेली दिसते. (सरदेसाई : बाळाजी विश्वनाथ, पृ. १३२).

खंडेरावासारख्या मराठे सरदारांच्या या मोहिमा मोगलांचा अंमल खिळखिळा करण्याच्या उद्देशानें असत. बाळाजी विश्वनाथानें पेशवा झाल्यावर छत्रपति राजारामाचें अनुकरण करून एकेक मराठे सरदारास मोगलांच्या ताब्यांतील एकेका प्रदेशांत जहागीर देऊन तिकडे आपल्या सरदारांच्या पराक्रमास क्षेत्र उत्पन्न करून दिलें. त्याप्रमाणें शाहूच्या हुकुमावरून खंडेराव दाभाड्यास खानदेश देऊन गुजरात काबीज केल्यास तो प्रांतही जहागीर देऊन टाकूं म्हणून आश्वासन दिलें. हाच खंडेरावाच्या गुजरातेंतील कामगिरीचा प्रारंभ होय. बागलाण हा राजारामाच्या वेळेपासून त्याच्याच कक्षेंतील प्रदेश असल्यामुळें खानदेशवर ताबा ठेवण्याचें त्यास कांहीं कठीण वाटलें नाहीं. म्हणून गुजरातेंतून मोगलांचा अंमल उठविण्याच्या उद्देशाने तो सुरतमार्गे गुजरातेंत शिरला. यावेळीं सय्यद बंधूंपैकीं हुसेनअली हा दाऊदखान पन्नास मारून मोगलांचा दक्षिणचा सुभेदार बनला होता. त्यानें झुल्फिकार बेगच्या हाताखालीं फौज पाठवून त्यास सुरत ते बऱ्हाणपूर प्रदेशावर मोगलांचा अंमल स्थिर करण्याची कामगिरी सांगितली. पण या प्रसंगीं दाभाडे व झुल्फिकारबेग यांचा जो सामना झाला त्यांत झुल्फिकारबेगाचा पूर्ण पराभव झाला व तो लढाईंत पडला. (या लढाईचा उल्लेख करणारें एक पत्र ता. १ मार्च १७१६ चें शाहू दप्तर रु. ९ रोजकीर्दमध्यें उपलब्ध आहे. (पेशवे दप्तर अप्रकाशित). त्यावरूनही या संग्रामस्थळाचा बोध होत नाही. यावेळीं शौर्य गाजविणाऱ्या सरदारांस जमिनी इनाम दिल्याचें दुसरें पत्र शाहू दप्तर, सं. २ मध्यें आहे.) अशा एका लढाईनें सोक्षमोक्ष होणार नाहीं हें दाभाड्यास ठाऊक होतें. लवकरच मोगलांनीं मुहक्कमसिंग व चंद्रसेन जाधव यांच्याच आधिपत्याखालीं दुसरें सैन्य पाठविलें. दाभाड्यानें ह्या फौजेस अहमदनगरजवळ गाठलें. येथें खूप जोराची लढाई झाली. (इ. स.

१७१६) डफ लिहितो, या लढाईंत दोघेही आपला विजय झाला असें सांगतात; पण लढाईनंतर मोगल औरंगाबादला गेले व खंडोजी बरेच दिवस शाहूच्या भेटीस गेला नसल्यानें, साताऱ्यास जाऊन छत्रपतीस भेटला. त्याला शाहूनें साताऱ्यास येण्याविषयींचें पत्र पाठविलेलें दिसतें. कारण शाहू दफ्तरातील ता. ३०–१२–१७१६ च्या नोंदींत ' राजपत्रें राजश्री प्रधानपंत व खंडेराव दाभाडे यासी पत्रें देऊन जाब घेऊन येणें ' असें म्हटलें आहे. (गुजर: करवीर घराण्याचीं इतिहासाचीं साधनें भा. २, पृ. ३६) त्याप्रमाणें खंडेराव साताऱ्यास पोहोंचल्यावर ११–१–१७१७ रोजीं शाहूनें त्यास सेनापतिपद दिलें व त्याचा थोरला मुलगा त्र्यंबकराव सेनाखासखेल झाला. (रियासत बाळाजी विश्वनाथ, पृ. ९९). शंकरराव जोशी यांनीं उपलब्ध साधनांच्या आधारें बराच बारकावा काढून इ. स. १७१६ त खंडेराव सेनापति झाला या कालनिर्णयाप्रत ते आले आहेत. (दाभाडे दफ्तर प्रस्तावना, प. ८). परंतु शाहू रोजनिशींत कलम १५६ मध्यें खंडेराव सबाअशर मया व अलफ सफर (ही तारीख ११ किंवा १३ जानेवारी १७१७ असावी. असें प्रा. खरे म्हणतात.) (१७१६–१७१७) त सेनापती झाल्याचें लिहिलें आहे; तेव्हां हा अस्सल आधार हाताशीं असतां इतक्या बारकाव्याची जरूर नव्हती. मात्र हें वर्ष इ.स. १७१६ नसून १७१७ चा प्रारंभच असला पाहिजे असें मला वाटतें. कारण शाहूनें खंडेरावास ३०–१२–१७१६ ला पत्र लिहिल्याचा जो वर उल्लेख आहे त्यावरून तो त्या काळपर्यंत साताऱ्यास पोहोंचला नव्हता हें उघड आहे. पण या माझ्या अनुमानास एका नोंदीचा विरोध येतो. पे. द. ३० पृ. २३७ वर २९–१२–१७१६ ची एक नोंद वर दिलेल्या गुजर संपादित ३०–१२–१६ च्या नोंदीप्रमाणे हुबेहूब आहे. फक्त पे. द. ३० मधील नोंदींत खंडेरावास सेनापति म्हटलें आहे. ही नोंद मुळांतून तपासून पाहिली पाहिजे. कारण याच पे. द. ३० मधील पृ. २३९ वर खंडेरावाकडून शाहूकडे इ. स. १७१७ च्या जानेवारीच्या ता. ६, ७ व ८ तारखेचीं जीं आवक पत्रें आहेत त्यांत कोठेंही खंडेरावास सेनापति म्हटलें नाहीं. पण पुढें पृ. २४० वर खंडेरावास शाहूचें गेलेलें ता. २०–१–१७१७ चें जावक पत्र आहे त्यांत खंडेरावास सेनापति म्हटलें आहे. त्यावरून हें निश्चित आहे कीं, खंडेराव ता. ८ नंतर व ता. २० पूर्वीं जानेवारी १७१७ त सेनापति झाला. रियासतकारांनीं दिलेली ता. १७ जानेवारी ही बरोबर असावी. (खरे यांचें शाहू रोजनिशींतील फारशी तारखेवरून मत–११ किंवा १३ जानेवारी, असें आहे.) शाहू रोजनिशींतील न. १५६ च्या उल्लेखाप्रमाणें ' राजश्री खंडेराव दाभाडे यास पेशजी सेनाखासखेलीचा धंदा होता तो दूर करून हल्ली, राजश्री मानसिंग मोरे यास सेनापति होती ते दूर करून हल्ली यास सेनापती सांगितली. यास वेतनदेखील चाकरसालीना होन पादशाही १०००० ' असें म्हटलें आहे. दाभाडे दफ्तर, ले. २६ (ता. २९–९–१७१७) या मालोजी पवार यास लिहिलेल्या आज्ञापत्रांत शाहू लिहितो, ' खंडेराव

दाभाडे यास पेशजी खासखेलीचा मामला होता त्यावरून स्वामींनी कृपाळू होऊन
सेनापती सांगितली. खासखेलीचा मामला राजश्री त्र्यबकराव दाभाडे यास
सांगितला आहे. तरी तुम्ही त्र्यंबकराव याचे ताबीन राहून स्वामीकार्य करणें.'
सेनाखासखेल यातील खेल शब्दाचा अर्थ 'घोडा' असा आहे व सेनाखासखेल या
शब्दाचा समुचित अर्थ सैन्यांतील घोडदळाची व्यवस्था पाहाणारा असा होतो असें
प्रा. ग. ह. खरे यांनीं सांगितलें. सेनखासखेल या पदाखेरीज खंडेरावास सेना
धुरंधर ही पदवी राजारामानें दिल्याचें 'स्थिरबुद्धि राजाराम' या पुस्तकांत पृ.
४४ वर रियासतकारांनीं सांगितलें आहे; यावरून खंडेराव हा सेनाखासखेल या
पदानें निर्दिष्ट होणाऱ्या दर्जापेक्षां वरच्या दर्जाचा अधिकारी सेनापति होण्यापूर्वींच
होता असेंही अनुमान काढावेंसें वाटतें. कदाचित 'सेनाधुरंधर' हा शब्द नुसता
गौरवार्थीही असूं शकेल. कांहींही असो. खंडेरावास सेनापतिपद १७१७ चे प्रारंभीं
मिळालें हें निश्चित आहे. (तरीही दाभाडे दफ्तरांतील ले. ४३ च्या २४–१–१७२२
च्या व ले. ५७ या इ. स. १७२६ जुलै ७ च्या खुद्द खंडेराव दाभाडे यानें
लिहिलेल्या अशा दोन पत्रांत ता स्वतःस सेनाखासखेल म्हणवितो हें विचित्र आहे.
ले. ५७ चें पत्र नकल आहे; पण ले. ४३ चें नकल नाहीं. तें अस्सल असावें.) हें
पद त्यास त्याच्या गुजरातेंतील कामगिरीवरून मिळालें यांत शंका नाहीं. शाहूस
या काळांत खंडेरावाचें बहुत अगत्य होतें. उदाहरणार्थ, इ. स. १७१७ (जिल्हेज
२६) ता. ची शाहू रोजनिशींत १५८ क्र. ची पुढील नोंद पहा – 'राजश्री सेना-
पति यास पत्र जे आपले पोटांत सांप्रत शूल वेथ जहाली तेणेंकरून बहुत श्रमी
झालों. स्वामीचे पुण्येंकरून कांहीं आरोग्य झालें म्हणून वेथ उताराखालीं पडली.
लिहिलें विदित झालें. याणेंकरून चित्त संतोषातें पावलें. याउपर औषध उपाय
करून वेथा निशैल्य झालियाचें वर्तमान लिहिणें.'

१०. खंडेराव दिल्लीस

पुढील वर्षी म्हणजे इ. स. १७१८ त सय्यद बंधूंपैकी हुसेन सय्यद यानें
दिल्लीच्या राजकारणांत मराठ्यांचें साह्य मागितल्यामुळें बाळाजी विश्वनाथ
मराठ्यांच्या फौजा घेऊन दिल्लीस गेला. शाहूची मातुःश्री येसूबाई इ. स. १७०७
पासून दिल्लीस मोगलांच्या कैदेंत होती. तिची मुक्तता करण्याची आतुरता
मराठ्यांस होती. 'बाळाजी विश्वनाथ व खंडेराव दाभाडे सैन्य घेऊन निघाले'
असें डफ लिहितो (एडवर्ड आवृत्ति पृ. ३३५) यावरून खंडेराव दाभाडे हा
बाळाजी बरोबरचा प्रमुख सरदार होता (दिल्लीस बाळाजी बरोबर गेलेल्यांची
यादी उपलब्ध आहे.–खरे) हें लक्षात येतें. का. सं. बखरींतही बाळाजी विश्वनाथ
व खंडेराव दाभाडे यांस (शाहूनें) मोहीम दिल्लीची सांगितली त्यास उभयता
दिल्लीपर्यंत जाऊन काळकेचा मेळा लुटून अखेर साली माघारे आले ते समयीं
पिलाजी गायकवाड यांनीं खंडेराव दाभाडे सेनापति सेनाखासखेल यांची सेवा

एकनिष्ठेनें केली जाणोन पांच हजार स्वारांचें पथक सांगितलें' (पृ. ८) असें म्हटलें आहे. यावरून खंडोजी बरोबर पिलाजी गायकवाडही दिल्लीस गेला असला पाहिजे असें वाटतें. याच मोहिमेंत मराठ्यांस दक्षिणच्या सहा सुभ्यांची चौथाई सरदेशमुखी व स्वराज्य यासंबंधीं सनदा मिळाल्या. इ. स. १७२० चे प्रारंभीं पंतप्रधान व सेनापती असा पराक्रम करून येसूबाईस घेऊन परत आले. या काळांतील मोगल बादशाह फर्रुखसियर, सय्यद बंधू व मराठे यांचे संबंध, दिल्लींतील घडामोडी व तेथील धामधूम या घटना बऱ्याच महत्त्वाच्या आहेत. परंतु त्यांत खंडेराव दाभाडे यांच्यासंबंधीं कांहीं सांगतां येण्यासारखें नसल्यानें वरील दिल्ली प्रकरण येथें थोडक्यांत सांगितलें आहे.

११. मराठे सरदारांचें परस्परांच्या मुलुखावर आक्रमण

खंडोजीच्या आयुष्यातील हा काळ मोठा भरभराटीचा दिसतो. त्यास अनेक इनामें व वतनें मिळत गेलीं. शाहूकडे आपला अर्ज गुदरावा व शाहूनेंही 'स्वामीनीं यांचें चालविणें अगत्य जाणून' त्याची विनंती मान्य करावी अशा अर्थाचीं अनेक पत्रें दाभाडे दफ्तरांत १७१७ ते १७२० या काळचीं आपणास पहावयास मिळतात. (ले. २७, २९, ३१, ३२, ३३). त्याची पत्नी सौ. उमाबाई हीस कसबे देहेज (प्रा. बागलाण) या गावचें वतन मिळालें. प्रांत त्रिंबकचा मोकासा त्याचा मुलगा सेनाखासखेल त्रिंबकराव यास मिळाला. अशी छत्रपतीची मर्जी संपादिलेला खंडेराव स्वतः दंडेली करतांनाही दिसतो. चांदवडचा देशपांडे लिहितो 'रा। सेनापति त्या प्रांतें आले. त्यांणीं मुलकाचा तसनस केला' ८–४–१७१८. (पे. द. १२–२) हा मुलूख मोगलांचा नसून मराठ्यांच्या कक्षेंतील आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अशीच तक्रार ता. १५–८–१७२० रोजीं कालोजी भोसले हा, छत्रपति शाहूस लिहिलेल्या पत्रांत करतो. तो लिहितो, 'आपण फौज घेऊ येत होतो त्यास दाभाडा (हा दाभाडे खंडेरावच का ?–संदर्भावरून खंडेरावच वाटतो.) बळकाऊनु (बळजबरीनें) येथें आला......... त्याचें आमचें जुज जालें. या उपरी आपण व रा। अमृतराव देशमुख गंगातीरास पाच सा हजार जमाव झाला आहे. दाभाडियास तंबी पोहोचवितो.' (पे. द. १२–४) हें पत्र ऑगस्ट १७२० चें आहे, त्या अर्थीं या वेळीं बाळाजी विश्वनाथ मृत्यू पावला व बाजीरावास पेशवाई मिळालेली होती. क्वचित खंडेरावावरही हा दंडेलीचा डाव उलटलेला आढळतो. इ. स. १७२० (२९ जिलकाद) या तारखेस खंडेराव बाजीराऊ पंडित प्रधान गोसावियासी लिहितो, 'राजश्री देवजी सोमवंसी यांणी राजश्री पंत प्रधानाचीं पत्रें घेऊन वोझरी आमचा गुमास्ता पाटिलकीचा आहे तो उठवून टाकावे म्हणून सावजी आटोलियास लिहिलें. त्याजवरून आटोलियांनीं फौजबंदी करून कसबे मारावर लगट बहुतच आरंभिला म्हणून लिहिलें (पे. द. १२–३). कदाचित ही बाजीरावाची किंवा त्याच्या माणसांची दाभाड्याच्या ताब्यांतील मुलुखावर

झालेली दडेली असेल. एकूण प्रबळ मराठे सरदारांनीं प्रसंगीं एकमेकांच्या मुलुखां-वरही दंडेली करावी असा हा तत्कालीन प्रकार आहे. याबद्दल एकटया खंडेरावास कसा दोष द्यावा ? रियासतकार म्हणतात, अशा पत्रावरून (पे. द. १२-२) ' लक्षांत येतें कीं, मराठे सरदारांच्या भाडणांमुळे रयतेस किती उपद्रव होत असला पाहिजे ! ' असो.

१२. बाळापूरची लढाई

बाळाजी विश्वनाथाबरोबर दिल्लीस जाऊन परत आल्यावर त्यानें शाहूची भेट घेतली. परंतु त्यास स्वस्थता मिळाली नाही. यावेळीं बाळाजी विश्वनाथ मृत्यू (२-४-१७२०) पावला. त्याच्या जागीं बाजीरावाची नेमणूक झाली (१७-४-१७२०) मोगलांचे दरबारीं कलह चालूच होते. सय्यद बंधू हे कारभारी होते. पण, निजाम उलमुल्क हा त्यांचा महत्त्वाकांक्षी प्रतिस्पर्धी होता. त्यास दिल्लीपासून दूर ठेवावें म्हणून त्याची सय्यदांनीं माळव्याचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. तेथून कुणाची परवानगी न घेतां, तो दक्षिणेंत आला व आपलें आसन स्वतंत्रपणें स्थिर करण्याच्या विचारांत होता. तो बादशाही अधिकाऱ्यास न विचारतां दक्षिणेंत गेला हें सय्यद बंधूंस आवडलें नाहीं म्हणून त्यांनीं आपले दक्षिणेंतील प्रतिनिधी दिलावरअलीखान व आलमअलीखान यांस त्याचा बंदोबस्त करण्याविषयीं लिहिलें. सय्यदांस मराठ्यांचें साह्य होतें. पण निजाम उलमुल्क या सर्वांस पुरून उरला. कारण त्यानें दिलावर अलीखानास खांडव्याच्या लढाईंत ठार मारलें (१९-६-१७२०) व आलम अलीखानास वऱ्हाडांत पैन घाटांत बाळापूर येथें ठार मारलें. (१०-८-१७२०) आलम अलीखानाच्या साहयास असलेल्या मराठी सैन्यांत शंकराजी मल्हार, खंडेराव दाभाडे वगैरे सरदार होते. या युद्धांत शंकराजी मल्हार मृत्यु पावला. खंडेरावादि मराठे सरदार सुटले व त्यांनीं मोगली फौजांवर गनिमी हल्ले चालू ठेवले. बाजीराव पेशवा झाल्यावर खंडेरावानें ज्यांत भाग घेतला ती ही पहिली लढाई होय. सय्यद बंधू व निजाम यांच्या राजकारणाशीं आपणास येथें कांहीं कर्तव्य नाहीं.

१३. त्रिंबकराव गुजरातेंत रवाना

या वेळीं दाभाडे घराण्याकडे व्यवस्थेस आणखी दिलेल्या मुलुखाची नोंद पे. द. ३० पृ. ३६९ वर आहे ती पुढीलप्रमाणें :–

७–११–१७१९

छ ५ रोज जाजती सरंजाम साल मजकुरीं महाल

रा खंडेराव सेनापति	रा‍ा त्रिंबकराऊ दाभाडे
१ पा पातुर प्रा वराड	१ पा दवण प्रांत फिरंगाण
१ पा सावलज बारे प्रा वराड	१ पा भामेर प्रांत खानदेश
	१ पा वण प्रा दौलताबाद
	१ कसबे अले प्रा जुनर इनाम
	१ पा वणदिवी प्रा सुरत
२	५

हा सरंजाम फौजेच्या खर्चाकरितां पितापुत्रांस दिलेला आहे. या नोंदीवरून दाभाडे पितापुत्रांवर उत्तरोत्तर खानदेश, गुजरात व वऱ्हाड या भागांची जबाबदारी अधिकाधिक पडत होती व खंडेरावापेक्षां त्याचा मुलगा त्रिंबकराव याच्यावर अधिकाधिक जबाबदारी टाकली जात होती असें दिसतें. का. सं. बखरींतही म्हटलें आहे कीं, ' त्यानंतर (म्हणजे खंडेराव दिल्लीहून परत आल्यावर) खंडेराव दाभाडे सेनापति सेनाखासखेल यांणीं आपले पुत्र त्रिंबकराव दाभाडे याजविशी श्रीमंत शाहू महाराजांस विनंति केली कीं, ' माझें वृद्धपण जाहलें. आतां चिरंजीव रा. त्रिंबकराव दाभाडे यांस सेनाखासखिलीचीं वस्त्रें देऊन गुजराथींत मोहिमेस रवाना करावें. ' याप्रमाणें विनंति करून त्रिंबकराव दाभाडे यास श्रीमंत महाराजांकडून सेनाखासखेलीचीं वस्त्रें देववून बरोबर पिलाजी गायकवाड यास देऊन गुजराथींत रवाना केलें. त्यांणीं बडोद्यापर्यंत (म्हणजे सुरतेपासून बडोद्यापर्यंत) गुजराथींत आपला अंमल बसविला. खंडेराव इ. स. १७१७ त सेनापति झाल्यानंतरची हकीकत सांगतांना खंडेरावाच्या नांवापुढें सेनापति या पदाबरोबर सेनाखासखेल हें पद का. सं. बखरींत एकदांच नव्हे तर दोन ठिकाणीं लावण्यांत आलेलें आहे व आतां त्रिंबकरावास गुजरातेंत पाठवतांना त्यास सेनाखासखेलीचीं वस्त्रें दिलीं असें म्हटलें आहे. तें चूक आहे. कारण खंडेराव सेनापति झाला ते समयींच त्रिंबकराव सेनाखासखेल झाल्याचा अस्सल पुरावा उपलब्ध आहे. (दाभाडे दफ्तर ले. २६).

१४. शाहूचें सख्यत्वाचें धोरण

त्रिंबकरावाची पिलाजी गायकवाडासह गुजरातकडे रवानगी झाल्यावर खंडेराव वृद्धत्वामुळें तळेगांवीं जाऊन राहिला असा कित्येकांचा समज दिसतो तो बरोबर नाहीं. तो दक्षिणेंतच झपाट्यानें बदलत्या परिस्थितीशीं जमवून घेत होता. निजाम आपलें प्रस्थान दक्षिणेंत कसें काय बसतें तें पहात होता. बाजीरावाचें त्याच्याकडे लक्ष होतें. उभयतां एकमेकांचे अंदाज घेत होते. शाहूचें धोरण सर्वांशीं गोडी राखून समेट करून युद्ध टाळावें असें होतें. अशा स्थितींत बाजीराव-निजाम यांची ४ जानेवारी १७२१ रोजीं चिखलठाण चाळीसगांवचे पूर्वेस येथें भेट झाली, औपचारिक समारंभ झाले. पण त्या प्रसंगीं बाजीरावाच्या लक्षांत आलें कीं, निजामास भाग पाडल्याखेरीज तो मराठ्यांच्या मागण्या सुखासुखी मान्य करणार नाहीं. या भेटीच्या प्रसंगीं खंडेराव हा बाजीरावाबरोबर होता. (आधार : चिटणीस कृत शाहूचरित्र, पृ ४२, N. H. M. II., P. 74 note) बाजीरावाचें निजामासंबंधीं असें मत झालें असलें तरी निजामाशीं गोडी राखावी अशी शाहूची वृत्ति होती. शाहू व बाजीराव यांच्या वृत्तींतील या फरकाचा तत्कालीन मराठी राजकारणावर मोठा परिणाम झाला. बाजीराव पंतप्रधान असला तरी तो नोकरच असल्यानें बाजीरावाची कुचंबणूक होत असे. शाहूचें जें निजामाशीं धोरण तेंच पदरच्या चुकार व बंडखोर सरदारांशीं वागण्याचें धोरण असे. अगदीं फारच झालें म्हणजे

शाहू संतापे व निर्वाणीचे हुकूम देई. पण तेव्हां राजकारण हातचें निसटलेलें असे. हा प्रकार इ. स. १७३१ त बाजीराव–त्रिंबकराव यांच्यांत लढाई झाली तेथपर्यंत किंबहुना पुढेंही चालू राहिला. असो. तो पुढील भाग आहे. शाहूनें निजामाशीं गौडी राखण्याच्या धोरणाचा पुरावा म्हणून एक पत्र गुजर संपादित करवीर कागदपत्र भा. २ लेखांक २५ चें आहे. त्यांत शाहू, खंडेराव, फत्तेसिंग भोसले व चिमणाजी पंडित या तिघांस २१–१२–१७२३ त लिहितो, ' खान माार निलेतर्फे राघो अनंत तुम्हाकडे (शाहूकडे) पाठविले आहेत......याचा बहुमान करून......खर्चाची बेगमी करून आपलीं पत्रें देऊन रवानगी करणें खान माा निलेकडील मातबर मनुश्य आलिया सख्यत्वाचा विचार करणें. ' हें मूळ पत्र विजापूरचा कोणी सरदार (निजामाचा स्नेही) यानें शाहूस पाठविलें आहे. पण या सख्यत्वाची बातमी आपल्या सरदारांस कळविण्याची शाहूची आतुरता लक्षांत घेण्यासारखी आहे.

१५. खंडेरावाचा दुय्यम दर्जा

बाजीराव पंतप्रधान व खंडेराव सेनापति असे हुद्दे असले तरी एकमेकांचीं अधिकारक्षेत्रें कधीं विभागून दिलेलीं दिसत नाहींत. या काळांत बाजीराव, फत्तेसिंग भोसले किंवा श्रीपतराव प्रतिनिधी हे जसे शाहूच्या नजरेंत भरत तसा खंडेराव भरतो असें दिसत नाहीं. खंडेरावास हलके हलके दुय्यमपण येत गेलें. शाहू त्यास क्वचित् रागाचीं पत्रें लिहितांना दिसतो. इ. स. १७२३–२४ च्या काळांत पिलाजी गायकवाडास गुजरातेंतून दक्षिणेंत बोलावण्याबद्दल शाहूनें खंडेरावास सांगितलें. शाहूचा विचार यावेळीं दक्षिणची म्हणजे कर्नाटकची मोहीम अंगावर घेण्याचा असावा. या हुकुमाप्रमाणें पिलाजी वेळेवर आला नाहीं तें पाहून शाहू खंडेरावास लिहितो, ' स्वामीच्या पायाची शपथ केली तो (अर्थ) एकीकडे ठेविला हें तुम्हांस उचित नव्हे. तुम्हांकडून आज जी गोष्ट होऊन आली तेव्हां अन्यत्रही असेच वर्तो लागतील ! (शाहू रोजनिशी, पृ. ३).

खंडेरावही आपल्या बाजूनें स्वतःवर होणारा अन्याय शाहूस मोठ्या अजीजीनें कळवीत आहे. पे. द. १२ ले. ५ हें ता. १४–८–१७२४ चें त्यानें शाहूस लिहिलेलें पत्र त्याची मनःस्थिति दर्शवितें. (त्या पत्रावर १८–८–१७२१ अशी तारीख असली तरी तें इ. स. १७२४ चेंच आहे. कारण इ. स. १७१७ त सेनापति झालेला खंडेराव, इ. स. १७२१ सालीं सात-आठ वर्षें कशीं होतील? (दाभाडे दफ्तर प्रस्तावना पृ. ७।८ पहा.) ' महाराजांनीं कृपालु होऊन सेवकास सेनापति हें पद येथास्थित देऊन गौरविलें त्या प्र॥......सेवाहि यथाशक्ति करून दाखविली. पुढें राजश्री फत्तेसिंग भोसले याजवर कृपालु होऊन (खंडेरावाचा) सरंजाम त्यास दिला. उपनाव सेनापति सेवकास दिल्ही. ' पण सेनापतीस कांही सरंजाम असला पाहिजे असें शाहूस वाटून त्यानें खंडेरावास जो सरंजाम दिला तो फत्तेसिंगाच्या मुलुखांत दिला ! खंडेराव लिहितो, ' जें धण्यान दिलें ते लक्षाचे जागा मानून

सात-आठ वर्षे अतिक्रमिळीं. परंतु रुपयास संबंध नाहीं. ऐवज राजश्री फत्तेसिंग आबा याजकडेच गेला.' पुढील काळांत कांहीं महालांचा ऐवज खंडेरावाकडे येऊं लागला. त्याच्या खर्चांत त्यानें दोन हजार फौज स्वामीकार्यावर आणली. एवढ्यांत पुन: शाहूचें आज्ञापत्र आलें कीं, ' निंबाईत खासगीकडे मुकासा ठेवून (सरकारचे) कमाविसदार विठ्ठल रंगनाथ पाठविले त्यास महालीचा अंमल सुरळीत देणें.' यावर खंडेराव लिहितो कीं, या महालीचा पैका प्रथम फत्तेसिंगाकडे गेला व नंतर जे महाल अलीकडे मजकडे आले त्याच्या खर्चांत फौज ठेवली. अशा स्थितींत स्वामीचे आज्ञापत्र पाहून ' चित्तांतही सेवकाच्या उदासीनता आली '.........' सेनापतीचे ठायीं अपराध कोणता आहे हें न कलेसें झालें '......तरी ' कूर्मावलोकन करून सेनापतीचे ठायीं अपराध असेल तो दूर करून निरपराध सेवकास निरपराध पदीं स्थापना करून सेवा घेणार धणी समर्थ आहेत.' या पत्रानंतर शाहूनें खंडेरावाकडे पूर्वीच्या महालांचे सरंजाम दिले असें दिसतें. यानंतरही शाहू खंडेरावावर असंतुष्टच होता. इ. स. १७२५–२६ सालीं कान्होजी भोसले यास निम्मे सरंजाम देऊन त्याचें चित्त ठिकाणीं ठेवून आणाव असें पत्र प्रथम शाहूनें खंडेरावास लिहिलें. खंडेरावानें त्याप्रमाणें केलें असें दिसतें. पण पुढें कान्होजीची समजाविशी करण्याचें काम शाहूनें पंतप्रधानास सांगितलें. यावर खंडेराव शाहूस लिहितो, ' उत्तम जहालें ' ! आतां माझा सरंजाम मला मिळेल असें पहा. त्यावर शाहू त्यास लिहितो, ' तुम्हास दक्षणप्रांतें जाण्याचा प्रसंग प्राप्त जहाला आहे.. ...तुमचा पूर्वील सरंजामीचे ताकीद रोखे पाठविले आहेत.......दसऱ्याच्या मुहुर्तें फौजेचा गाहा करून स्वार होऊन येणें......स्वामी संतोष पावे तें करणें ' (शाहू रोजनिशी, पृ. ७८). याच दक्षिणप्रांतींच्या मोहिमेचें पत्र पे. द. २० मध्यें क्र. ४ चें ता. १४–९–१७२५ चें आहे. दक्षिणच्या मोहिमेसाठीं खंडेरावानें त्रिंबकरावास दक्षिणेस बोलावलें व तो बाजीराव, प्रतिनिधी, फत्तेसिंग भोसले इत्यादींबरोबर गेला. कारण पे. द. ३०, पृ. २७६ वर शाहूचें ता. २३–१२–१७२५ चें पत्र आहे. त्यांत ' चार हजार फौजेनिशी त्रिंबकराव, प्रतिनिधीकडे रवाना केलें म्हणून लिहिलें; उत्तम गोष्ट केली ' असें म्हटलें आहे. पुढें खंडेरावही दक्षण प्रांतें गेला असें एका उल्लेखावरून दिसतें. (शाहू रोजनिशी, पृ. १०).

शाहूचा आपल्यावरील राग दूर करून घेण्यासाठीं खंडेराव बहुधा इ. स. १७२४ तच साताऱ्यास छत्रपतीचे भेटीस गेला असला पाहिजे. खंडेरावाची समजाविशी झाल्यावर उभयतांचीं बहुधा उत्तरेकडील राजकारणासंबंधीं बोलणीं झालीं असावीत, कारण खंडेराव बाजीरावाचा उत्तरेकडे असलेला विश्वासू सरदार पिलाजी जाधव यास लिहितो, ' आम्ही राजश्री स्वामीची आज्ञा घेतेसमयीं बोली केली ते तुम्हांस कलावी याजकरितां राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान यास अलाहिदा पुरवणी लिहिली आहे ते मनास आणून आपले विचारास अंतर न होये यैसें करणें.

(पे. द. ३०–२७१) या पत्रावर तारीख वर्ष दिलेलें नाहीं. पण तें बहुधा या काळचें असावें. कारण, ता. १८-४-१७२४ रोजीं शाहू खंडेराव, फत्तेसिंग व बाजीराव या त्रयीस लिहितो, 'आनंदराऊ रघुनाथ उत्तरेकडील प्रसंग पाहून तुम्हांस लिहितील त्याप्रमाणे साहित्य करणें.' (पे. द. ३०-३५२). शाहूनें खंडेरावाची समजूत घातली तरी खंडेरावाचा मुलगा त्र्यंबकराव गुजरातेंत धुमाकूळ घालीत होता. त्याचा बंदोबस्त करण्यास शाहूस जरबेचें पत्र पाठवावें लागलें. पे. द. ३०-३५४ ता. २३-६-१७२४ च्या चिटणीस पत्रांत शाहू आपले गुजरातेंतील प्रतिनिधी दुर्गोजी भोईटे, नरसो त्रिमल इ. स. लिहितो कीं, 'तुम्ही तेथें असतां त्र्यंबकराव मोल्हेर (मुल्हेर), मनोहरपुरा वगैरे पुरे लुटून सुरतप्रांतें जाऊन धामधूम करतात. (तुम्ही) त्र्यंबकरावास सांगत नाहीं हा काये विचार? हालीं त्रिंबकरावास पत्र लिहिलें आहे तेणेंप्रमाणें त्यास वर्तविणें.' असें म्हणून तेथील सावकारांचे घेतलेले पैसे परत देण्यास त्र्यंबकरावास फर्माविलें आहे.

१६. खंडेराव व बाजीराव

खंडेरावानें शाहूस आपणावरील अन्याय दूर होण्याबद्दल पत्रें लिहिल्याचें वर सांगितलें. खंडेरावानें बाजीरावास लिहिलेल्या पत्रांतूनही अशाच तक्रारी आहेत. सर्व पत्रांतून बाजीरावाकडे आतां मराठेशाहीचें प्रमुखपण आल्याची जाणीव ठेवून खंडेराव लिहीत आहे. तसेंच हरएक तपशिलाच्या तक्रारी दूर करण्यास सातार्‍यास राहणार्‍या शाहूपेक्षां सर्वत्र लक्ष ठेवणारा बाजीरावच अधिक समर्थ आहे हें समजून लिहिलें आहे. पे. द. १२-६ च्या पत्रांत 'धिराजी पवार या प्रांतें राहून धामधूम करिताती' ते स्वामीच्या विचारें आले कीं नाहीं तें पहावें म्हणून खंडेराव लिहितो व शाहूच्या अनुमतीनें आला नसेल तर 'हरयेक इलाज करून, मुलकाचा काटा काढून मुलूक राहे तें करावें. याचा विचार आपण कैसा केला आहे तो लिहिला पाहिजे' असें बाजीरावास लिहिलें आहे. आणखी एका पत्रांत (पे. द. १२-७ व दाभाडे दफ्तर, पृ. ६१-६२) खंडेराव बाजीरावास चाकण, जुन्नर, पारनेर भागांतील सरदेशमुखीचा अंमल आपण कोणत्या अटीवर घेतला आहे तें स्पष्ट करतो व त्या अनुरोधानें आपण स्वामीशीं जें काय बोललों तें स्पष्ट करीत आहे. तिसर्‍या पत्रांत (पे. द. १२-८ व दाभाडे दफ्तर–७१) खंडोजी स्वतःच्या पदरीं असलेल्या सिवाजी जगताप पिंपळेकर यास बाजीरावाच्या फौजांकडून अतिशय त्रास होत आहे. कदाचित तो नोकरी सोडून जाईल तेव्हां कोणा क्षुल्लक माणसाच्या सांगीवरून त्याची ससेहोलपट होईल असें करूं नका असें सांगून खंडेराव लिहितो, 'अतःपर आम्ही कोठवर लेहावें? जें विहित तें केलें पाहिजे, केवळ मोगलाई नव्हे. घरचा फितूर बहुतच फटकाल. येरवी आपण करिजेल ते सत्तेमुळें सर्वही होईल......परकीयांवर ताजगी (वरचढपणा) करावी, वरकड गोस्टी तूर्त एकीकडे ठेवाव्या.' या पत्रांत खंडेराव नम्रता धरून पण वडिलकीच्या नात्यानें

बाजीरावास हलक्या लोकांवर विश्वास ठेवूं नये, मुख्य धोरण सोडूं नये असें सुचवीत आहे. याच संदर्भांत पे. द. १२-९ चें पत्र तर फारच महत्त्वाचें आहे. त्यांत शाहू व चिमणाजी दामोदर राजाज्ञा यांच्यांत रुसवा-फुगवा होऊन त्यांत ' मानिले येथें (निजामाकडे) येऊन बसले हा लौकिक परकीयांनीं यैकून बहुत कांहीं संतोष मानून......कागदपत्र आले ते आम्ही द्रस्टीने पाहिले. जाणारास कांही नाहीं पण हे गोस्टी जाऊं देणारास युक्त नव्हे ' यासाठीं तुम्हांस लिहिलें आहे, असें खंडेराव बाजीरावास मोठया पोटतिडकीनें लिहीत आहे. असाच मजकूर नारो राम मंत्री (हा राजाज्ञा) इ. स. १७३० त बाजीरावास लिहीत आहे. तो म्हणतो, " राज्यांतील मऱ्हाटे चौघे चौकडें गेले. राहिले त्यासही घालविताात हे निमित्य उत्तम नव्हे " (पे. द. १२-४२) प्रा. शेजवलकरांनीं, या सर्वाचें खापर बाजीरावाच्या सर्वाधिकारशाहीवर फोडून त्यावर बरीच टीका केली आहे. परंतु या टीकेचे धणी बाजीराव नसून शाहू छत्रपतीच आहे किंवा तत्कालीन कुणावरही जबाबदारी रेखीव आखून न देण्याची मराठ्यांची पद्धत–किंवा पद्धतीचा अभाव– हीच आहे. असें म्हणावेंसें वाटतें.

असो. ही कारणमीमांसा तूर्त बाजूस ठेवून निजामाबरोबर बाजीरावाची जी प्रसिद्ध पालखेडची लढाई २५ फेब्रुवारी १७२८ ला झाली त्या प्रकरणीं बाजीराव-खंडेराव या उभयतांचें एकमेकांना सहकार्य कसें झालें त्या प्रकरणाकडे वळूं. शाहूनें बाजीराव, श्रीपतराव, त्रिबकराव, फत्तेसिंग प्रभृतींस दक्षण प्रांताच्या मोहिमेस पाठविलें असतांना त्याची संधी साधून स्वत: निजामानें मोठें राजकारण रचलें व व पुणें–सातारा भागांत फौजा पाठविल्या. कोल्हापूरचा संभाजी याचें त्यास साह्य होतें. शाहू खंडेरावास ता. ५-१०-१७२७ ला लिहितो कीं, आपण वार्तिकाबरोबर निरोप पाठविला कीं, ' फौज जथून गनीमाच्या शहावर जातों. सांप्रत ब्रहस्पतवारी निजाम उलमुल्क व संभाजी राजे कूच करून अडीच कोसांवरी आले यैसी बातमी आली त्यावरी दुसरी बातमी सेनवारीं कूच करून येवतेस आले. तर तुम्ही फौजबंदी सत्वर करून गनीमास पायबंद देऊन नतीजा देणें. राजश्री पंतप्रधान व तुम्ही येकत्र होऊन गनीमावर जाणें.' (करवीर इ. साधनें खंड २ रा, पृ. ५४) या पत्राप्रमाणें दक्षिणेंतील मोहीम आवरून उत्तरेस म्हणजे साताऱ्याकडे झपाट्यानें यावें अशीं ताबडतोबीचीं पत्रें शाहूनें बाजीरावाचा सरदार उदाजी पवार व खंडेरावाचे सरदार कंठाजी कदम व पिलाजी गायकवाड यांनाही पाठविलीं होतीं. (शाहू रोजनिशी, पृ. १०, कलम २५). आधींच्या एका पत्रांत (५-८-१७२६) शाहू खंडेरावास लिहितो, स्वामीस सर्वप्रकारें भरोसा तुमचा आहे ' (गुजर : करवीर इ. साधने, खं. २, पृ. ४९) शाहूनें लिहिलेल्या आज्ञेनुसार बाजीराव–खंडेराव यांचा पत्रव्यवहार सुरू झाला आहे. कारण परत येतांना जो तो सरदार आपापल्या वाटेनें पृथकपणे परत येऊन निरनिराळ्या ठिकाणीं निघालेला दिसतो. पे. द. ३०-४५ या

५-१०-१७२७ च्या पत्रांत खंडेराव बाजीरावास लिहितो, 'तुम्ही व अंबाजीपंत (पुरंदरे) येथेंच येणें. आमची वेथाही दृष्टीस पडेल. आनखी पाच सात भातेनें (प्रकारें) विचार आहेत.' ही भेट बहुधा प्रवरातीरीं होणार होती. (पे. द. १२-१०). वरील ५-१०-२७ च्या पत्रांत उल्लेखिलेली व्यथा बहुधा फौजेच्या खर्चा-संबंधींच असावी. कारण तशाप्रकारें स्पष्ट पत्र खंडेराव बाजीरावास पुढें लिहीत आहे. तो म्हणतो, 'तरी ये वोढीचे प्रसंगास तूर्त पन्नास हजार रुपये तो पाठविले पाहिजे' (पे. द. १२-२२). हा पैशाचा व इतर कांहीं मतभेदांचा निकाल लावण्यासाठीं अंबाजीपंत पुरंदरे यास मध्यस्थी करण्यास लिहीत आहे. तो लिहितो, 'बाजीराऊ पंडितप्रधान यांचे आमचे बोलीचे मध्यस्थीस तुम्ही आहां (पे. द. १२-२५). याच काळांत बाजीराव–खंडेराव यांच्यांत गुजरातेंतील व्यवहारासंबंधीं जे मतभेद होऊं लागले त्यासबंधींचा विचार पुढें केला आहे. शाहू पत्रें पाठवीत होता त्याच्याआधीं बाजीरावाचा सातारा येथील प्रतिनिधी मल्हार तुकदेव पुरंदरे यानें बाजीरावास लिहिलें कीं, स्वामीच्या चित्तांतील विचार 'सेनापतीस व स्वामींनीं येकत्र होऊन दहाबारा हजार फौज कनिष्ठपक्षे उभयेताची जमा होईल ते जमा करून गनीमाचा शहावर जावें म्हणजे गनीम तुम्हांवर येईल.' (पे. द. १२-१४). हें पत्र इ. स. १७२७ चें सप्टेंबर ऑक्टोबरांतील असावें. पुढील एका पत्रांत खंडेराव बाजी-रावास लिहितो, 'आम्ही विचार करून सुमुहुर्तें कूच करून बाहेर आलों (पे. द. १२-२०, काळ १७२८ चा प्रारंभ). यानंतर लवकरच निजामाबरोबर झालेल्या पालखेडच्या लढाईंत खंडेराव बाजीरावाबरोबर असल्याचा स्पष्ट पुरावा उपलब्ध नसला तरी तो त्या लढाईत असला पाहिजे असें वरील संदर्भावरून मानण्यास जागा आहे. त्रिंबकरावही या लढाईंत होता; त्यास पुढें बंकापुरास पाठविण्यांत आलें. (पे. द. १०-५४). असो.

बाजीराव-खंडेराव परस्पर सहकाराच्या काळांतही उभयतांत तक्रारीचे अनेक प्रसंग उद्भवले. नागोजीराव पाटणकर म्हणून एक खंडेरावाचा सरदार यानें खंडे-रावाकडून नालबंदी नख्त चार-पाच हजार रुपये व कापड घेतलें व बाजीरावाकडे त्याच्या पदरीं राहण्यासाठीं बोलणें करण्यास गेला! बाजीरावानें त्याच्याशीं बोलणेंही केलें. हें खंडेरावास कळल्यावर खंडेरावांनीं आपला चुलतभाऊ कृष्णाजी दाभाडे यास बाजीरावाकडे नागोजीरावाची माहिती सांगण्यासाठीं पाठविलें. परंतु बाजीरावानें त्याच्याशीं कांहींच चर्चा केली नाहीं. त्यावरून खंडेरावानें बाजीरावास एक तक्रारीचें पत्र जरा चिडून, परंतु गोडीच्या भाषेंत लिहिलें आहे. (पे. द. १२-१५) हें पत्र तत्कालीन मराठे सरदारांच्या संधिसाधु वृत्तीवर प्रकाश टाकणारें आहे. या प्रकरणीं एकंदरींत बाजीरावाची आगळिक होती यांत शंका नाहीं. अशीं बाजीरावा-कडून आपल्याच सरदाराशीं आगळिक झाल्याचीं अनेक पत्रें उपलब्ध आहेत. यांतील कांहींचा उल्लेख मागें केलेलाच आहे. खंडेरावाचें आणखी एक पत्र असें. 'आपणा-

कडील भिकाजी शिंदे मौजे कोरेगाऊ परगणे पुणें येथें येऊन रयतेसी उपसर्ग देतात. …… गतवर्षापासून आपणास आम्ही सांगितलें की तेथें ठाणें न ठेवावें. परंतु चित्तास न आणतां सांप्रत शिंदा पाठविला. काय म्हणावें?' (पे. द. १२–२१). या सर्व तक्रारी दूर करून घेण्यासाठीं खंडेराव बाजीरावाची समक्ष भेट व्हावी अशी अपेक्षा करतो व पुढें छत्रपतींच्या भेटीस उभयतांनीं जावें असें बाजीराव सुचवीत सतां खंडेराव म्हणतो, 'परस्परें एकमेकांचें न्यून न दाखवावें यांतच लौकिक आहे.' (पे. द. १२–२३) या उभयतांच्या शाहू–भेटींत काय ठरलें तें कळत नाहीं. बहुधा प्रकरण निकालांत निघालें नसावें, कारण पुढील एका पत्रांत खुद्द सौ. उमाबाईच बाजीरावाकडे कडक शब्दांत तक्रार करीत आहे. (पे. द. १२–२६). खंडेराव यावेळीं आजारी असल्याची तक्रार अनेक पत्रांतून व्यक्त करतो. तो म्हातारा झाला होता. ब्रह्मेंद्र स्वामी एका पत्रांत बाजीरावास लिहितो, 'खंडेराव दाभाडे राजाच्या कानीं लागून तुमच्या योजना हाणून पाडतो' स्वामींच्या या लेखनाचा अर्थ इतकाच कीं बाजीरावाची खंडेरावावर जी दंडेली चालली होती त्याचीं वरील उदाहरणें खंडेरावानें शाहूस सांगितलीं असतील. पत्रांत बाजीरावाचे कोणते बेत हाणून पाडतो याचा उल्लेख नाहीं. बाजीरावाची गुजराथमधील योजना दाभाडे हाणून पाडीत असल्यास स्वाभाविक आहे.

१७. पेशवे-दाभाडे संघर्ष : गुजरात

शेवटीं गुजरातेंत दाभाडे–पेशवे यांच्यांतील कुरबुरीचे प्रसंग कसकसे उद्‌भवत गेले व त्यास तीव्र स्वरूप कसें आलें तें सांगून हें लेखन संपवितों. दाभाड्यास गुजरातेंत मराठी सत्तेची स्थापना करण्याची अनुज्ञा राजारामाचे वेळीं मिळाली हें मागें सांगितलेंच आहे व का. सं. बखरींतील उल्लेखानुसार इ. स. १७१९ नंतर लवकरच म्हणजे बाजीरावास पेशवाई मिळाली त्या सुमारास त्रिंबकराव व पिलाजी गायकवाड यांची गुजरातेंत रवानगी झाली हें मागें आलेंच आहे. यानंतर शाहू रोजनिशींत पृ. ७९ वर इ. स. १७२७–२८ या वर्षींचा उल्लेख आहे तो असा : 'प्रांत गुजराथ निमे राजश्री चिमणाजी बल्लाळ याजकडे मोकासा होता तो दूर करून हल्लीं राजश्री खंडेराव दाभाडे सेनापति याजकडे जमावा बेगमीस मुकासा दिला.'

वर लिहिल्याप्रमाणें चिमणाजीचा हक्क खंडेरावाकडे सुपूर्त केला असावा, हेतु हा कीं, कंठाजी कदम व खंडेराव या दोघा सरदारांनीं सहकार्य करून चौथाई सरदेशमुखीच्या हक्कासाठीं लढून पूर्तता करून घ्यावी. अशारीतीनें गुजरातेंत कंठाजी व दाभाडे यांचा वरचष्मा होतो हें बाजी–चिमाजीस खपलें नसावें- कारण ता. २७–१०–१७२७ च्या एका पत्रांत (पे. द. १२–१६) पिलाजी जाधव हा बाजीरावाचा सरदार त्यास लिहितो, 'रा. कंठाजी कदम हे रेवा कार्तिक सुध प्रतिपदेस उतरून दोहोदे पलीकडे गेले. रा. पिलाजी गायकवाड हे सुरतेकडे गेले आहेत. आम्ही उभयताचे दरमियान त्वरेनेंच जात असो.' पिलाजी गायकवाड व कंठाजी कदम हे दोघेही

सहकार्यानें काम करणारे. त्या उभयतांच्या दरम्यान जाऊन उभे राहण्याचा व त्या सरदारांशी युद्धप्रसंग आणण्याचा पिलाजी जाधवाचा हेतू सहज लक्षांत येण्यासारखा आहे. यासंबंधीं कुणी शंका घेईल तर खुद्द खंडेरावानेंच बाजीरावाकडे पिलाजी जाधवाविरुद्ध केलेली तक्रार पुढील पत्रांत पहा. ' जवार रामनगर येथील बोली आपली आमची निमेनिमप्रो जाली आहे त्याप्रमाणें चालवावें......येविषयीं राजश्री पिलाजी जाधवराऊ यास व वरकड कोणास पत्रें लिहिणें असतील तीं परिछिन लेहून पाठवावीं जे, धामधूम न करीत यैसें केलें पाहिजे. (पे. द. १२-१३). मराठे सरदारांच्या अधिकारक्षेत्रांत बाजीरावानें व त्याच्या सरदारांनीं धामधूम केल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. गुजरातेंत त्याचा अतिरेक झाला. या बाबतींत उमाबाई सावध आहे. तिच्या संबंधीं पुरंदरे बाजीरावास लिहितो (२१-४-१७२८) कीं, यशवंतराव दाभाडे हा खंडेरावाचा धाकटा मुलगा गुजरातेंतील पाच हजारांचा ऐवज हुजूर नेऊन देऊं लागला ते समयीं उमाबाईनीं सांगितलें कीं, पवार वगैरे छत्रपतींचे सरदार गुजरातेंत जातात. " चापानेरचें ठाणें राजश्री मल्हारजी होळकर व राणोजी शिंदे व आनंदराऊ पवार यांनीं घेतलें. याकरितां गुदस्ताचा पैका हुजूर द्यावासा नाहीं तरी तुम्ही पैका न देणें...... मुलकांत दुसरी फौज न जाये तें करावें. " (पे. द. १२-१८) या व अशा अनेक उल्लेखांवरून सौ. उमाबाई ही तत्कालीन राजकीय व्यवहार दक्षतेनें पहात होती व कारणप्रसंगें बाजीरावास कडक पत्रें लिहीत होती याची शंका रहात नाहीं. ११ एप्रिल १७५१ च्या पत्रावरून असें दिसतें कीं उमाबाई प्रसंगी स्वाऱ्यावरही जात असे. ' उमाबाई अंबिकाबाई हजार स्वारा निसी समागमें हेंहि मोठें झट आहे ' (पुरंदरे दफ्तर १-३४२) हें पत्र नानासाहेब पेशव्यानें चि॥ नाना (?) यांसी असें आहे.

बाजीरावाच्या पेशवाईच्या काळांतील इ. स. १७२८-३१ हीं तीन चार वर्षें अतिशय महत्त्वाचीं व त्याचें मराठेशाहींतील कर्तृत्व निर्णायक स्वरूपाचें ठरावें अशा प्रकारचीं आहेत. या काळांत बाजीरावानें निजामाचा पालखेड येथें पराभव केला, माळव्यांत गिरधर बहाद्दर व दया बहाद्दर यांस बुडविलें. छत्रसालाशीं सख्य केलें, आणि डभईच्या लढाईंत दाभाड्याचा पाडाव केला. तूर्त गुजरातपुरतें सांगावयाचें तर गुजरातेंत बाजी-चिमाजी दोन उद्दिष्टें पुढें ठेवून वागत होते. एक मोगलांकडून गुजरातच्या चौथाईचे हक्क कबूल करून घ्यावयाचे; यासाठीं मोगलांशीं करावा लागणारा युद्धप्रसंग आपण एकट्यानें करावा व हें चालू असतां ठिकठिकाणीं दाभाड्याच्या सरदारांस शह देऊन व त्यांना जेर करून दाभाड्यास आपल्या हुकमतींत आणावें. हेंच धोरण पुढें पेशव्यांनीं नागपूरकर भोसल्यांशीं वागतांना अनुसरलें. सारांश, बाजीराव हा मराठ-मंडळांत घटनेनुसार पेशवा, परंतु मराठ-मंडळांतील दुसऱ्या कोणत्याहि सरदाराहून श्रेष्ठ असें स्थान पेशव्यास असावें, म्हणजेच मराठमंडळाची रचनाच, वस्तुतः बदलून टाकावी हा बाजीरावाचा डाव

होता. कदाचित् असा एकाहाती कारभार निर्माण केल्याखेरीज भारतांतील राजकारणांत मराठ्यांचें वर्चस्व स्थापन करतां येणार नाहीं असें त्यास वाटत असावें आणि असें वर्चस्व स्थापन करण्याचें सामर्थ्यही आपणांस असल्याचा त्यास आत्मविश्वास वाटत असावा. पण तें कांहीं असलें तरी त्यामुळें दाभाडे–भोसले इत्यादि सरदारांचें परंपरागत स्थान व नंतरचा त्या सरदारांचा पेशव्यांशीं दुय्यम दर्जा यांत विरोध उत्पन्न झाला. त्या सरदारांच्या मनांत हें शल्य बोंचत राहिलें व मराठे सरदारांचें मुख्य ध्येय बाजूस राहून ते आपसांतच लढत राहिले. हें मराठे सरदारांचें आपसांतील लढणें शाहूस तो सर्वश्रेष्ठ असूनही आवरतां आलें नाहीं, ही गोष्ट गुजरातेंतील दाभाडे–पेशवे संबंधांत जी दिसून येते तिचा तपशील विषयाच्या पूर्ततेसाठीं थोडक्यांत सांगणें जरूर आहे.

पालखेडच्या लढाईंत बाजीराव व खंडेराव यांचें सहकार्य झाल्यानंतरच्या काळांत खंडेराव गुजरातेंत गेल्याचें दिसत नाहीं. तो तळेगांवींच वृद्धापकाळामुळें स्वस्थ असावा. या काळांतील खंडेरावाचीं बाजीरावास गेलेलीं पत्रें तक्रारीचीं परंतु संयमपूर्ण अशीं आहेत, परंतु सौ. उमाबाई मात्र त्यास कडक रीतीनें भाडभीड न ठेवतां लिहीत आहेत. खंडेराव दाभाडे ता. ८–१–१७३० पूर्वीं मृत्यु पावला. (हिंगणे दप्तर खं. १, पृ. १६०). १७२८–२९ च्या काळांत बाजी–चिमाजींचा बेत गुजरातेंत अहमदाबादनजीक मुहमदाबादकडे एकत्र जमण्याचा असावा. चिमाजी माळव्यांत असलेल्या बाजीरावास फेब्रुवारी १७२९ त त्वरेनें बोलावीत आहे. (पे. द. १२–२७) या उभयतांचा एकत्र येण्याचा हेतु गुजरातेंतील बादशाही अधिकारास शह देऊन चौथाईचे हक्क प्राप्त करून घेणें हा होता. पण त्याच्या आधीच्या वर्षीं उदाजी पवार, पिलाजी जाधव, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे यांच्यासारखे बाजीरावाचे सरदार, कंठाजी कदम बांडे व पिलाजी गायकवाड या दाभाड्यांच्या सरदारांबरोबर डभई–दोहद या भागांत लढाया खेळत आहेत. (पे. द. १२–१८). वादाचा निकाल लावून घेण्यासाठीं दाभाडे (बहुधा कृष्णराव दाभाडे) सातार्‍यास आले असतां शाहूचा पेशव्याकडे कल आहेसें पाहून, दाभाड्यांच्या परंपरागत हक्कासाठीं तो हट्ट धरून बसला असतां चिमाजी बाजीरावास एका पत्रांत लिहितो, "फौज तो रवाना करून मुलूख पालथाच घालावा म्हणजे सहजेंच डोले उघडतील" (पे. द. १२–३३) एकंदरींत मराठेशाहीशीं एकनिष्ठ असणाऱ्या सरदारांवर फौज रवाना करून त्यांचे डोळे उघडण्याचा चिमाजीचा बेत दिसतो ! इकडे आपसांतील हीं युद्धें चालू असतां सरबुलंदखान या गुजरातच्या मोगल सुभेदारानें पेशव्याचा गुजरातेवरील चौथाईचा हक्क मान्य केला. (१७ ऑक्टोबर १७२९ इतिहास संग्रह पे. द. माहिती. पृ. ३२७) या करारांत 'पिलाजी गायकवाडासारखे कोणी सरदार भिल्ल व कोळी यांच्या साह्यानें मुलुखास त्रास देतील तर त्याचा बंदोबस्त करण्याची हमीही–म्हणजे पिलाजीचा शत्रूप्रमाणें बंदोबस्त करण्याची हमी–बाजीरावानें

घेतली. (डफ, पृ. ३७४) चौथाईप्रमाणेंच सरदेशमुखीवरही पेशव्यांच्या हक्कास यावेळीं मोगलांकडून मान्यता मिळाली. या तहाचा उल्लेख बादशहाकडून आलेल्या फारशी पत्रांतून आलेला असून, त्याची नोंद पे. द. १५-८६ मध्यें पुढीलप्रमाणें आहे. ‘ देसाई व कानगो व मोकदम व रयत व मुजारी यांस लिहिलें जातें कीं, चौथ व सरदेशमुखी चवेतालीस महाल सुभे गुजरात येथील खंडेराव याजकडून तगीर करून (बदलून) बाजीराव याजकडे करार केली. ” या तहामुळें दाभाडे-पेशवे वितुष्ट वाढत गेलें !

१८. संघर्षाचा शेवट

मोगल बादशहातर्फे मराठ्यांस म्हणजे बाजीरावास गुजरातेंत चौथाई-सरदेश-
मुखीचे हक्क मिळाले हें निजामास आवडलें नाहीं. तो दक्षिणेंतच असल्यानें त्याला
मराठे सरदारांच्या आपसांतील कुरबुरींची अधिक यथार्थ कल्पना होती. पे. द. १०-
७२ तील ता. १-११-१७३० च्या, पेशव्याचा निजामाच्या छावणींतील वकील
गणेश बल्लाळ यानें बाजीरावास लिहिलेल्या पत्रावरून असें दिसतें कीं, निजामानें
दाभाड्यावर दबाव आणून आपणाकडे ओढण्याचा यत्न केला. त्याच तारखेच्या
आणखी एका पत्रावरून असें दिसतें कीं, उमाबाई व कंठाजीचीं पत्रें निजामाकडें
गेलीं होतीं (पे. द. १७-८). त्या पत्रांतील आशय असा कीं, हे सरदार ‘ कांहीं
कवडी मागत नाहींत. फुकाचा आस्रये मात्र नबाबाचा असावा म्हणजे प्रधान पंतास
आम्ही युद्ध करून मोडून, जर त्यांनीं आम्हांस मोडिलें तर तुम्ही जागिरा व मनसब
द्यावी आनी आम्ही मोडिलें तर राजा शाहूचें राज्य बुडवितों...राज्य बुडाल्यावर
संभाजी राजीयास राजीं स्थापून त्रिंबकराव सेनापती व कंठाजीस सरलष्कर द्यावें
म्हणजे नबाबशाहीचाहो बोलबाला होत आहे !’ (पे. द. १०-७२ अ, पृ. ६५-
६६) तिकडे संभाजीनेंही स्वतःस शाहूच्या जागीं बसवावें अशीं निजामाकडे बोलणीं
लावलीं होतीं. फुटीर मराठे सरदार, संभाजी व निजाम यांचीं अशीं बोलणीं चालू
होतीं. तरी शाहूचें निजामाशीं सुलूख ठेवण्याचें धोरण चालूंच होतें ! (पे. द.
१०-७५)

दाभाडे कदम यांचें निजामाशीं असें हितगुज चालू असल्याचा परिणाम असा झाला कीं, गुजरातेंतील कंठाजी कदम व पिलाजी गायकवाड यांच्या सांगीवरून तेथील महालकरी पेशव्यास वसूल देईनासे झाले व त्यामुळें पेशव्यानें तेथें पाठविलेल्या इसमास हात हालवीत परत यावें लागलें. (पे. द. १७-२९) एवढ्यानें पुरें झालें नाहीं म्हणूनच कीं काय दाभाड्यानें पेशव्यास मावळांत उपद्रव देण्यास सुरुवात केली. (पे. द. १२-३६). मावळांत दाभाड्याचीं सरदेशमुखीचीं अनेक गांवें असल्यानें व तळेगांव हें मावळांतच असल्यानें तेथें त्याचें बस्तान चांगलें बसलेलें होतें. कदाचित् दाभाड्यावर शह ठेवण्यासाठींच पुढील काळांत पेशव्यानें पुण्यास ठाणें द्यावयाचें ठरविलें असेल (शाहूकडून बाजीरावास पुणें इनाम ता. १७-६-२७). परंतु

या तर्कास अधिक आधार शोधला पाहिजे. असो. दाभाड्याबद्दलच्या अशा अनेक तक्रारी कानीं आल्यावरून शाहूनें त्रिंबकरावास हुजूर दर्शनास आणावयास हुजरे पाठवले. १–१–१७३०. (पे. द. १२–३५) या वेळीं त्रिंबकराव शाहूच्या भेटीस गेला नसावा. कारण खंडेराव ८ जानेवारीपूर्वीं मृत्यु पावला. पुढें उत्तरोत्तर त्रिंबकराव व उमाबाई यांचें सूत्र निजामाकडे लागलें असल्याचें शाहूच्या कानीं आल्यावर शाहू संतापला व त्यानें बाजीरावास आज्ञा केली कीं, त्रिंबकरावास धरून आमच्या दर्शनास आणा. त्या आज्ञेप्रमाणें बाजीराव गुजरातेंत गेला असतां बडोद्यानजिक डभई येथें ता. १–४–१७३१ रोजीं उभयता सैन्यासह समोरासमोर आले. बोलाचाली व वाटाघाटी सुरू होत्या. पण शेवटीं युद्ध झालें व त्यांत त्रिंबकरावास अचानक गोळी लागून तो ठार झाला. यासंबंधीं राजवाडे खंड ३, ले. ३० हें बाजीरावानें ब्रह्मेंद्रस्वामीस ता. २–४–१७३१ ला लिहिलेलें पत्र आहे. त्यांत त्रिंबकराव, पिलाजी वगैरेंचें तीस पस्तीस हजार सैन्य होतें व तें ' आम्हाशी युद्धास आलें छ ४ सवालीं युद्ध जाहलें. त्रिंबकराव, जावजी दाभाडे, मलोजी पवार व पिलाजी गायकवाडाचा पुत्र असे चौघे ठार जाहले. ' या युद्धांत उदाजी, आनंदराव वगैरे पवार मंडळीही दाभाड्याचे बाजूस लढली असें दिसतें.

डभईच्या लढाईनंतर शाहू, उमाबाई व बाजीराव यांच्यामध्यें घडलेला नक्क नाट्यप्रसंग सांगावयाचा. यास आधार का. सं. तील बखरीचा व तो रा. खं. ३ ले. १६७ मध्येंही वर्णिला आहे. हा लेख पुढोल काळांतील असून दाभाडे घराण्याचे मूळ पुरुष व त्यांची थोडक्यांत हकीकत सांगणारा आहे. त्या लेखाचा विशेष हा कीं तो डभईच्या युद्धानंतर एकदोन वर्षांच्या काळापर्यंतचाच लिहिला गेला आहे. त्यावरून वाटतें कीं तो शाहूच्या हयातींत, कदाचित इ. स. १७४० पूर्वींच लिहिला गेला असावा. तो नाट्यप्रसंग असा :–

यशवंतराव (त्रिंबकरावाचा भाऊ) ' त्रिंबकरावास अग्न देऊन पंतप्रधान मागें लागले पेशवे पुढें पळों लागले,...... पळत पळत साताऱ्यास आले; आणि ' राजवाड्यांत जनानखान्यांत लपोन राहिले आहे. ' यशवंतराव मागें लागले व तेथें आले त्याप्रसंगीं शाहू महाराज दरवाजापाशीं येऊन उभे राहिले व यशवंतराव व त्यांचे साथीदार यांस म्हणाले की, ' तुम्ही माझा गळा कापून ब्राह्मणास मारणें. मी अपराधी आहें. ' यावर यशवंतराव काय करणार ? ते रुसोन तळेगांवास गेले. त्यावर शाहू स्वत: तळेगांवीं त्यांच्या व उमाबाईच्या समजाविशीसाठीं गेले. बरोबर बाजीरावही होते. प्रत्यक्ष भेटींत बाजीरावास हातीं धरून उमाबाईस बोलावून आणोन... तरवार काढोन बाईपुढें ठेविली, बाजीराव याजला पायावर घातलें आणि बोलले कीं तूं आपले हातें याचा गळा काप. नंतर समजूत पडली. परस्परें बहुमान दिल्हे यशवंतरावास सेनापतीचें पद दिल्हें......नंतर महाराज सातारियास गेले !

त्यावेळच्या मराठ–मंडळांतील एकमेकांचे संबंध व मराठी मनाची ठेवण, आणि

शाहूचें सर्वांची समजूत घालण्याचें धोरण हें सर्व लक्षांत घेतां हा प्रसंग खरोखरच घडला असावा असें वाटतें.

पण हा नाट्यप्रसंग तूर्त बाजूस ठेवून त्याबद्दल चिमाजी आप्पास काय वाटत होतें तें लक्षांत घेण्यासारखें आहे.(पे. द. १७–३०–च्या ता. १७–११–१७३१ च्या (ही तारीख अंदाजी आहे. प्रा. खरे ही तारीख १७ नसून १८ अशी पक्की करतात. फक्त एकच दिवसाचा फरक. –पौ. गौरवग्रं ,मराठी पृ १३३) पत्रांत मानाजी जाधव हा शाहूचा सरदार शाहूकडे तक्रार करीत आहे. तो म्हणतो, ' पिलाजी जाधवास चिमाजी अप्पाने हुकूम केला कीं, मानाजी जाधवास लुटून त्यास धरून घेऊन येणें. पुढें चिमाजीची व मानाजीची भेट झाली, त्यांत चिमाजीने मानाजीस दम दिला कीं, तुम्ही महाराजांची पाठ करून राहातां तर एक दिवस मारून ताराज करीन. त्रिंबकराऊ दाभाडा मारिला. महाराजांनीं आमचें काय केलें ? तुम्ही वीट (वैर) करून किती दिवस राहाल ? ' चिमाजी आप्पाच्या या धमकीवजा बोलण्याच्या वृत्तान्तावर अधिक भाष्य करण्याची जरूर नाहीं.

यापुढील काळांतील दाभाड्याची हकीकत (मी अभ्यासिलेली नाही व आहे ती) विशेष महत्त्वाचीही नाही. यशवंतरावांत खंडेराव किंवा त्रिंबकरावाचें पाणी नव्हतें. (पुढील काळांत) उत्तरोत्तर गायकवाड हे गुजरातेंत दाभाड्यांचे मुतालिक म्हणून, पण खरोखर प्रमुख म्हणून कारभार पाहूं लागले व दाभाड्याचे वंशज त्यांस मिळालेल्या वतनवाडीच्या जहागिरीवर संतुष्ट राहून तळेगांवीं कालक्रमणा करूं लागले.

१९. समारोप

शिवकालापासून शाहूच्या काळांतील बाजीरावाच्या पेशवाईपर्यंतच्या काळांत कर्तृत्व गाजविलेल्या खंडेरावाचे पराक्रम इ. स. १७२८ पर्यंत वाढत गेले व तेथपर्यंत त्याच्या आयुष्याची चढती कमान होती. पण बाळाजी विश्वनाथाच्या काळापासून त्यास दुय्यमपणच येत गेलें. पुढें बाजीरावानें गुजरातेंतील त्याच्या कक्षेंत वर्चस्व स्थापन करण्याचा प्रयत्न केला व त्यामुळें खंडेरावास व तदुत्तर दाभाडे घराण्यास उतरती कळा लागली व तें घराणें कायमचें मागें पडलें !

या लेखनांतील त्रुटी. १. खंडेरावाच्या संभाजीकालीन हालचाली कळत नाहींत. २. खंडेरावास सरदारी केव्हां प्राप्त झाली तें कळत नाहीं. ३. शिवाजीकालीं तो सरदार झाला असें का. सं. बखर म्हणते. पण त्याला आधार मिळाला नाही.

पृ. ५० ओळ ९. ओझर हें गाव पुणें जिल्ह्यांतही जुन्नरच्या नजीक आहे. दाभाड्यांचा ज्या ओझरशीं संबंध होता तें ओझर नाशिकपेक्षा पुणें जिल्ह्यांतील असण्याचा अधिक संभव आहे. कारण खंडेरावास नंतरच्या काळांत मिळालेली जुन्नर सारखीं अनेक इनाम गांवें त्या भागांतीलच आहेत.

११. दोन जुने कर

श्री. ग. ह. खरे

१. बुत्फरोशी=भुतपरोशी : हा शब्द जुन्या ऐतिहासिक वाङ्मयांत विशेषतः कागदपत्रांत आणि त्यांतल्या त्यांत करवसुलीच्या हिशेबी कागदांत आणि तोहि अहमदनगरच्या निजामशाहींतील किंवा निजामशाही बुडाल्यानंतर कालदृष्टचा तिच्या लगतच्या मुघली कागदांत आढळतो. सर्वसामान्य माणसाच्या डोक्यांत गझनीच्या महमूदाविषयीं एक दंतकथा घर करून राहिली आहे. ती म्हणजे महमूद सोमनाथाच्या देवळांतील मूर्ती फोडावयास गेला असतां तेथील उपासकांनीं आम्ही वाटेल तेवढें द्रव्य देतों, पण मूर्ती फोडूं नये अशी विनंती केली. तेंव्हां महमूद म्हणाला : मी बुत्फरूश नसून बुत्शिकन आहे. याचा अर्थ मी पैसे घेऊन मूर्ती विकणारा नसून मी मूर्ती फोडणारा आहे. या दंतकथेंतील बुत्फरूश म्हणजे मूर्ती विकणारा हा अर्थ माझ्या पुष्कळ दिवस डोक्यांत असल्यामुळें मला बुत्फरूशी किंवा भुत्परोशी किंवा त्याचा एखादा पर्याय म्हणजे मूर्ती विकण्याचा धंदा असा अर्थ असावा असें वाटे. पण मुसलमानी सत्तेच्या काळांत हा शब्द अनेक वेळां आल्या-मुळें मला शंका येऊं लागली कीं, त्या काळांत मूर्ती विकण्याचा धंदा एवढचा जोमांत चालू असेल का ? या प्रश्नाचें समर्पक उत्तर कित्येक दिवस माझ्या लक्षांत आलें नाहीं. पण शेवटीं सुमारें दोन वर्षांपूर्वी पुण्याच्या पेशवे दप्तरांत नासिक–अहमदनगरकडील गावकीच्या हिशेबाचे कागद पहात असतां कित्येक कागदांत हा शब्द येऊन त्यापुढें कांहीं आंकडे दिले असल्यामुळें त्याचा उलगडा करून घेण्याच्या प्रयत्नास मी अधिक लागलों. त्याचें फलित सांगण्यापूर्वी हा शब्द आलेलीं कांहीं वाक्यें किंवा वाक्यांश येथें उद्धृत करतों. ज्यांत हे वाक्यांश आले ते कागद पेशवे दप्तरांत अधिक संशोधनाकरितां निवडलेल्या कागदांचे कांहीं रुमाल निराळे बांधून ठेविले आहेत त्यांपैकीं ४९ व्या रुमालांतील आहेत.

(१) क्र. २१९९० साहार अहमदानगर थावर बाब कमावीस भुतफरोसी व अखताना व गोधल व कतखुदाई कानू रुके २४. ॥.

(२) क्र. २२००५ कसबे भिंगार भुतफरोसी कास

बाहेरील रुके २४ ·॥·   गावकरी रुके बारा ·।·   महालाचा भोगास रुके बारा ·।· गोधलास नाही

(३) क्र. २२०१९ का भिगार वगैरा भुतफरोसी

मोकदम व मानकरी यास माफ असे बाकी लोकास

डां (?) कास रुो   माहलाचा भोग होईल

·।· गावकरियास त्यास रुो
·।।· बाहेरील येईल ·।·

(४) क्र. २२०२१ शहर अहमदनगर
कतखुदाई व अखताना सेटे माहजन व पटवारी भट व मुसलमान
.... यांस हसील नाही माफ
भुतफरोसी वीरास टके १।६

(५) क्र. २२०५३ नालेगाव पाा हवेली अहमदनगर भुतफरोसी दर भोगास गोद-लास रुके १२ ·।·

(६) क्र. २२५११ पाा चादोरी व कर्याती भोगूर व बाजेखेली व देवलाली कमावीस कानू भुतफरोसी निाा तलपद आसनारासमध नाही

(७) २२५५८ पाा चादोरी मामले गुलसनाबाद कमावीस कानू भुतफरोसी दर ·।· निाा तलपद

(८) भा. इ. सं. मंडळ इतिवृत्त १८३५ पृष्ठ ४५३–४५४ श. १३४७ क्रोधन मार्गेश्वर शुद्ध पंचमी शनवार......कदीम जात्रा दोन च्यापसेष्टी बागशंस्टी यासी कमावीस किा डबीकर व गलेकाटू व मुढी व सेडी व जावल व भीक-वाली व कान टोचणे बेडी व खोडा व भुतफरोसी येकून डबी.........भुत-फरोसी रूके ०।।।६

२. या उताऱ्यांवरून एवढें निष्पन्न होतें कीं, हा एक कर आहे. तो हिंदू मनुष्यां-कडून वसूल केला जात होता. तो गांवच्या रहिवाशाला जेवढा होता त्याच्या दुप्पट परगांवाहून त्या गांवांत आलेल्या मनुष्यास द्यावा लागे आणि या कराचा देवाच्या मूर्तीशीं कांहीं तरी संबंध होता. पुढें सहज मी हा शब्द विलसनच्या ग्लॉसरीमध्यें सापडतो का तें पाहिलें. त्यामुळें या शब्दाचा अधिक उलगडा झाला. विल्सन ग्लॉसरीच्या इ. १९४० च्या सुधारलेल्या व सटीक आवृत्तींत हा शब्द बुत्फरोशी-परोशी असा देऊन व तो बुत्फरोशी या फार्सी शब्दाचें रूपांतर आहे असें सांगून लागलीच पुढें फार्सींतील बुत् म्हणजे मूर्ति आणि तिची उपासना किंवा तिची पाळणूक अथवा तिचें कौतुक अगर तिची भक्ति अशा अर्थीं असलेला पर्वरिश असा शब्द दिला आहे आणि त्याचा एक अर्थ A tax levied on deferent trades in a town or village to defray the cost of celebrating the worship of the tutelary devinity असा खुलासा दिला आहे. येथें दिलेला पर्वरिश हा फार्सी शब्द चिंत्य आहे. याचे अर्थ, वाढविणें, जपणें, पाळणूक, इत्यादी आहेत. त्यांतूनच उपासना हा अर्थ निघाला. हा शब्द आणखी एका ऐतिहासिक शब्दांत वापरला आहे. तो शब्द बालपरवेशी हा आहे. याचा अर्थ मुलाच्या पालनपोषणाकरितां—वाढीकरितां—जपणुकीकरितां द्यावयाचा पैसा. हा शब्द गंगाजमनी स्वरूपाचा आहे. बाल हा शुद्ध भारतीय भाषेंतील शब्द असून परवेशी हें पर्वरिशचें अपभ्रष्ट रूप

आहे. या शब्दांत पर्वरिशचें परवेशी असें रूप झालें तर चर्चा करावयास घेतलेल्या शब्दांत परोशी असें रूप झालें. मात्र दोन्ही ठिकाणी पर्वरिश या शब्दाचे जवळ-जवळ असणारे दोन अर्थ घेऊन त्या दोन अर्थांनीं हा शब्द वापरलेला आहे. तेव्हां वुत्फरोशी किंवा भुतपरोशीचा अर्थ मूर्तीची उपासना करण्यासाठीं द्यावयाचा कर असा झाला आणि तो अर्थ वर जे उतारे दिले आहेत त्यांवरून पक्का होत आहे.

३. जकात : मुघली विशेषतः औरंगजेबाच्या कारकिर्दींत हिंदू व मुसलमान व्यापाऱ्यांचे बाबतींत विषमता कशी दाखविली जाई याविषयीं प्रा. श्रीराम शर्मा यांच्या रिलिजिअस पॉलिसी ऑफ दि मुघल्स या पुस्तकाच्या दोन्ही आवृत्तींत एक-रूप पण सामान्य असा मजकूर आला आहे.* पण मला पेशवे दप्तरांत यासंबंधीं जे कागद पहावयास मिळाले त्यांत कांहीं अधिक महत्त्वाचा तपशील मिळाला आहे. तत्संबद्ध उतारे प्रथम येथें देतों :–

पेशवे दप्तर अधिक संशोधनासाठीं निवडलेले कागद रुमाल ४९.

(१) नकासा घोडे व बैल व म्हैस विकेल त्यासी हिंदूस पचोतरा मुसलमान अडिचोत्रा गाईस हसील नाही.

(२) क्र. २२०१३ दस्तूर अमल शहर अहमदनगर कुल मतां बाहेरून येईल कापड व गला व किराणा तूप तेल हर येक जिनस यासी दाखला आणिताहेत दाखला-

* १ ली आवृत्ति, पृ. १५०; २ री आवृत्ति, पृ. १४३. प्रा. शर्मा यांच्या माहितीचा पडताळा घेऊन मूळ आधारांत कांहीं अधिक माहिती मिळते कां हें पाहण्यासाठीं मीं त्यांनीं दिलेले आधार तपासले. तेव्हां मला त्यांत दोष आढळले ते असे :–त्यांनीं दिलेल्या आधारांपैकीं मिरात-इ-अहमदी भाग १, पृ. १५८ ऐवजीं पृ.२५८ अशी सुधारणा केली पाहिजे. पृ. २५९ मध्यें आलेली माहिती मंदिरभंजन, त्यांचा जीर्णोद्धार न करणें व अन्यथा पैसे घेणें यांविषयीं आहे. जकातीमधील विषमते-विषयीं नाहीं. मनुचीच्या २ ऱ्या खंडांत ६१९ पृष्ठ नाहीं. मग तें पृष्ठ सांगून उपयोग काय ? खाफीखानाच्या मुन्तखबुल्लुबाब खंड २ मध्यें एतत्संबद्ध आलेली माहिती २२९, २३० पृष्ठांवर आहे. २३०, २३१ पृष्ठांवर नाहीं. मिरात-इ-अहमदी भाग १, पृ. २६५ आणि २९८, २९९ यांत अनुक्रमें एक राजाज्ञा व एक प्रधानाज्ञा आहे. कालदृष्टचा त्यांमध्यें १५ वर्षांचें अंतर आहे. तथापि पहिल्या राजाज्ञेचा मुसलमान व्यापाऱ्यांनीं गैरफायदा घेतल्याचें आढळल्यानें दुसरी प्रधानाज्ञा काढावी लागली. आतां या दोहोंपैकीं कोणी कोणापासून उसनवारी केली हें सांगणें कठीण आहे. खाफीखान कालदृष्टचा अगोदरचा असला तरी मिरातच्या कर्त्यानें आज्ञांच्या उण्याअधिक सदोष नकला उद्धृत केल्या आहेत. खाफीखानानें स्वतःची म्हणून माहिती दिली आहे. ऑर्म्स फ्रॅग्मेंट्सच्या मी पाहिलेल्या आवृत्तींत-नोट्स पृ. ८० वर प्रा. शर्मा देतात तो मजकूर नाहीं. सारांश टीपांत संदर्भ देतांना अचूकपणाविषयीं फार काळजी घेतली पाहिजे हा धडा आम्ही शिकावयाचा आहे.

सिवाये येते त्यासी दर आमद वर आमद

हिंदू दर सदे रुये ५ मुसलमान दर सदे अडीच २॥.

(३) शहर मजकूर माली व किसान आपले सेतीचे व मलाचा गला व कडबा आणितील व वाजे गावीहून आपल्या खुराकास आणितील त्यासी हासील नाही आपले घरीहून बेपारियासी फरोख्त करितील त्यासी हसील घेणे

हिंदू पचोतरा मुसलमानास अडिचोतरा

४. या माहितीवरून दोन-तीन मुद्दे स्पष्ट होतात ते असे–(१) केवळ घरखर्चासाठीं जो कुटुंबी शेतांतून किंवा इतर ठिकाणाहून कापड, धान्य, किराणा माल, तूप, तेल, कडबा, मळ्यांतील इतर जिन्नस आणील त्यावर जकात घेतली जात नसे. पण हेच जिन्नस परवाना घेऊन अथवा परवान्याशिवाय आणले किंवा विक्रीसाठीं आणले तर हिंदूला शेकडा ५ व मुसलमानाला शेकडा २॥ विक्रीकर द्यावा लागे. (२) या विक्रीच्या जिनसांत घोडा, बैल, म्हैस, यांचाहि समावेश होत होता. (३) गाईच्या खरेदी–विक्रीवर मात्र विक्रीकर नव्हता. करांतील ह्या विषम आकारणीमुळें हिंदू व्यापाऱ्यांचें नुकसान आणि मुस्लिम व्यापाऱ्यांचा फायदा होई. यावर दोन्ही व्यापाऱ्यांनीं लढविलेली युक्ति या टिपणांत पुढें दिली आहे. गाईच्या विक्रीवर कर कां बसविला नव्हता हें समजणें थोडें कठीण आहे. पण मुसलमानांस ईद व इतर सणावारांस बळी देण्यासाठीं गाय स्वस्तांत मिळावी हा त्याच्या मुळाशीं हेतु असला पाहिजे असें कोणी म्हटल्यास तें चूक ठरेलच असें नाहीं. तसाहि अर्थ होणें अगदीं शक्य आहे.

५. मी पर प्रा. श्रीराम शर्मा यांच्या पुस्तकाचा उल्लेख केला आहे. त्या पुस्तकांत माहिती दिली आहे ती अशी–इ. १६६५ एप्रिल १० रोजीं औरंगजेबानें एक फतवा काढून असें घोषित केलें कीं, मुसलमानांकडून शेंकडा २॥ तर हिंदूंकडून शेंकडा ५ जकात घ्यावी. पुढें त्याच्या असें लक्षांत आलें कीं, मुसलमानांकडून शेंकडा २॥ जकात घेणेंहि धर्म्य नाहीं. तेव्हा त्यानें इ. १६६७ मे ९ च्या फतव्यानें ही जकातहि मुसलमानांना रद्द केली. याचा परिणाम हिंदू व्यापारी आपला माल मुसलमान व्यापाऱ्यांमार्फत विकून वाचलेला कर आपसांत वाटून घेऊं लागले. तेव्हां औरंगजेबानें इ. १६८२ मार्च ५ च्या हुकुमानें पुन्हा पूर्वींप्रमाणें मुसलमानांकडून शेकडा २॥ जकात घ्यावयास प्रारंभ केला.

६. वर दिलेली माहिती औरंगजेबाच्या कारकिर्दीतील आहे. पेशवे दप्तरांतील ज्या कागदांमधील उतारे वर दिले आहेत त्या कागदांत कालाचा कोणताहि उल्लेख नाहीं हें खरें, पण त्यांत दिलेले नियम अहमदनगर, नाशिक व त्यांच्या भोवतालचा बऱ्याच लांबवरचा प्रदेश यांत मुघली अमल चालू झाल्याबरोबर लिहिलेल्या कागदांत आले आहेत असें या कागदांच्या लिपीवरून सांगतां येतें. मला वाटतें कीं, येथें दिलेले नियम शाहजहानच्या ताब्यांत अहमदनगर, नाशिककडील

प्रदेश आल्याबरोबर चालू झाले असावेत.

७. हे नियम, सापडलेल्या कागदांमुळें अहमदनगर, नाशिक या प्रदेशांतच केवळ चालू होते असें समजण्याचें कारण नाहीं. इतर मुघली प्रदेशांतहि हे नियम चालू असले पाहिजेत. पण मुघली साम्राज्यांतील विविध ठिकाणचे कागदपत्र झाडन सारे पहावयास मिळाले आहेत असें नाहीं. तथापि शितावरून भाताची परीक्षा करावयाची झाल्यास हें नियम मुघली साम्राज्याच्या इतर भागांतहि लागू असावे असें अनुमान काढण्यास कांहीं हरकत नाहीं.

१२. शेवटच्या पेशव्यांची सांकेतिक लिपी

श्री. ना. सं. इनामदार

'मंत्रावेगळा' या शेवटच्या बाजीराव साहेबांच्या कारकिर्दीवरील कादंबरीसाठीं ऐतिहासिक कागदपत्रें अभ्यासीत असतां पेशवे दप्तरांतील तत्कालीन सांकेतिक लिपीकडे माझें लक्ष गेलें. रियासतकारांनीं पेशवे दप्तरांतून निवडलेल्या कागदांच्या २२ व्या खंडांत अशी एक नोंद पृष्ठ १५५ वर आहे. मुळ प्रतीचा फोटोस्टॅट ठसाही त्या खंडाच्या आरंभीं छापला आहे. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ९ यांत पृष्ठ ८९ ते ९२ वर मेजर ना. ब. गद्रे यांनीं पेशवेकालीन एका दुसऱ्या सांकेतिक पत्राचा उलगडा देतांना प्रस्तुतच्या सांकेतिक नोंदींबद्दल असा उल्लेख केला आहे : '(दुसऱ्या बाजीरावाचा) कोणताच लिपिसंकेत अद्याप उलगडला नाहीं. वार्षिक सुमारें पंचवीस लाखांचे जमाखर्चांत दर साल दीड-दोन लाख रुपये गडप करणारा हा सांकेतिक खर्च उलगडला तर कांहीं इतिहास व वस्तु हातीं लागेलसें वाटतें'.

या सांकेतिक लिपींतील एकूण पंचवीस नोंदी सध्या संशोधकांना उपलब्ध झालेल्या आहेत.

कादंबरीसाठीं मी हा संकेत उलगडण्याचा प्रयत्न केला. तो उलगडून सदर नोंदी वाचल्या. कित्येक वर्षे आव्हान देणारा हा संकेत उलगडला असून त्या नोंदीचा अन्वयार्थ आतां लागतो. ही बातमी संशोधकांसाठीं ऑक्टोबर १९६८ च्या रविवार केसरींत प्रथम प्रसिद्ध झाली. नंतर 'मंत्रावेगळा'च्या प्रस्तावनेंत मी त्याचा स्पष्ट उल्लेख करून तो संकेत वापरून एक नवीन नोंद तयार केली व ती कादंबरींत वापरली. त्यानंतर अनेक मित्रांनीं या संकेताबद्दल माझ्याकडे विचारणा केली.

म्हणून मी त्या संकेताचा मला झालेला उलगडा येथें देत आहें. या उलगड्यामुळें सदर पंचवीस नोंदी आतां कुणालाही वाचतां येतील व त्यांतून जो अर्थ काढावयाचा तो काढतां येईल.

संकेत कसा उलगडला ही हकीगत मनोरंजक असली तरी येथें ती गैरलागू असल्यानें त्याचें विवेचन केलें नाहीं या सांकेतिक लिपींतील नोंदींचा उलगडा होण्यासाठीं क्रमानें पुढील कृती कराव्या.

(१) प्रत्येक नोंदीचे नऊ अक्षरांचा एक असे खंड पाडावे.

(२) प्रत्येक खंडांतील शेवटचें एक अक्षर सामान्यतः भाकड वापरलें आहे. हें भाकड अक्षर व्यंजनांच्या अनुक्रमानें येतें, जसें क, ख, ग, घ वगैरे असें समजावें. सवयीनें हें अक्षर चटकन ओळखतां येतें. हें अक्षर गाळावें म्हणजे ८ अक्षरें उरतील.

(३) अ आ इ इत्यादि स्वरांसाठीं धच्या बाराखडीचा उपयोग करावा.

(४) मूळ सांकेतिक लिपींतील नोंदींमधलीं अक्षरें पुढें दिलेल्या अनुक्रमानें मांडून घ्यावीं. १=२, २=४, ३=८, ४=६, ५=१ ६=३, ७=५, ८=७ शेवटचें अक्षर सोडावयाचें आहे.

(५) अक्षरक्रम बदलून तयार झालेल्या नव्या नोंदींतील अक्षरांच्या जागीं खालीं दिल्याप्रमाणें अक्षर बदल करावा.

नव्या नोंदींतील अक्षरें :—क ख ग घ च छ ज झ ट ठ ड ढ ण त थ द ध

त्यांच्या जागीं
घालावयाचीं अक्षरें :—न प फ ब भ म य र ल व श ष स ह ळ क्ष अ

(६) जोडाक्षरांचा संकेत तीन प्रकारचा असल्याचें आढळतें.

(अ) वरील अक्षरसंकेत जशाचा तसा वापरणें.

(आ) जोडाक्षर सुटें लिहिणें. जसें त्र ऐवजीं तर

(इ) अर्धे अक्षर कंसांत टाकणें.

वरील नियमांना अनुसरून रियासतकारांनीं दिलेल्या नोंदीचा उलगडा असा होतो.

मूळ नोंद :— ण या जे झु ही त झ ख ख
टी ना झ टे ता डी नी ध गा
था यी णी जे का यं झा ळे धी
न वे न ठ ट भ ठा जा ची
हा क ता धा झ धा जा झा छु
न जा ट इ हे क्ष भे ण जु
ही न टे टी छा ण ठा ने झे छ २२ जिलकाद.

उलगडा असा :—

नऊ अक्षरांचा वाक्यखंड; नियम २ प्रमाणें एक भाकड अक्षर गाळावयाचें आहे.	नियम ४ प्रमाणें तयार होणारी नवी नोंद
(अ) ण या जे झु ही त झ ख ख	(अ) ही ण त या झ झु ख जे
(आ) टी ना झ टे ता डी नी ध गा	(आ) ता ठी डी ना नी टे ध झ
(ई) था यी णी जे का यं झा ले धी	(ई) का था यं यी झा जे ळे णी
(ऊ) न वे न ठ ट भ ठा जा ची	(ऊ) ट न भ वे ठा ठ जा न
(ए) हा क ता धा झ धा जा झा छु	(ए) झ हां धा क जा धा झा ता
(ऐ) न जा ट ह हे झ भे ण जु	(ऐ) हे न झ जा भे ह ण ट
(ओ) ही न टे टी छा ण ठा ने भे	(ओ) छा ही ण त ठा टी ने हे

नियम ५ प्रमाणें उलगडा
होतो तो असा.

(अ) तीस हजार रुपये
(आ) हाली शिका किले बर
(ई) नाळा जंजिरा येथे सि
(ऊ) लकच ठेवाव या क
(ए) रता आनया(न्या)बा राहा
(ऐ) तेकर याचे तसल
(आ) मातीस हवाली केले.

१३. हैदराबादेच्या सरदार घराण्यांतील एक प्रकरण

डॉ. प्र. ल. सासवडकर

इतिहासाची नवीन कल्पना पूर्वीपेक्षां वेगळी आहे. केवळ राजेरजवाड्यांचा इतिहास, लढाया आणि तह म्हणजे इतिहास नव्हे. तर सर्वच काळांत सामान्य माणसाचें जीवन कशा तऱ्हेचें होतें हें नवा इतिहास पहातो. मानवी भावनांमध्यें शतकानुशतकें फारच थोडा बदल झालेला आहे. आज आपल्याभोवतीं दिसणारीं अनेक प्रकरणें दोन शतकांपूर्वी तशींच घडत होतीं असें जुनीं पत्रें वाचल्यानंतर आपल्या लक्षांत येतें. मराठी इतिहासाचीं मौलिक साधनें म्हणजे तत्कालीन पत्रव्यवहार होय. राजनैतिक घटनांबरोबर अशा पत्रव्यवहारांतून कित्येक सामाजिक गोष्टी व मानवी जीवनाचे विविध पैलू आढळून येतात.

इ. १७७० पासून तीन दशकें मराठ्यांचा कारभार प्रामुख्यानें नाना फडणीस

पहात असत. देशोदेशींच्या राजेरजवाडयांकडून व मराठे सरदारांकडून रोजचीं बातमीपत्रें नानांकडे येत. गोविंद कृष्ण काळे हे हैद्राबादच्या निजामाकडे पेशव्यांचे वकील म्हणून होते. काळयांची व नानांची चांगली मैत्री होती. काळयांनीं नानांना लिहिलेल्या पत्रांतून राजनैतिक गोष्टींबरोबर हैद्राबादेंतील समाजजीवनही उत्तम दिसून येतें. पुढें दिलेलें एक प्रकरण गोविंदराव काळयांच्या १७८० ते ९० च्या दरम्यान नानांना लिहिलेल्या पत्रांत आढळलें आहे.

मुशीरुल्–मुल्क हा सरदार या काळांत पुढें आलेला होता. निजामअलीची त्यावर मर्जी होती. निजामानें त्याला दिवाण नेमलें होतें. मुशीरचें प्रस्थ निजाम-दरबारीं फार वाढलें होतें. (पुणें व नागपूरप्रमाणेंच हैद्राबादेंतही उत्तमोत्तम नर्तकी होत्या व त्यांच्यासाठीं बराच मोठा खर्चही केला जाई.) मुशीरचें पूर्वीचें नांव गुलाम सय्यिद होतें. निजामानें त्याला ७,००० ची मनसबदारी देऊन 'मुशी-रुल्–मुल्क अजमुल–उमरा' असे किताब दिले. मुशीरला दोन तीन बेगमा असून पुत्र मात्र एकच होता. त्याचें नांव सुलैमान. एकदां गोविंदरावांनीं नानांना कळविलें कीं, मुशीरचा पुत्र एका कलावंतिणीच्या नादीं लागला आहे. प्रत्यक्ष जरी नाहीं तरी आपल्या इष्टमित्रांकडून तो एका कलावंतिणीच्या मुलीचा परामर्श घेतो; तेव्हां कलावंतिणीनें निजामाच्या जनानखान्यांतून ही बातमी निजामाकडे पोचविली. निजामानें हुकूम दिला कीं, 'सुलैमानजाहाला आवशाच्या किल्ल्यावर पाठवावें.' त्याला तेथें पाठविल्यास मुशीरुल् मुल्कला आपला बदलौकिक होईल असें वाटून त्यानें कलावंतिणीला १००० रु. देऊन हें प्रकरण तात्पुरतें मिटविलें. व निजामाकडे मुलाला क्षमा करावी अशी याचना केली.

मुशीरुल् मुल्कला गोविंदराव काळे आपल्या पत्रांत बहादूर म्हणून म्हणत. बहादूरजवळ नर्तकींचा एक ताफा होता. या ताफ्याची प्रमुख दौलतकुंवर नांवाची नर्तकी होती. तिच्या ताफ्यांतील एका तरुण व सुंदर नर्तकीच्या नादीं बहादुरचा पुत्र सुलेमानजाहा लागला. दोघांच्याही चोरून भेटी होत. ही गोष्ट बहादुरच्या कानांवर गेली. बहादुरनें यासंबंधीं चौकशी करण्याचें ठरविलें. मध्यंतरीं कांहीं महिन्यांचा काळ गेला. ती तरुण नर्तकी गरोदर राहिली. तिनें बहादुराच्या मुलास सांगितलें कीं, "मजला पोटचें राहिलें आहे तें तुमचेंच आहे." यावरून गोविंदराव काळे पुढें नानांना लिहितात कीं, "हें ऐकतांच बहादुरच्या मुलाला फार आनंद झाला." ती तरुण मुलगी बहादुराच्या मुलाला एकांतांत सांगूं लागली "तुम्ही नबाब बंदगान अली (निजाम) यांचे दिवाण म्हणवितां. माझ्या पोटीं तुमचाच गर्भ राहिला असतां तुम्ही मला अजून नर्तकी म्हणूनच ठेविलें आहे, हें आश्चर्य आहे. खुदानें तुम्हांला भरपूर दिलें आहे. तेव्हां माझा बेगम म्हणून स्वीकार करणें तुम्हांला अशक्य नाहीं." यावर बहादुराच्या मुलानें तिला सांगितलें कीं, "आम्ही तुला खूप घरांत घेऊं; पण तुझी दौलतकुंवर या गोष्टीला कबूल कशी होईल?"

तेव्हां ती नर्तकी म्हणाली, "मी स्वतः राजी झाल्यावर तिला काय म्हणण्याचा अधिकार आहे ? तिला ५००-७०० रुपये द्या. ती गप्प बसेल." यावर बहादुरचा मुलगा तिला म्हणाला, "तू कांहीं नेहमीच आमच्याकडे रहात नव्हतीस, इतरत्रही जात होतीस. तेव्हां तुझें म्हणणें खरें कशावरून ?" नर्तकीनें उत्तर दिलें, "ज्या दिवसापासून तुमची माझी भेट झाली त्या दिवसापासून मी इतरत्र कोठेंही गेलें नाहीं." बहादुराचा पुत्र गप्प बसला. नर्तकी पुढें म्हणाली, "बेगम म्हणून तुम्ही मला घरांत घेतलेंत तर उत्तम. नाहीं घेतलें तर मला झालेला मुलगा तुमच्या देवडीवर आणून सोडून देईन."

सुलेमानजहाचें निजामाचा एक सरदार गुरूरजंग याच्या मुलीशीं लग्न झालें होतें. सुलेमाननें नर्तकीला सांगितलें "हें बघ, घरांत माझी बेगम गरोदर आहे, तिला जर मुलगा झाला तर त्याच्या नंतर मी तुझ्या मुलाला मानेन." सुदैवानें किंवा दुर्दैवानें बहादुरच्या सुनेला मुलगी झाली व थोड्याच दिवसांनीं त्या नर्तकीला मुलगा झाला. कुणाकडून तरी ही वार्ता बहादुरच्या कानीं गेली. बहादुरच्या बेगमा हुषार होत्या. आपल्या घराण्यांत पुत्र नाहीं ही गोष्ट त्यांना जाचत होती. त्यांनीं बहादुराच्या कानावर ही हकीकत घातली व लाजेखातर तो स्वतः सांगू शकत नाहीं असें सांगितलें. बहादुराला हें ऐकून फारच आनंद झाला. नातवाचें तोंड पहाण्याची त्यालाही फार इच्छा होतीच. नर्तकी बहादुराच्या वाड्याजवळच प्रसूत झाली होती. बहादुराच्या बेगमनें एका दासीला पाठवून नर्तकीला व मुलाला वाड्यांत आणविलें. बहादुरानें ही आनंदाची खबर सगळ्यांना सांगितली. २।३ दिवसांनीं गोविंदराव काळे वगैरे मंडळी बहादुराकडे भेटायला आली असतां, बहादुरानें अभिमानानें मुलाच्या प्रेमप्रकरणाची सर्व हकीकत त्यांना सांगितली व छटीच्या (६ वा दिवस) उत्सवाचें निमंत्रण दिलें. ७ व्या दिवशीं मोठा समारंभ झाला. नर्तकीचा व तिच्या मुलाचा सून व नातू म्हणून बहादुरानें स्वीकार केला. अनेक सरदारांनीं सुवर्णमोहोरा मुलाच्या हातांत घातल्या. गोविंदराव काळ्यांनींही १० मोहरा दिल्या. निजामानें स्वतः भेट देऊन बहादुराच्या नातवास हजारी मनसब सुद्धां बहाल केली. या सर्व समारंभांत एकच व्यक्ती दुःखी होती. ती म्हणजे बहादुराची सून. नर्तकीचें व मुलाचें मात्र कौतुक होतें. व त्याच्या नांवानें नौबती झडतात; पण मला मुलगी झाली म्हणून मला कोणी विचारत नाहीं" अशी ती कुरकुरत होती. (डे. कॉ. ऐ. संग्रहालय, रुमाल ४०, पत्र ३०, अप्रसिद्ध.)

१४. युवराज संभाजी आणि मोगल–एक कूट प्रश्न

प्रा. पं. शं. जोशी, कीर्ति महाविद्यालय, दादर, मुंबई–२८

छत्रपति शिवाजी महाराज यशाच्या कीर्तिशिखरावर असतांना इ. १६७८ मध्यें त्यांचा मोठा मुलगा व सिंहासनाचा वारस युवराज संभाजी हा त्यांच्या विरुद्ध मोंगलांस जाऊन मिळाला. त्यामुळें निरनिराळ्या इतिहासकारांनीं संभाजीच्या मोगलांस मिळण्याच्या कारणांचा शोध घेण्याचा आतांपर्यंत प्रयत्न केलेला आहे.

श्री. वा. सी. बेंद्रे ह्यांचा **छत्रपति संभाजी महाराज** (छ. सं. म.) हा प्रबंध प्रसिद्ध होईपर्यंत मराठी इतिहासांत ग्रँट डफ, सर जदुनाथ सरकार व श्री. गो. स. सरदेसाई ह्यांनी वरील प्रकरणीं मांडलेलें मत प्रचलित होतें. मल्हार रामराव चिटणीस ह्यांच्या बखरीच्या आधारें त्यांनीं युवराज संभाजीनें कोणा ब्राह्मण विवाहितेवर बलात्कार केला व त्या गुन्ह्याची शिक्षा शिवाजी महाराज त्याला करणार म्हणून तो मोंगलांकडे पळून गेला असें मत मांडलें होतें.

श्री. बेंद्रे ह्यांनीं हें मत तत्कालीन इंग्रज साधनांच्या आधारें खोडून संभाजी हा शिवाजीवरील "**असंतुष्टतेमुळें**" मोगलांकडे गेला असें दर्शविलें आहे.[१]

तसेंच डॉ. सौ. कमल गोखले यांनीं आपल्या "**शिव-पुत्र संभाजी**" (शि. पु. सं.) या पुस्तकांत चिटणीसांचें मत अग्राह्य ठरविलेलें आहे. त्यांच्या मतें संभाजीनें जर असा घोर गुन्हा केला असता तर शिवाजीनें त्याला तो मोगलांकडून परत स्वराज्यांत आल्यावर जी चांगली वागणूक दिली ती दिली नसती.[२]

या प्रकरणीं समकालीन असलेल्या कृष्णाजी अनंत सभासद ह्याच्या बखरींत संभाजी शिवाजीवर "**रुसून**" मोंगलास मिळाला[३] असा मजकूर मिळतो. हा व तत्कालीन इंग्रज पुरावा ध्यानीं घेतां असें दिसतें कीं चिटणीसांनीं संभाजीच्या मोगलास मिळण्याचें जें कारण दिलें आहे तें बरोबर नाहीं. तें जर खरें असतें तर समकालीन पुराव्यामध्यें संभाजी शिवाजीच्या शिक्षेची भीति वाटून मोगलांकडे गेला असें लिहिलेलें आढळलें असतें.

श्री. बेंद्रे यांनीं शिवाजीच्या मंत्र्यांचे राज्यकारभारांत संभाजीशीं अंतस्थ कलह वगैरे होते. हें कारण दाखविलें आहे[४]. यासाठीं त्यांनीं परमानंद काव्याचा आधार घेतला आहे.

डॉ. गोखले यांनीं परमानंदकाव्य व शिवदिग्विजय बखर यांतील मजकूर पुरावा म्हणून देऊन शिवाजीच्या आयुष्यांत उत्पन्न झालेला "गृहकलह" हा संभाजीच्य

---

१. पृ. ७५, ७६. छ सं म. पुणे, १९६०. २. पृ. ६४. शि. सं. पुणें, १९७१. ३. सभासद सं. जोशी, शं. ना. पुणें, १९६०, पृ. ९२. ४. छ. सं. म. पृ. ६४–१२१.

मोगलांस मिळण्यास कारणीभूत झाला असें दाखविलें आहे.[५]

श्री. बेंद्रे व डॉ. गोखले यांनीं परमानंदकाव्यांतील ज्या संभाजीविषयक मजकुरावर ग्राह्य पुरावा म्हणून भरंवसा ठेवला आहे तो मजकूर संभाजीच्या पदरीं असलेल्या राजकवीनें लिहिलेला आहे.[६] हा संभाजीविषयक त्याच्या समकालीनानें लिहिलेला मजकूर जर तो लेखक प्रामाणिक, स्वराज्यप्रेमी, धर्मप्रेमी व सुज्ञ असता तर भक्कम पुरावा म्हणून संभाजीप्रकरणीं मानतां आला असता. परंतु तो लेखक प्रामाणिक व स्वराज्यप्रेमी वाटत नाहीं; कारण ज्या देवीची धर्मद्वेष्टया मुसलमान राज्यकर्त्यांकरवी होणारी विटंबना थांबविण्यासाठीं शिवाजी महाराजांनीं स्वराज्य स्थापिलें तिनेंच संभाजीला मोगलांकडे जाण्यास सांगितलें असें तो सांगतो ![७] पुरंदरच्या तहांत मोगलांस दिलेले किल्ले शिवाजी महाराजांनीं परत जिकण्याच्या कार्यास तो गैरकृत्य म्हणतो ![८]

असल्या ह्या कवीच्या भाकड मजकुरावर विसंबून श्री. बेंद्रे यांनीं त्यानें सांगितलेला शिवाजीच्या मंत्र्यांचा संभाजीशीं असलेला अंतस्थ कलह व त्यांचें संभाजीशीं असलेलें वैर खरें मानलें आहे. त्या मजकुराचा आधार देऊन त्यांनीं शिवाजीचे मंत्री अप्रामाणिक होते, ते प्रजेवर कर लादीत, संभाजी मंत्र्यांच्या गैर गोष्टींविरुद्ध प्रजेस अभय देई, करांमध्यें सूट देई व त्यामुळें मंत्र्यांना आपला अपमान झाला असें वाटून ते संभाजीशीं वैर करीत असें लिहिलें आहे.[९] श्री. बेंद्रे यांचें हें मत बरोबर नाहीं. कारण युवराज संभाजीनें प्रजेस कराची सूट दिली असें दाखविणारा सबळ पुरावा उपलब्ध नाहीं.[१०] त्याचप्रमाणें त्यानें मंत्र्यांचीं गैर कृत्यें उघडकीस आणलीं व त्यामुळें ते त्याच्याशीं वैर करीत याचाही कांहीं पुरावा उपलब्ध नाहीं.

डॉ. गोखले यांनीं परमानंदकाव्यावर विसंबून शिवाजीनें युवराज संभाजीस श्रृंगारपुरीं ठेवलें असतां सोयराबाईनें त्याला त्रास दिला असें जें मत मांडलें आहे[११] त्याला एकाही अस्सल साधनाचा दुजोरा मिळत नाहीं.

परमानंदकाव्यांतील युवराज संभाजीविषयक मजकूर जरी असा निराधार आहे तरी त्यांत वर्णिलेला शिवाजी महाराजांच्या आयुष्यांतील 'गृहकलह' डॉ. गोखले यांनीं ग्राह्य मानलेला आहे. हा गृहकलह कवीनें अशा खुबीनें मांडला आहे कीं त्यामुळें इतिहासतज्ज्ञ आतांपर्यंत मोठ्या संभ्रमांत पडले आहेत !

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर राणी सोयराबाई, अण्णाजी दत्तो व इतर मंत्र्यांनीं संभाजीला गादीवर न आणतां राजारामास आणलें. त्यांचा संभाजीस डावलण्याचा प्रयत्न सोयराबाईचा भाऊ व शिवाजीचा सेनापति हंबीरराव मोहिते

५. शि. सं. पृ. ५०–६४. ६. सरकार, जदुनाथ, हाऊस ऑफ शिवाजी, १९५५, पृ. ३२४. ७. सरदेसाई, गो. स, सं. परमानंदकाव्य, प का, १९५२, श्लोक ३७–६४, पृ. ७१–७३. ८. किता, श्लोक ५७-६१, पृ. ५५. ९. छ सं म, पृ. ६५–६६, ७३–७४. १०. शि सं, पृ. ५९. ११. कित्ता, पृ. ७१.

यानें संभाजीची कड घेतली म्हणून व त्यांचा पराभव केला म्हणून फसला. त्यामुळें संभाजी स्वराज्याचा स्वामी बनला.

मराठ्यांच्या इतिहासांत ही दुर्दैवी घटना घडली. कारण ज्या संभाजीनें मोगलांस मिळून स्वराज्यावर हल्ले केले होते तोच त्याचा स्वामी बनला! अशा राजाच्या कारकीर्दींत कसें रहावें हा स्वराज्यप्रेमी मंडळींस पेंच पडला असावा. त्यांपैकीं अण्णाजी दत्तो व इतरांनीं राणी सोयराबाईस आपल्या कटांत गोंवून संभाजीस गादीवरून हुसकाविण्याचे प्रयत्न केले. त्यांचा संभाजीवर विषप्रयोग करण्याचा व औरंगजेब-पुत्र अकबर याच्याशीं संभाजीविरुद्ध संधान बांधण्याचा प्रयत्न फसला. त्यामुळें संभाजीनें अण्णाजी दत्तो व इतरांस देहान्त शासन दिलें व राणी सोयराबाईनें लाजिरवाणें जिणें संपविण्यासाठीं विषप्राशन करून आत्महत्या केली.[१२]

राणी सोयराबाई व अण्णाजी दत्तो ह्यांचा संभाजीविरुद्ध वागण्याचा खरा हेतु आपणांस न सांगतां, परमानंदकाव्याचा कवि त्यांना दुसराच हेतु चिकटवितांना दिसतो. म्हणजे त्यानें असें दाखविलें आहे कीं संभाजीची सावत्र आई सोयराबाई ही त्याच्या विरुद्ध होती; कारण तिला आपला मुलगा राजाराम यानें शिवाजी नंतर राजा व्हावें असें वाटे. काव्यामध्यें संभाजी विरुद्धची तिची वागणूक कवीनें शिवाजी महाराजांच्या कर्नाटकस्वारीपूर्वी (आक्टोबर, १६७६ पूर्वी) दाखविलेली आहे.[१३]

डॉ. गोखले यांनीं कवीचें हें म्हणणें सावत्र आईचें सावत्र मुलाशीं मनुष्य-स्वभावाप्रमाणें जसें वागणें जगांत आढळतें तसें वाटतें म्हणून मान्य केलें आहे.[१४] तें बरोबर नाहीं. कारण जगांत सावत्र आई जरी सावत्र मुलाशीं चांगली वागत असली तरी सावत्र मुलगा तिच्या विरुद्ध वर्तन करत असलेलाही दिसतो. त्यांतून छ० संभाजीचें वाकरे दानपत्र, शिवदिग्विजय बखर हीं साधनें सोडलीं तर युवराज संभाजीच्या विरुद्ध तो मोगलांस मिळण्यापूर्वी सोयराबाई, अण्णाजी दत्तो इ. वागले हें सिद्ध करणारा एकही विश्वसनीय पुरावा उपलब्ध नाहीं. संभाजी मोगलांकडून स्वराज्यांत परत आल्यानंतर त्यांची त्याच्या विरुद्धतेची वागणूक साधनें सिद्ध करतात.

असें जर आहे तर परमानंद काव्यांत कवि सोयराबाई, अण्णाजी दत्तो इ. संभाजीच्या विरुद्ध तो मोगलांकडे जाण्यापूर्वी होते असें त्याला स्वतःला संभाजीचें स्वराज्यद्रोहाचें वर्तन "बाईट" होतें हें माहीत असूनहि[१५] कां दाखवितो! हें गढ छ० संभाजीच्या वाकरे दानपत्रांतील मजकूर ह्यानीं घेतला म्हणजे उलगडतें.

वाकरे-दानपत्रांत संभाजीनें म्हटलें आहे कीं शिवाजीचे मंत्री त्याच्या (संभाजीच्या) विरुद्ध होते; त्यांनीं सोयराबाईस संभाजीला शिवाजीची गादी

१२. छ सं म, पृ. १४१, १९०–१९४. १३. प का, पृ. ५६–६२; शि सं, पृ. ५१–५६. १४. शि. मं. पृ. ५१–५६. १५. प. का, पृ. ९६, श्लोक १–३.

मिळूं नये म्हणून तिचें मन कलुषित केलें; शिवाजीच्या तिच्या विषयींच्या पक्षपातामुळें त्याचें मत आपल्या विरुद्ध झालें, त्यामुळें आपण मोगलांकडे गेलों. मोगलांच्या मदतीनें स्वराज्यांतील भूपाळगड लढून घेतला इ. इ.[१६]

छ. संभाजीनें हें जें शिवाजी व सोयराबाईविषयीं लिहिलें आहे त्याला परमानंद-काव्य व शिवदिग्विजय बखर यांशिवाय दुसऱ्या साधनांचा पुरावा मिळत नाहीं. परमानंद काव्यांत संभाजी म्हणतो तें मिळतें. कारण त्या राजकवीला आपला धनी जें म्हणतो तें म्हणणें क्रमप्राप्त होतें. शिवदिग्विजय बखर ही इ. स. १८१८ ची असून तिच्यांतील सोयराबाईनें शिवाजीवर विषप्रयोग केला इ. मजकूर अग्राह्य वाटतो. कारण संभाजीपासून तिचा बचाव करणारा फक्त एक शिवाजीच होता. ही बखर पूर्वीच्या साधनांवरून लिहिली असल्यामुळें तींत परमानंद काव्याप्रमाणें मजकूर आला असावा.

बाकरे दानपत्र, परमानंदकाव्य व शिवदिग्विजय बखर यांतील पंतस्थ-कलह व गृह-कलह हीं संभाजीच्या मोगलांकडे जाण्याचीं कारणें अमान्य करून जर आपण सभासद बखरींतील संभाजी मोगलांकडून स्वराज्यांत परत आल्यावर झालेलें शिवाजी-संभाजी संभाषण लक्षांत घेतलें तर या एकंदर प्रकरणाचा उलगडा होतो.

सभासद बखरींतील मजकुरावरून हें स्पष्ट होतें कीं शिवाजीच्या हयातींतच संभाजीला "सचंतर (स्वतंत्र) राज्य" करण्याची इच्छा होती.[१७] संभाजीची ही इच्छा शिवाजीच्या कर्नाटक स्वारीपूर्वीची (ऑक्टोबर १६७६) होती हें संभाजीनें शिवाजीपाशीं राज्याचा वाटा मागितला हा परमानंदकाव्यांतील मजकूर ध्यानीं घेतला म्हणजे सिद्ध होतें.[१८]

संभाजीची ही इच्छा पाहून त्यानें रायगडावर आपण कर्नाटकांत असतां कारभार पहावा हें शिवाजीस श्रेयस्कर वाटलेलें दिसत नाहीं. कर्नाटकस्वारीवर जातांना त्यानें संभाजीस रायगडाहून काढून शृंगारपुरीं ठेवलें. तेथें शाक्तपंथीयांच्या नादीं लागून संभाजीनें मंत्र–तंत्र केले. ह्यांत त्याचा हेतू आपणांस राज्यपद मिळावें हाच होता हें त्याच्या पक्षपाती राजकवीनें त्यांनीं जें "कुवेड" केलें त्यामुळें पुढें शिवाजी लवकर मृत्यू पावून संभाजीस राजपद मिळण्याच्या मार्गांतील अडथळा दूर झाल्याच्या आनंदांत लिहिलें आहे[१९] तें खरें आहे. दिलेरखानानेंहि संभाजीस मोगलांकडे फितविण्याचा प्रयत्न केला.[२०]

कर्नाटकांतून परतल्यावर संभाजीचे हे व्रात्य चाळे शिवाजीस कळले. त्यामुळें त्यानें त्याला शृंगारपूरहून परळी (सज्जनगड) येथें जाण्यास सांगितलें. तेथें गेल्यावर ता. १३-१२-१६७८ रोजीं संभाजी शिवाजीला "मी सह्याद्रि (स्वराज्य) जिंकण्यासाठीं परत येईन" असा उद्दाम निरोप पाठवून मोगलांकडे निघून गेला ![२१]

---

१६. शि सं. पृ. ४३२–४३४. १७. सभासद, पृ. ९३. १८. पृ. ६५, श्लोक ७८–७९. १९. छ सं म, पृ. ६४–६९; शि सं, पृ. ४३०–४३१. २०. प का, पृ. ७६–७९, श्लोक ४–४७. २१. कित्ता, पृ. ८३–८४, श्लोक ५४–५५.

सोयराबाईचा पक्षपाती असता तर त्यानें तसें केलें नसतें. संभाजीस परत आणून शिवाजीनें त्याला नवें आयुष्य जगण्याची संधी दिली. परंतु याबद्दल त्याच्याविषयीं कृतज्ञता न दाखवितां छं. संभाजीनें अविवेकानें बाकरे–दानपत्रांत तो सोयराबाईचा पक्षपाती होता असे कुभांड रचलें. तें म्हणणें एका गुन्हेगाराचें असल्यामुळें त्याला इतर विश्वसनीय पुराव्याचा आधार मिळाल्याशिवाय खरें मानतां येत नाहीं.

पुढें शिवाजीनें संभाजीला स्वराज्यांत परत आणलें. तो संभाजीच्या विरुद्ध व

१५. नवें ऐतिहासिक साहित्य

शिवाजी विद्यापीठ प्रकाशनें

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठानें, डॉ. आप्पासाहेब पवारांच्या मार्गदर्शनाखालीं अलिकडे पुढील ऐतिहासिक ग्रंथनिर्मिती केली आहे.

१. ताराबाईकालीन कागदपत्रें : खंड दुसरा, डॉ. आप्पासाहेब पवार, कोल्हापूर १९७०, पृ. १२+३+५२+३६४. मूल्य ६ रु.

२. शिवचरित्र– एक अभ्यास : ले. सेतु माधवराव पगडी, कोल्हापूर १९७१ पृ. २८० मूल्य ६ रु.

३. Studies in Maratha History, Vol I : Dr. A. G. Pawar कोल्हापूर १९७१, पृ. २३८ मूल्य १० रु.

४. Studies in Maratha History, Vol II : Shri Setu Madhavrao Pagadi, कोल्हापूर, १९७१, पृ. १४४ मूल्य ७ रु.

५. Maratha History Seminar : Convener Dr A. G. Pawar कोल्हापूर, १९७१, पृ. ४०९ मूल्य १५ रु.

(१) यांत इ. १७२१ ते १७४९ पर्यंतचे एकूण २५० कागद आले आहेत. पहिल्या खंडाला पूरक असा हा ग्रंथ असून ताराबाईकालीन अप्रसिद्ध कागद येथें एकत्रित केले आहेत व त्यांचे इंग्रजी सारांश दिले असल्यानें परप्रांतीयांची सोय झाली आहे. रामचंद्रपंत अमात्यांच्या मिळकतीचा त्यांच्या पुत्रांमधील वांटणीचा हिशेब दर्शविणारा क्र. १९ चा कागद हा या ग्रंथांतील एक महत्त्वाचा कागद होय. याखेरीज, कोल्हापूरच्या महालक्ष्मी देवस्थानाबद्दल, पुजाऱ्यांत झालेल्या तंट्याच्या निवाड्याबाबत कांहीं महत्त्वाची माहिती आली आहे. १७१४ च्या कोल्हापूरच्या क्रांतीचे सूत्रधार गिरजोजी यादव, अंताजी त्रिमल आणि तुळाजी शितोळे यांचे उल्लेख या खंडांतील महजरांतून आले आहेत. (क्र. १०७, १५८, १५९, ७८) कोल्हापूरचे संभाजीराजे यांच्या दरबारांतील कांहीं वरिष्ठ अधिकारी–न्यायाधीश, पंडितराव, जोशीराव यांचे उल्लेख येथें आहेत. (क्र. १२८, १३८, १८१) पन्हाळ्याचा वेढा

(क्र. ३२) सामानगडाचा वेढा (क्र ९, १८९), निजामाचें कूच (क्र. १३२), चंद्रसेन जाधव आणि उदाजी चव्हाण (क्र. ३६, ५१) यांचे हल्ले यांत आले आहेत. कागलकर–घाटग्यांचा करीना (क्र. १७८), वतनासंबंधीं सामाजिक व आर्थिक इतिहासास उपयुक्त अशीं साधनें या ग्रंथांत समाविष्ट केलीं आहेत.

(२) यांत श्री. सेतु माधवराव पगडी यांनीं मार्च १९७० मध्यें शिवाजी विद्यापीठाच्या विद्यमानें दिलेल्या तीन भाषणांचा येथें प्रामुख्यानें समावेश केला आहे. यांत श्री. पगडी यांनीं फार्सी, मराठी, इंग्रजी आदि साधनांच्या साहाय्यानें शिवचरित्रांतील कांहीं ठळक प्रसंगांचा आढावा घेतला आहे. अफजल प्रसंग, शाईस्तेखान प्रसंग, आग्र्याहून सुटका, मोगल साम्राज्याचें स्वरूप, दक्षिण-दिग्विजय, व्यंकोजीचें राज्य इत्यादि घटना या आढाव्यांत आल्या आहेत. यानंतर श्री. पगडी यांनीं वेळोवेळीं वृत्तपत्रांतून लिहिलेल्या इतिहासविषयक ९ लेखांचा समावेश यांत करून या ग्रंथाचें स्वरूप थोडेंसें बदललें व शिवचरित्र– एक अभ्यास असें नाव त्यास देण्यांत आलें आहे. शिवजन्मतिथि-वाद, परमानंद आणि अफजलखानाचा वध, बजाजी निंबाळकराचें धर्मांतर, मोगल आणि शिवाजी, दक्षिणदिग्विजय, शिवचरित्रांतील कांहीं शंकास्थळें, सर यदुनाथ सरकार आणि शिवचरित्र इत्यादि विषय या निबंधांतून हाताळले आहेत.

(३) हा डॉ. आप्पासाहेब पवार यांनीं वेळोवेळीं लिहिलेल्या आणि त्यांच्या इतरत्र प्रसिद्ध झालेल्या निबंधांचा संग्रह आहे. इ. १७३७ सालीं मराठ्यांनीं पोर्तुगीजांकडून साष्टी घेतली त्यासंबंधीं इंग्रजी कागदपत्रांमधून मिळणारी माहिती येथें विस्तारानें दिली आहे. युरोपियन चांचेगिरी (१७२१–२४) नादिरशाह, थॉमस् पिटच्या दिनचर्येंतील उतारे (१६९९ ते १७०९), इंग्रज आणि राजा संभाजी यांमध्यें झालेला एक नाविक तह (१७३९), कर्नाटकच्या इतिहासाचीं कांहीं साधनें (१७४९–५५), औरंगजेबाच्या मृत्यूनंतर, या निबंधांची रचना प्रामुख्यानें ब्रिटिश म्युझियम आणि इंडिया ऑफिस लॉयब्ररी या इंग्लडमधील संस्थांत उपलब्ध झालेल्या साधनांच्या साहाय्यानें केली आहे. याखेरीज 'जोहार', मराठ्यांचा १६९९ चा विजय, रामचंद्रपंत अमात्याचीं दोन पत्रें, सिद्दी आणि सुरतेची बखार (१६८३), रामचंद्रपंतांची मृत्युतिथि, शिवाजीची दिल्ली काबीज करण्याची प्रतिज्ञा, शिवाजी आणि रामदास इत्यादि विषयांवर या ग्रंथांत चर्चा केली आहे.

(४) या ग्रंथांत चार फार्सी साधनग्रंथांचा परामर्श घेतला आहे. इन्शा-इ-माधोराम या फार्सी ग्रंथांत (रचना इ. १७०९) मुन्शी माधोरामचीं सुमारे ५० पत्रें असून मोंगल–मराठे संघर्षाचें कांहीं वृत्त त्यांत आहे. कल्याणचा मोंगल सुभेदार मातबरखान याला मुन्शी जेठमल यानें लिहिलेलीं १६८९ ते १७०५ या कालखंडांतील पत्रें एका लेखांत अनुवादित केलीं आहेत. सामाजिक इतिहासाच्या दृष्टीनें ीं पत्रें उपयुक्त आहेत. तिसरा निबंध हा निजामुल्मुल्कचीं सुमारें शंभर पत्रें आहेत.

हैद्राबादच्या दप्तरखान्यांतील मुनशी रामसिंग लिखित गुलशन-इ-अजाइब या फार्सी ग्रंथाचा (रचना इ. स. १७८३) इंग्रजी परिचय आहे. चौथ्या निबंधांत मुहम्मद कासिमच्या अहवाल-इ-खवाकीन या निजामुलमुल्कच्या चरित्रासंबंधीं परिचय आहे. या चारही निबंधांतून मराठ्यांच्या इतिहासांतील महत्त्वाच्या कालखंडाचा परिचय लेखकानें करून दिला आहे.

(५) कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाच्या विद्यमानें मे २८ ते ३१, १९७० सालीं आयोजित केलेल्या मराठ्यांच्या इतिहासाविषयींच्या चर्चा-सत्रांत वाचलेल्या ३८ निबंधांचा संग्रह म्हणजे हा ग्रंथ होय. मराठ्यांच्या इतिहासाचे विविध पैलू या ग्रंथांत आढळतात. महाराष्ट्र, बिहार, बंगाल, म्हैसूर, पंजाब, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, ओरिसा या प्रांतांतून या चर्चासत्रासाठीं संशोधक आले होते व त्यांनीं आपल्या प्रांतांतील साधनांच्या साहाय्यानें मराठ्यांच्या इतिहासाचें निवेदन केलें होतें. हे सर्व निबध येथें एकत्रित केले आहेत.

(६) ऐतिहासिक फार्सी साधनांत पत्रगुच्छ असा एक साधनवर्ग आहे. यांत एक किंवा अधिक मनुष्यांनीं एका किंवा अधिक मनुष्यांचीं पत्रें एकत्रित केलेलीं असतात. पत्रें अशीं एकत्रित करण्याचा मुख्य हेतु इतिहाससंशोधकास त्यांचा उपयोग व्हावा हा नसून पत्रांचे मसुदे तयार करणाऱ्या कारकुनास पत्रलेखनपद्धतीचें ज्ञान व्हावें हा असतो. यामुळें अशा पत्रगुच्छांत ऐतिहासिक साधनांच्या दृष्टीनें कांहीं वैगुण्यें उत्पन्न झालेलीं असतात. उदाहरणार्थ, यांत मूळ पत्रांच्या शास्त्रीय पद्धतीनें नकला केलेल्या नसतात; अनेकदां यांत नकलांच्या नकला असतात; बहुतेक पत्रांतील कालनिर्देश काढून टाकलेले असतात; कित्येक पत्रें कोणास उद्देशून लिहिलेलीं आहेत हें त्यांत नमूद नसतें. यामुळें या पत्रगुच्छांचा इतिहासलेखनाचीं साधनें म्हणून मर्यादित प्रमाणांत उपयोग होतो. अशा प्रकारचे सुमारें पन्नास पत्रगुच्छ आजवर प्रकाशांत आले (उपलब्ध झाले) आहेत. डॉ. पवार यांनीं प्रसिद्धिलेल्या या पत्रगुच्छांत एकूण २४५ पत्रांचा संग्रह आहे. पैकीं २१२ पत्रांचा गुच्छ त्यांना मिळालेल्या यादव दप्तरांत सांपडला आणि ३३ पत्रांचा दुसरा गुच्छ केवळ जुन्या इंग्रजी अनुवादांच्या रूपानें ब्रिटिश म्युझियममध्यें मिळाला. पहिल्या गुच्छांतील पत्रांचे फार्सी मसुदे एसाजी प्रभूचा मुलगा नीलप्रभू व त्याचा थोरला मुलगा बाबाजी यांनीं केले असून बाबाजीचा धाकटा भाऊ गोविंद यानें गुच्छ तयार केला, यांत २ शिवछत्रपतींची, २ शंभू छत्रपतिकालीन, ४ राजारामकालीन, १२ कोल्हापूरच्या पहिल्या शिवाजीकालीन, १४२ कोल्हापूरच्या संभाजीकालीन, १७ शाहूकालीन कागद आहेत. यांपैकीं ४३ पत्रें एकट्या संभाजीनें निजामास लिहिलीं आहेत. या कागदपत्रांत शाहू, कोल्हापूरचे शिवाजी व संभाजी, राजाराम, निजाम व मुघलांचे अनेक लहानमोठे अधिकारी, संताजी व इतर घोरपडे, धनाजी व चंद्रसेन जाधव, इत्यादि तत्कालीन राजकारणी पुरुषांविषयीं अनेक प्रकारची माहिती आली आहे.

करवीरच्या इतिहासाचीं साधनें :

करवीर छत्रपती श्री. शहाजी महाराज यांच्या प्रेरणेनें करवीरच्या इतिहासाच्या साधनसामुग्रींत आजकाल बरीच भर पडत आहे. पुढील तीन्ही ग्रंथांना महाराजांचा आशीर्वाद आहे.

७. करवीर रियासतीचीं कागदपत्रें, खंड १ ला : स. मा. गर्गे, पुणें, १९७०, पृ. ३२०+१५, मूल्य १० रु.

८. करवीर सरदारांच्या कैफियती : खं. आ. गायकवाड, १९७१, पृ. ३०४, मूल्य ८ रु.

९. कापशीकर सेनापति घोरपडे घराण्याचीं कागदपत्रें, भाग १ व २ : शं. व. वर्टीकर, पुणें, १९७१, पृ. ४३३, मूल्य १० रु.

(७) यांत इ. १७३१ ते १८८२ या कालखंडातील एकूण २४१ दुर्मिळ कागदपत्रें प्रसिद्ध केलीं आहेत. हीं साधनें कोल्हापुरचें अभिलेख कार्यालय, 'हुजूर खाजगी दप्तर' न्यू पॅलेस, गायकवाड दप्तर कोल्हापूर या संग्रहालयांतून निवडलेलीं आहेत. कोल्हापूरच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक इतिहासास उपयुक्त असे कागद, याद्या, टिपणें, कैफियती इ. या ग्रंथांत समाविष्ट आहेत.

(८) यांत कोल्हापूरच्या राजकारणाशीं संबंधित अशा २३ सरदारांच्या हकीकती येथें आल्या आहेत. सेनापती घोरपडे कापशीकर, हिंमतबहाद्दर चव्हाण, तोरगलकर, गजेंद्रगडकर, घोरपडे, निंबाळकर, जाधव, पंडितराव, पाटणकर, घाटगे आदि प्रमुख सरदारांच्या कैफियती यांत आहेत. या कैफियती कोल्हापूर अभिलेख कार्यालयामधून घेतलेल्या आहेत.

(९) इ. स. १६८२ ते १८५६–५७ पर्यंतचे ३९४ कागद प्रसिद्ध केले आहेत. मराठ्यांच्या सेनापती घराण्यांतील कागदपत्रें प्रथमच उजेडांत आणून या जागीरीचे पूर्वीचे कारभारी श्री. वर्टीकर यांनीं ऐतिहासिक साधनग्रंथांत मोलाची भर घातली आहे. संताजी, रामचंद्रपंत अमात्य, शिंदे, मोहिते, करवीरकर छत्रपती यांच्यासंबधीं उपयुक्त माहिती या साधनांतून आढळते. तत्कालीन सामाजिक जीवनांचें दर्शन घडविणारीं बरींच पत्रें यांत आहेत.

स्फुट प्रकाशनें :

(१०) The rise and fall of Maratha power, vol. I, 1620-1689 S. L. Karandikar, Poona, 1969, Pp. 346, Price, Rs. 16.

कै. शि. ल. करंदीकर यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचें तीन खंडांत लेखन करण्याचा संकल्प केला होता. त्यापैकीं शहाजी, शिवाजी आणि संभाजी यांचा इतिहास निवेदन करणारा हा प्रथम खंडच प्रसिद्ध होऊं शकला. मराठ्यांच्या उदयास्ताच्या इतिहासाच्या आकर्षणामुळें हें लेखन घडलें आहे असें लेखकानें आपलें मत व्यक्त केलें आहे. भोसल्यांचे कुलवृत्तांपासून सुरवात करून संभाजीच्या वधापर्यंतचा भाग

येथें आला आहे. ग्रंथाच्या शेवटीं मराठ्यांच्या इतिहासांत वारंवार येणाऱ्या कांहीं देशी शब्दांचें इंग्रजींत स्पष्टीकरण केलें आहे.

(११) Chhatrapatis of Kolhapur : Manohar Malgaonkar Bombay, 1971, pp. 613, Price Rs. 80.

कोल्हापूर संस्थानांतील सरदार घराण्यांतील जुनीं कागदपत्रें, सरकारी दप्तरखाना, खाजगी दप्तर, श्री. मा. वि. गुजर संपादित करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, आणि श्री. स. मा. गर्गे लिखित करवीर रियासत यांच्या आधारें मनोहर माळगांवकर यांनीं कोल्हापूरकरांचा इतिहास प्रस्तुत ग्रंथांत निवेदन केला आहे. वारणेच्या तहानें कोल्हापूरचें स्वतंत्र राज्य निर्माण झालें. तेव्हांपासून ते राजर्षि छत्रपति शाहू महाराज गादीवर येईपर्यंतचा कालखंड या ग्रंथांत आला आहे. परिशिष्टांत शाहू ते शहाजी राजे या कालखंडाचा त्रोटक परिचय करून दिला आहे. कोल्हापूच्या समग्र इतिहासावर इंग्रजींत लिहिलेला हा पहिलाच ग्रंथ होय.

(१२) शिवपुत्र संभाजी : डॉ. सौ. कमल गोखले, पुणें, १९७१, पृ. ५५६, मूल्य २६. रु. श्री. बेंद्रे यांनीं सुमारें दहा वर्षांपूर्वी संभाजी महाराजांचें चरित्र लिहून संभाजीवरील आरोपांचें निरसन करण्याचा प्रयत्न केला होता. डॉ. गोखले यांनीं या ग्रंथांत प्रकाशित, अप्रकाशित, मराठी, फार्सी, इंग्रजी, पोर्तुगीज, फ्रेंच साधनांच्या साहाय्यानें संभाजी राजाचें पुन्हा एकदां मूल्यमापन केलें आहे. सातारच्या पारसनीस संग्रहांतील दोन रंगीत चि; त्रें अडकोळणचा शिलालेख, संभाजी समाधि यांचीं छायाचित्रे, आणि कांहीं नकाशे या ग्रंथांत समाविष्ट केले आहेत. न्यायदान, प्रजाहित, महसूल, वतन, अष्टप्रधान इत्यादि राज्यकारभारविषयक गोष्टींचा आढावा, त्याचें धार्मिक धोरण, त्याचा पराक्रम, धडाडी या सर्व अंगांचा परामर्ष लेखिकेनें घेतला आहे.

(१३) History of Postal Administration in Hyderabad; by M. A. Nayeem, vol. I. Hyderabad 1970, pp 317, Price Rs. 75.

हैद्राबादच्या टपाल खात्यासंबंधीं चार भागांत ऐतिहासिक माहिती देण्याचा संकल्प, हैद्राबादचे एक तरुण इतिहाससंशोधक श्री. नयीम यांनीं केला असून आत्तांपावेतों या मालेंतील भाग प्रसिद्ध झाले आहेत. ' Postat Markings ' हा दुसरा भाग प्रथम १९६७ सालीं प्रसिद्ध झाला. हैद्राबादच्या टपालशासनाचा इ. स. १७२४ ते १९५० पर्यंतचा इतिहास यांत आला आहे. आणि असें करीत असतांना पार्श्वभूमि म्हणून १२९४ पासूनच्या दक्षिणेंतील टपालव्यवस्थेचा मागोवा घेतला (विभाग १–१२९६–१७२४) आहे. टपालखातें १७२४ ते १८५६ आणि नंतर १८५७ ते १९४८ या कालखडांत कशा रीतीनें कार्य करीत होतें याची माहिती विस्तारानें देण्यांत आली आहे. तिसऱ्या भागांत कायदेशीर तरतुदींचा इतिहास दिला आहे. नकाशे, कागदपत्रांचे कांहीं नमुने, टपालखात्यांतील अधिकारी, युनि-

फॉर्मस्, वाहनें, कार्यालयें यांचीं छायाचित्रें देऊन ग्रंथाची उपयुक्तता वाढविली आहे.

(१४) शाहुदप्तरांतील कागदपत्रांची वर्णनात्मक सूची, संचालक, पुराभिलेख व पुरातत्त्व विभाग, महाराष्ट्र शासन प्रकाशन, खंड १ ला, पृ. ५०२, मूल्य २१ रु. खंड २ रा, पृ. ५०३–१०२१, मूल्य १७ रु.

पुण्याच्या पेशवेदप्तरांतील एक महत्त्वाचा विभाग म्हणजे शाहू दप्तरांत एकूण ५६ रुमाल असून कागदांची संख्या ८०,५३९ इतकी भरते. या कागदांची, वर्णनात्मक सूची प्रसिद्ध करून महाराष्ट्र शासनानें इतिहास संशोधकांची फार सोय केली आहे. सूची करतांना कागदांतील विषयाला प्राधान्य देऊन तो कोणत्या रुमालांत आणि कोणत्या पुडक्यांत सांपडेल याचा स्पष्ट निर्देश केल्यामुळें संशोधनाच्या विषयासंबंधीचे कागद पाहणें सुलभ झालें आहे.

(१५) Maharashtra in the Age of Shivaji : By Dr. A. R. Kulkarni, Poona, 1949, pp. 334, Price Rs. 25.

पुणे विद्यापीठाच्या इतिहासविभागाचे प्रमुख डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनीं प्रस्तुत ग्रंथांत इ. १६३० ते १६८० या अर्धशतकांतील महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीचें विस्तृत विवेचन केलें आहे. म्हणजे शककर्ते शिवाजी महाराजांच्या जन्मापासून निधनापर्यंतच्या या ग्रंथांत निरनिराळ्या प्रकरणांत डॉ. कुलकर्णी यांनीं क्रमानें पुढील गोष्टींची माहिती दिली आहे : महाराष्ट्राची भौगोलिक रचना, शिवाजी महाराजांच्या काळांतील समाजजीवन, त्यासंबंधींचीं संस्कृत व मराठी साधनें आणि कागदपत्रें यांच्या गुणावगुणांची चिकित्सा, महाराष्ट्राची ग्रामव्यवस्था, तिच्याशीं संबंधित असलेले वतनदार, बलुतेदार, शेतकरी इत्यादींचें स्थान, तत्कालीन शेती, त्यांची वहिवाट, मालकी, इनामांचे प्रकार, त्यांचे हक्कदार, मिरासदार आणि उपरे, शेतीची खरेदीविक्री, गहाण, बक्षिसी. शेतीचें उत्पन्न, दुष्काळी स्थिती, पाणीपुरवठ्याच्या सोयी, कोरडवाहू व बागायती शेती, वर्षाकाठीं शेतकऱ्यांच्या पदरांत पडणारें फळ, करपद्धती, करांचें ओझें, दंड आणि तत्सम प्रकार, चौथ आणि सरदेशमुखी, चलनपद्धती, नाणीं, टांकसाळ, जमीनमहसुलाचे प्रकार, जमिनीची मोजणी, महसूल, आकारणी, त्यामागचें धोरण व वसुली, राज्य कारभाराचा खर्च, राजाचा खाजगी खर्च, सैन्यावरील खर्च, तत्कालीन लोकसंख्या, उद्योगधंदे, व्यापार, वस्तुविनिमयाची पद्धत, कर्जपुरवठा, सावकारी, व्याज, वरात, वस्तूंच्या किंमती, नाण्यांचे प्रकार.

(१६) जेम्स कनिंगहॅम, ग्रँट डफ : मराठ्यांचा इतिहासकार व प्रशासक : डॉ. अ. रा. कुलकर्णी, पुणें विद्यापीठ प्रकाशन, १९७१, पृ. ३०२.

ग्रँट डफ मराठ्यांचा पहिला इतिहासकार आणि सातारा संस्थानाचा प्रशासक होता. त्यानें इतिहासक्षेत्रांत केलेली कामगिरी अत्यंत मोलाची होती. मराठ्यांच्या इतिहासाचें लेखन त्यानें तपशिलानें, परिश्रमाने आणि आत्मीयतेनें केलें. विशेषतः

डॉ. कुलकर्णी यांच्या प्रस्तुत पुस्तकाच्या वाचनानें तर ग्रँट डफच्या प्रयत्नांचें खरें मोल लक्षांत येतें आणि त्याच्याबद्दलचा आदर दुणावतो.

डॉ. कुलकर्णी यांनीं ग्रँट डफचें साधार चरित्र आणि त्याच्या इतिहास-लेखना-मागची मनोभूमिका समजून घेण्यासाठीं इंग्लंडमध्यें डफचे सध्याचे वंशज, त्याचे प्रकाशक यांच्या भेटी घेतल्या, त्यांचीं काही अस्सल कागदपत्रें वाचलीं आणि हे पुस्तक लिहिलें. पुणें विद्यापीठ कै. न. चिं. केळकर यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी घडवीत असलेल्या व्याख्यानमालेंत दिलेली व्याख्यानें प्रस्तुत ग्रंथरूपानें प्रसिद्ध केलीं आहेत.

ग्रँट डफची जीवनगाथा, त्याची सातारा येथील प्रशासकीय कामगिरी, साताऱ्याचा त्यावेळचा राजा प्रतापसिंह आणि ग्रँट डफ यांचे संबंध. ग्रँट डफनें प्रताप-सिंहाला कारभार करण्याचें दिलेलें शिक्षण, ग्रँट डफच्या प्रत्यक्ष इतिहासलेखनाची पार्श्वभूमी, ग्रँट डफनें इतिहासाचीं फारसी आणि मराठी साधनें किती प्रयत्नपूर्वक मिळविलीं व त्यांच्या खरेखोटेपणासंबंधीं किती साधकबाधक चर्चा केली याची माहिती, ग्रँट डफला आपला इतिहास ग्रंथ प्रकाशित करण्यासाठीं करावे लागलेले प्रयत्न याच संदर्भांतील त्यावेळचा मुंबईचा गव्हर्नर एलफिन्स्टन आणि ग्रँट डफ यांचा पत्रव्यवहार, उतारे, ग्रँट डफच्या इतिहासाचे टीकाकार, त्यांनीं केलेली टीका, त्यांत व्यक्त झालेले पूर्वग्रह, ग्रँट डफच्या प्रयत्नांचें आणि टीकाकारांच्या टीकेचें मूल्यमापन हे विषय आले आहेत.

● ● ●

१६. मराठ्यांच्या इतिहासाचें चर्चासत्र–मुंबई

भारतीय इतिहास परिषदांमधून मराठ्यांच्या इतिहासाचा विचार होत असतोच. परंतु या विषयावर स्वतंत्रपणें चर्चासत्र आयोजित करण्याचा मान सर्वप्रथम पुणें विद्यापीठानें १९६९ सालीं मिळविला. १९७० सालीं असें चर्चासत्र शिवाजी विद्या-पीठानें भरविलें होतें. या वर्षी मुंबई विद्यापीठानें या बाबतींत पुढाकार घेतला.

मुंबईचें हें चर्चासत्र ५ ते ८ नोव्हेंबर १९७१ असे चार दिवस भरविण्यांत आलें. या सत्राचें उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल व मुंबई विद्यापीठाचे कुलपति नवाब अली यावर जंग यांनीं केलें. त्या प्रसंगीं केलेल्या स्वागतपर भाषणांत कुलगुरु टोपे यांनीं इतिहाससंशोधकांना असें आवाहन केलें कीं मराठ्यांच्या इतिहासाचा विचार अखिल भारताच्या व भारताशीं संबंध असलेल्या परकीय राष्ट्रांच्या इतिहासाच्या संदर्भांत व्हावा. त्यानंतर कुलपति आपल्या उद्घाटनाच्या भाषणांत म्हणाले कीं वर्तमान हा भूतकालांतील अनेक ऐतिहासिक घटनांचा परिपाक असतो. या घटनां-वर प्रकाश टाकणें हें इतिहासकाराचें खरें कार्य होय.

या चर्चासत्रांत भारताच्या निरनिराळ्या भागांतून आलेल्या सुमारें चाळीस संशोधकांनीं भाग घेऊन निबंध वाचले. या निबंधांवरील चर्चा म. म. द. वा. पोतदार, प्रा. ग. ह. खरे व प्रि. श्रीराम शर्मा यांनीं त्यांत भाग घेतल्यामुळें विशेष रंगल्या. वाचल्या गेलेल्या निबंधांत व्यक्तिविषयक, तसेच राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीचें विश्लेषण करणारे व इतिहाससाधनांवर प्रकाश टाकणारे विविध विषय आले होते. कान्होजी भोसले व मुरारराव घोरपडे यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रा. बी. के आपटे व डॉ. प्र. ल. सासवडकर यांनीं नवा प्रकाश टाकला. अहिल्याबाई होळकर हिच्यासंबंधीं श्री. श्री. रा. टिकेकर, डॉ. भट व श्री. पी. बी. देशपांडे या तिघांनीं आपापले निबंध सादर केले. त्यांतून अहिल्याबाईच्या शासकीय निपुणतेचे विविध पैलू प्रगट झाले. प्रा. पं. शं. जोशी यांनीं संभाजीचें दिलेरखानास जाऊन मिळणें अयोग्य होतें असें आपल्या निबंधांतून हिरीरीनें प्रतिपादिलें. पुण्याच्या गोखले इन्स्टिटयूटमधील संशोधक डॉ. बेंजामिन यांनीं सादर केलेलें डॉ. होवे (Hove) यांचें प्रवासवर्णन नावीन्यपूर्ण वाटलें. पुणे विद्यापीठाचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनीं 'उचापत झाडा' याइतिहास-साधनप्रकाराचें स्वरूप व मर्यादा विशद करून सांगितली. प्रा. रा. वि. ओतुरकर यांच्या पहिल्या बाजीरावाबरील व प्राचार्य सदाशिव आठवले यांच्या नाना फडणिसावरील निबंधांनीं असें दाखवून दिलें कीं या दोन्ही व्यक्तींचें पुनर्मूल्यमापन व्हावयास हवें. धार्मिक विषयांवरील निबंधांत डॉ. बी. सी. रे यांचा मराठ्यांच्या ओरिसांतील धार्मिक धोरणासंबंधींचा निबंध उल्लेखनीय होता. प्रा. एल्. आर. कुलकर्णी यांनीं आपल्या निबंधांत रामदासी संप्रदायाच्या कर्नाटकांतील कार्यासंबंधीं कांहीं नवीन माहिती उजेडांत आणली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांनीं वाचलेल्या 'शिवाजीचें राज्य निधर्मी होतें' या निबंधावरील चर्चा खूपच रंगली. श्री. अँथनी डी कॉस्टा यांनीं शिवकालीन पोर्तुगीज साधनांत शिवाजीसंबंधीं आलेले कांहीं नवीन उल्लेख संशोधकांच्या नजरेस आणून दिले. तर डॉ. व्ही. टी. गुणे यांनीं मुंबईच्या इतिहासास उपयुक्त अशा कांहीं पोर्तुगीज साधनांची सर्वांना माहिती दिली. प्रा. ए. एम. देशपांडे व कु. सुषमा वर्मा यांनीं आपल्या निबंधांतून सातारच्या प्रतापसिंह महाराजांच्या राज्यकारभारासंबंधीं कांहीं नवीन माहिती पुढें आणली.

याशिवाय खालील व्यक्तींनींही निबंध सादर केले—

चार दिवस चाललेलें हें चर्चासत्र डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या भाषणानें समाप्त झालें. आपल्या भाषणांत त्यांनीं पुणें, कोल्हापूर व मुंबई येथील चर्चासत्रें मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनाच्या दृष्टीनें कशीं उपयुक्त ठरलीं हें समजावून सांगितलें व पुढील सत्र नागपूर किंवा औरंगाबाद विद्यापीठानें भरवावें अशी सूचना केली. सर्वांत शेवटीं चर्चासत्र यशस्वी केल्याबद्दल मुंबई विद्यापीठातर्फे प्रा. टी. ए. कामत यांनीं सर्व संबंधितांचे आभार मानले.